# प्रेषितांची कृत्यें

# प्रेषितांची कृत्यें

## 1

[1] हे थियफिला, येशूंनी जे काही केले आणि शिकविले, त्या सर्व गोष्टींविषयी मी तुम्हांला पहिल्या पुस्तकात लिहिले
होते. [2] पवित्र आत्म्याद्वारे, ते आपल्या निवडलेल्या प्रेषितांना आदेश दिल्यानंतर, वर घेतले गेले नाहीत; [3] त्या दरम्यान
दुःख सहन केल्यानंतर अनेक सबळ प्रमाणांच्या साहाय्याने, त्यांनी आपल्या स्वतःला जिवंत प्रगट केले आणि चाळीस
दिवसांपर्यंत ते त्यांना दर्शन देत राहिले आणि परमेश्वरी शासनाविषयी सांगत राहिले.
[4] त्या शिष्यांना भेटून येशूंनी त्यांना आज्ञा केली, की त्यांनी यरूशलेमेतून बाहेर जाता कामा नये आणि हे देखील, की
स्वर्गीक बापाने केलेली प्रतिज्ञा ज्याविषयी त्यांनी येशूंकडून ऐकले होते ती पूर्ण होईपर्यंत त्यांनी वाट पाहावी ; [5] ती ही
की योहानाने तुमचा पाण्याने बाप्तिस्मा केला होता, परंतु लवकरच तुम्ही पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा प्राप्त कराल.
[6] जेव्हा ते एकत्र जमले तेव्हा त्यांनी हा प्रश्न विचारला, “प्रभूजी स्वामी, आपण याच समयी, इस्त्राएलाला राज्य परत
करणार काय?”
[7] येशूंनी त्यांना उत्तर दिले, “ज्या तारखा आणि जो समय स्वर्गीक पित्याने आपल्या स्वतःच्या नियंत्रणात ठेवला आहे,
त्याविषयी तुम्ही जाणून घेण्याची आवश्यकता नाहीये. [8] परंतु ज्या वेळी पवित्र आत्मा तुमच्यावर येईल,त्या वेळी
तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल आणि यरूशलेम, संपूर्ण यहूदीया, शोमरोन, आणि पृथ्वीच्या शेवटच्या प्रत्येक
कानाकोपऱ्यापर्यंत तुम्ही माझी साक्ष द्याल.”
[9] या सर्व गोष्टी सांगितल्यावर, जेव्हा ते पाहातच होते, तेव्हा त्यांच्या डोळयांदेखतच येशू वर घेतले गेले आणि एका
मेघाने त्यांना झाकून टाकिले (अर्थात ते त्यांना दिसले नाही).
[10] येशू वर घेतले जात असताना ते (शिष्य) वर पाहातच राहिले, तेव्हा अचानक पांढरे कपडे घातलेले दोन व्यक्ती
त्यांच्याजवळ उभे राहिले. [11] ते त्यांना म्हणाले, “अहो गालीलांत राहणाऱ्यांनो, अशा प्रकारे तुम्ही एकटक वर पाहात का
उभे आहा? हेच येशू, जे तुमच्यामधून स्वर्गात घेतले गेले, अशाच प्रकारे स्वर्गातून खाली येतील.”
[12] यानंतर ते जैतून डोंगरावरून उतरून यरूशलेमेस परतले, तेथे पोचण्याकरिता एक दिवस लागत असे. [13] जेव्हा ते
तेथे पोचले, तेव्हा वरच्या खोलीत गेले. (जेथे पेत्र, योहान, याकोब, अंद्रिया, फिलिप्प, थोमा, बर्थलमय, मत्तय,
अल्फीचा मुलगा याकोब, शिमोन जिलोत आणि याकोबाचा मुलगा यहूदा राहत होते). [14] हे सर्व, काही स्त्रिया, येशूंची
आई मरीया आणि त्यांचे भाऊ, यांच्यासमवेत तेथे एक मन, एकचित्त होऊन प्रार्थना करण्यात वेळ खर्च करीत.
[15] एके दिवशी पेत्र तेथे एकत्र जमलेल्या (बसलेल्या) लोकांच्यामध्यें उभा राहून म्हणाला, [16] “हे भावांनो, प्राचीन
समयी दावीदाच्या मुखाद्वारे पवित्र आत्म्याने यहूदाविषयी जी काही भविष्यवाणी केली होती, जो येशूंना धरून
देणाऱ्यांचा पुढारी झाला, ते वचन पूर्ण व्हावयाचेच होते, [17] कारण तो आपल्यापैकीच होता, आणि त्याला सेवा
करण्याच्या कार्यात त्याचा वाटा (एक हिस्सा)मिळालेला होता.
[18] या माणसाने लाचखोरीच्या (अप्रमाणिकपणाच्या) कमाईने एक शेत विकत घेतले होते. तेथेच तो पालथा पडला,
त्याचे शरीर मधून फाटले आणि सर्व आंतडी बाहेर पडली. [19] जे लोक यरूशलेमेत राहत होते त्यांना ही गोष्ट कळली,
म्हणून त्यांच्याच भाषेत ते शेत हकलदमा (रक्ताचे शेत) असे म्हणविले गेले.
[20] कारण संयोजनेत (स्तोत्र) असे लिहिले आहे, “त्याचे घर ओसाड (निर्मनुष्य) व्हावे, पुढे त्यात कोणी न रहावे आणि
दुसऱ्या व्यक्तिने त्याचे पद (जागा) घ्यावे.” [21] म्हणून (यास्तव) जितके दिवस प्रभू येशू आपल्याबरोबर जात येत राहिले,
अर्थात योहानाच्या बाप्तिस्म्यापासून, तर आपल्यामधून वर घेण्यात आले तोपर्यंत जे लोक आपल्याबरोबर राहिले [22] हे
योग्य आहे, की त्यांच्यापैकी एकाने आमच्याबरोबर, त्यांच्या जिवंत उठण्याविषयीचा साक्षी व्हावे.”
[23] तेव्हां त्यांनी दोन जणांना उभे केले - एक होता योसेफ, ज्याला बर्सबा देखील म्हटले जात होते आणि त्याचे उपनांव
युस्त होते, आणि मत्थिया. [24] मग त्यांनी अशी प्रार्थना केली : ते म्हणाले, “येशू, आपण जे सर्वांची हृदयें जाणता, हे

प्रभू,प्रगट करा की आपण या दोघांपैकी, कोणाची निवड केलेली आहे; [25] यासाठी, की त्याने हे सेवक पद आणि प्रेषित
पद घ्यावे, जे यहूदा सोडून आपल्या जागी गेलेला आहे.” [26] मग त्यांनी त्यांच्याकरिता चिठ्या टाकिल्या आणि ती
मत्थियाच्या नांवाची निघाली. म्हणून त्याला त्या अकरा प्रेषितांबरोबर गणले गेले.

# 2

[1] पेंटेकॉस्टचा दिवस आल्यावर ते सर्व एका जागी जमले होते, [2] अचानक आकाशांतून अति वेगाने येणाऱ्या एका
मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्याचा शब्द झाला, आणि त्यामुळे पूर्ण घर जेथे ते बसले होते त्या गुंजनाने भरून गेले. [3] आणि
त्यांना अग्नीच्या जिभा फाटून वेगवेगळ्या होतांना दिसल्या आणि त्यांच्यापैकी प्रत्येकावर एकएक अशा बसल्या
(स्थिरावल्या). [4] ते सर्व पवित्र आत्म्याने भरून गेले, आणि ज्या प्रकारे आत्म्याने त्यांना बोलण्याचे सामर्थ्य दिले ते
निरनिराळ्या भाषा बोलू लागले.
[5] त्या समयी आकाशाखालील प्रत्येक जातीचे भक्तगण यरूशलेमेत राहत होते. [6] हा आवाज ऐकून लोकांची एक मोठी
गर्दी एकत्र जमली; सर्व जण भांबावलेल्या आणि गोंधळलेल्या दशेत भ्यालेले होते, कारण प्रत्येकाला हेच ऐकू येत होते,
की ते माझ्याच भाषेत बोलत आहेत. [7] अचंबित (आश्चर्याने थक्क) होऊन ते एकमेकांना म्हणाले, “हे सर्व बोलणारे
गालीलाचेच आहेत की नाही? [8] मग आपण त्यांच्या मुखांतून आपली मातृभाषा का ऐकतो आहोत? [9] पार्थी, मेदी,
एलामी, मेसोपटेम्या, यहूदीया, कपदुकीया, पंत, आसिया [10] फरूगिया, पंफूलिया, मिसर लिबुवाचे काही भाग आणि
रोमन प्रवासी, यहूदी व यहूदी मत स्वीकारणारे, [11] क्रेतीय आणि अरबीयांना देखील आपण परमेश्वराच्या अद्‌भुत कृत्यांचे
वर्णन आपल्या भाषेत सांगताना ऐकतो आहोत.” [12] ते सर्व आश्चर्यचकित झाले आणि चक्रावून पेचांत पडले व मग
एकमेकांना विचारू लागले, “हे सर्व काय आहे?”
[13] काही लोक चेष्टा करीत म्हणाले, “हे लोक ताज्या द्राक्षारसाने मस्त होऊन धुंदीत आहेत.”
[14] परंतु पेत्र त्या अकरा प्रेषितांबरोबर उभा राहून बुलंद आवाजात म्हणाला, “यहूदीयातील लोकांनो आणि ते सर्व जे
यरूशलेमेचे रहिवाशी आहेत, माझे बोलणे लक्षपूर्वक ऐका, [15] जसे तुम्हांला वाटते आणि जसा तुमचा विचार आहे, की
हे लोक धुंद होऊन बेहोशीत आहेत, तशी गोष्ट अजिबात नाहीच कारण आता तर सकाळचे नऊ वाजले आहेत. [16] परंतु
ही तीच बाब आहे, जिच्याविषयी योएल संदेष्टयाने सांगितले होते : [17] “शेवटल्या दिवसांत काय होईल याविषयी
परमेश्वर म्हणतो - सर्व लोकांवर मी आपला आत्मा ओतीन. तुमचे पुत्र व कन्या भविष्यवाणी करतील, तुमचे तरूण
दर्शन पाहातील; तुमचे म्हातारे स्वप्न पाहातील. [18] त्या दिवसांत मी आपल्या आत्म्यातून, आपल्या दास व दासींवर
देखील आपला आत्मा ओतीन आणि ते संदेश (भविष्यवाणी) देतील. [19] तसेच मी आकाशात स्तंभित करणाऱ्या गोष्टीं
(अद्‌भुतें) आणि या पृथ्वीवर चिन्हें, जसे रक्त, अग्नी आणि वाफेचा ढग दाखवीन; [20] प्रभूचा तो महान आणि प्रसिद्ध
दिवस येण्यापूर्वी, सूर्य अंधारासारखा (रूपांतरित) आणि चंद्र रक्तासारखा होईल, [21] जो कोणी प्रभूचे नांव घेईल तोच
मुक्ति प्राप्त करील.
[22] “अहो इस्त्राएली लोकांनो ऐका : जसे की तुम्हांला ठाऊक आहे, परमेश्वराने येशूंद्वारे (तुम्हांला) आश्चर्यकृत्यें,
सामर्थ्याची कृत्यें आणि चिन्हें दाखवून ज्या गोष्टींची पुष्टि केली, आणि प्रगट केले की नासरेथात राहणारे हेच येशू
त्याच्यापासूनच होते. [23] त्यांना परमेश्वराचे ज्ञान आणि निश्चित व ठाम हेतूच्या आधारे स्वाधीन केले गेले, पण तुम्ही
त्यांना धरिले आणि दुष्ट लोकांच्या हातांनी क्रूसावर खिळून मारून टाकले. [24] परंतु असे होणे शक्यच नव्हते, की
(अशक्य होते) येशूंनी मरणाच्या ताब्यात असावे म्हणून परमेश्वराने त्यांना मरणाच्या बंधनातून मुक्त करून जिवंत केले.
[25] कारण दावीद त्यांच्याविषयी म्हणतो, की “मी आपल्यासमोर नेहमी प्रभूला पाहात राहिलो आहे, कारण तो माझ्या
उजवीकडे आहे, जेणेकरून मी डळमळू नये, [26] म्हणून मी आनंदित झालो, माझी जीभ प्रभूची स्तुति करू लागली आणि
माझे शरीरही आशेवर राहील (स्थिरावेल). [27] कारण तू माझा प्राण मेलेल्या लोकांच्या स्थानी सोडणार नाही, आणि
त्याचप्रमाणे आपल्या पवित्रजणाला कुजू देणार नाही. [28] तू मला जीवनाचे मार्ग कळविले आहेत, तुझ्या उपस्थितीने

(दर्शन) तू मला आनंदाने भरून टाकशील.”
29 भावांनो, मी आपला पूर्वज दावीद याविषयी धाडसाने सांगू इच्छितो, की तो मेल्यानंतर त्याला पुरले गेले आणि
त्याची कबर आजवर आपल्यामध्यें आहे. 30 म्हणून एक संदेष्टा असण्याच्या नात्याने आणि त्याला ठाऊक असल्यामुळे,
की परमेश्वराने शपथ वाहिली आहे, ती ही की मी तुझ्या वंशातील एका व्यक्तिला तुझ्या राजासनावर बसवीन.
31 याविषयीचे ज्ञान पूर्वीपासून असल्यामुळे दावीदाने ख्रिस्तांच्या मेलेल्यांतून उठण्याविषयी म्हटले होते; अर्थात असे की
ना येशूंचा आत्मा मेलेल्यांच्या स्थानी सोडला जाणार, ना त्यांचा देह कुजेल.
32 याच येशूंना याहवे बापाने जिवंत केले, ज्याचे आम्ही साक्षी आहोत. 33 यास्तव परमेश्वराच्या उजव्या हाताकडे
सर्वोच्च पद प्राप्त करून (सर्वश्रेष्ठ शक्ति आणि अधिकारापर्यंत उचलले जाणे), आणि स्वर्गीक पित्याकडून प्रतिज्ञा केलेला
पवित्र आत्मा घेऊन ओतून, जणू वर्षाव केला आहे जे तुम्ही पाहात आहा आणि ऐकत आहा. 34 कारण दावीद स्वर्गात
चढला नव्हता, परंतु स्वतः त्याने म्हटले, “प्रभूने माझ्या प्रभूला म्हटले माझ्या उजवीकडे तोपर्यंत बैस., 35 जोपर्यंत मी
तुझे शत्रू तुझ्या पायांसाठीचे आसन करीत नाही.
36 म्हणून इस्त्राएलाच्या संपूर्ण घराण्याने हे जाणून घ्यावे (कळावे) की यहोवा परमेश्वराने याच येशूंना, ज्यांना तुम्ही
क्रूसावर खिळले होते प्रभू (स्वामी) आणि मुक्ति देणारा असे ठरविले.”
37 जेव्हा लोकांनी हे सर्व ऐकले तेव्हा त्यांची अंतःकरणे कांपली गेली आणि भारावून जाऊन त्यांनी पेत्र व बाकी
प्रेषितांना विचारले, “हे भावांनो, आम्ही करावे तरी काय?”
38 पेत्र त्यांना म्हणाला, “आपले अंतःकरण बदला, पश्चात्ताप करून आपले परिवर्तन करा आणि तुमच्यापैकी प्रत्येकाने
येशू ख्रिस्तांच्या नांवात आपल्या अपराधांच्या क्षमेकरिता बाप्तिस्मा घ्यावा, असे केल्याने तुम्हांला पवित्र आत्म्याचे दान
प्राप्त होईल. 39 कारण ही प्रतिज्ञा तुम्हांला, तुमच्या वंशाला आणि जे दूरदूरचे लोक आहेत त्यांच्यासाठीची आहे, अर्थात
ज्यांना आमचा प्रभू आणि परमेश्वर बोलावील.”
40 दुसऱ्या आणखी पुष्कळ गोष्टी सांगून त्याने त्यांना आपली साक्ष दिली आणि म्हटले, “स्वतःला या विकृत, हटवादी
(भ्रष्टपिढी) जातीपासून वाचवा, राखा.” 41 मग ज्या लोकांनी आनंदाने त्याच्या संदेशाचा स्वीकार केला होता, त्यांचा
बाप्तिस्मा केला गेला आणि त्याच दिवशी सुमारें तीन हजार लोक त्यांच्यात जोडले गेले (भर पडली).
42 ते सर्व प्रेषितांकडून शिकण्यात, सहभागिता करण्यात, भाकर मोडण्यात व प्रार्थना (आराधना) करण्यात चिकाटीने
तल्लीन राहिले. 43 तेथे असणाऱ्या (राहणाऱ्या) प्रत्येक व्यक्तिवर भयाची छाया पसरली, कारण प्रेषितांच्या हातून बहुत
अद्‌भुत कृत्यें आणि चमत्काराची कृत्यें (चिन्हें) केली जात होती. 44 ज्या सर्वांनी येशूंवर विश्वास ठेवला होता ते सर्व
एकत्र रहात असत. 45 ते आपल्या वस्तु आणि संपत्ति विकून, जशी ज्याची गरज होती, तशी सर्वांना वाटून घेत असत.
46 यहूदी प्रार्थनाभवनात ते प्रत्येक दिवशी एकमनाने एकत्र जमत असत. घरोघरी जाऊन येशूंच्या स्मरणार्थ भाकर
मोडीत असत, मनाच्या खरेपणाने आणि आनंदाने आपले भोजन करीत असत. 47 ते परमेश्वराची स्तुति करीत असत,
म्हणून सर्व जण त्यांच्यामुळे खुश असत, कारण लोकांबरोबर त्यांचे उत्तम संबंध होते. जे लोक तारण प्राप्त करीत जात
होते, त्यांना प्रभू त्यांच्या गटात (चर्च) जोडीत जात होता.

# 3

1 एकदा पेत्र आणि योहान, दुपारी तीन वाजता प्रार्थनेच्या समयी प्रार्थनाभवनात जात होते. 2 प्रार्थनाभवनात
(प्रार्थनाभवन) प्रत्येक दिवशी येणाऱ्या लोकांना भीक मागण्यासाठी, एक मनुष्य सुंदर नावाच्या दरवाज्याजवळ
(फाटक) बसवून दिला जात असे. तो पांगळा जन्मला होता. 3 पेत्र आणि योहान जेव्हा प्रार्थनाभवनात प्रवेश करीत होते
तेव्हा त्याने त्यांना भीक मागितली. 4 पेत्राने योहानाबरोबर त्याकडे टक लावून पाहिले आणि म्हणाला, “आमच्याकडे
पाहा”. 5 त्यांच्यापासून काही मिळण्याच्या हेतूने त्याने त्यांच्याकडे पाहिले.
6 तेव्हा पेत्र म्हणाला, “चांदी आणि सोने माझ्याजवळ नाहीये, परंतु माझ्याजवळ जे काही आहे, ते मी तुला देतो; येशू

ख्रिस्त नासोरी यांच्या नांवाने ऊठ आणि चालू लाग.” 7 पेत्राने आपल्या उजव्या हाताने त्याला धरले आणि उठवून उभे
केले. लगेच त्याच्या पायात व गुडघ्यांत बळ आले. 8 तो उडी मारून ताडकन उभा राहिला आणि चालू लागला, तो
उड्या मारीत, धावत आणि परमेश्वराची स्तुति करीत त्यांच्याबरोबर प्रार्थनाभवनात गेला. 9 सर्व लोकांनी त्याला
चालतांना आणि परमेश्वराची स्तुति- प्रशंसा करताना पाहिले. 10 त्यांना कळले, की हा तोच मनुष्य होता जो
प्रार्थनाभवनाच्या सुंदर नांवाच्या दाराजवळ बसून भीक मागीत असे, हे सर्व पाहून ते आश्चर्यचकित झाले.
11 तो लंगडा बरा झाल्यानंतर पेत्र व योहानाला धरून राहिला होता आणि लोक शलमोनाच्या स्तंभावलीत त्यांच्याकडे
धावत आले. 12 पेत्राने हे पाहून सर्व लोकांकडे पाहून म्हटले, “हे इस्त्राएली लोकांनो, तुम्ही आश्चर्य का करीत आहा?
किंवा आम्हांला निरखून एकटक का पाहात आहा, जणूकाय आम्ही आपल्या सामर्थ्याने किंवा चांगुलपणामुळे, हा
मनुष्य चालण्यायोग्य केला आहे? 13 अब्राहाम, इसहाक आणि याकोबाचा परमेश्वर, आपल्या पूर्वजांच्या परमेश्वराने
आपल्या पुत्राचे गौरव केले आहे. तुम्ही त्यांना त्या समयी पिलाताच्या स्वाधीन केले आणि त्यांना नाकारले, जेव्हा तो
येशूंना सोडून देण्याच्या बेतात होता, तेव्हा 14 तुम्ही त्या पवित्र आणि सज्जन मनुष्याला प्रिय जाणण्याऐवजी एका
खूनीच्या मुक्तिची मागणी केली. 15 तुम्ही जीवनाचा राजकुमार (कर्त्याला) मारून टाकला आणि त्यांना परमेश्वराने
मेलेल्यांतून जिवंत उठविले. या सत्याचे आम्ही देखील साक्षी आहोत. 16 तुम्ही जो मनुष्य येथे पहात आहा आणि
ज्याच्याविषयी तुम्हांस ठाऊक आहे, की येशूंच्या नांवाने आणि त्यांच्या नांवावरील विश्वासाने याला सामर्थ्य दिलेले
आहे. होय, जो विश्वास येशूपासून त्याला मिळाला आहे, तुमच्यादेखत येशूंद्वारेच तो पूर्णत: व्यवस्थित उभा आहे.
17 भावांनो मला ठाऊक आहे, की तुम्ही आणि तुमचे अधिकारी या दोहोंनी आपल्या अज्ञानामुळे असे केले होते.
18 परंतु परमेश्वराने ज्या गोष्टी संदेष्टयांच्या मुखाने पूर्वी सांगितल्या होत्या, की ख्रिस्त दुःख सहन करतील ते अशा प्रकारे
पूर्ण झाले आहे. 19 म्हणून आपले मन बदला आणि परत या, की तुमचे अपराध क्षमा केले जावेत, ज्यामुळे येशूंपासून
तुमच्यासाठी ताजगीचा समय (तजेला मिळविणे) व चैनीचा काळ यावा, 20 आणि त्या येशू ख्रिस्ताला पुन्हा पाठवावे जे
पूर्वीपासून तुमचे ‘मशीहा’ म्हणून ठरविले गेले आहेत. 21 या जगाच्या प्रारंभीच्या समयापासून, आपल्या पवित्र
संदेष्टयांच्या मुखाद्वारे परमेश्वराने संदेश दिला होता, तो हा की जोवर सर्व गोष्टीं पुन्हा कायम (शेवटची पुर्नःस्थापना)
होत नाहीत, तोवर येशूंना स्वर्गातच रहावयाचे आहे. 22 कारण मोशे पूर्वजांशी असे बोलला होता, “प्रभू तुमचा परमेश्वर
तुमच्या भावांमधून, माझ्याचसारखा एक संदेष्टा उभा करील आणि तो जे काही तुम्हांला सांगील, ते सर्व करा. 23 परंतु
प्रत्येक व्यक्ती, जो त्या संदेष्टयाचे ऐकणार नाही, तो आपल्या लोकांतून नष्ट केला जाईल”.
24 आणि शमुवेलापासून ते नंतर येणाऱ्या सर्व संदेष्टयांनी अशाच प्रकारची भविष्यवाणी केली होती. 25 तुम्ही
परमेश्वराद्वारे आमच्या पूर्वजांबरोबर केलेल्या कराराचे हिस्सेदार (भागीदार) आणि संदेष्टयांचे संतान आहा, ज्याने
अब्राहामाला म्हटले होते की, पृथ्वीची सर्व राष्ट्रें (घराणे) तुझ्याद्वारे आशीर्वादित होतील. 26 परमेश्वराने आपला पुत्र
जिवंत उठवून त्याला आधी तुमच्याकडे पाठविले, यासाठी की तुमच्यापैकी प्रत्येकाला आपल्या दुष्टाईपासून बाजूला
करून त्याने आशीर्वाद द्यावा”

# 4

1 जेव्हा ते शिकवीत होते, तेव्हा परूशी, प्रार्थनाभवनाचा प्रमुख, आणि सदूकी त्यांच्याजवळ आले. 2 ते यासाठी
संतापले होते कारण लोकांना शिकवीत होते की येशू मेलेल्यांतून जिवंत उठले आहेत. 3 या लोकांनी पेत्र व योहानाला
दुसऱ्या दिवसापर्यंत, तुरूंगांत याकरिता ठेवून घेतले कारण तेव्हा संध्याकाळ झाली होती. 4 तरीपण पुष्कळ लोक
ज्यांनी त्यांचा संदेश ऐकला होता, विश्वासाने येशूंना ग्रहण केले आणि या लोकांची संख्या सुमारे पांच हजार होती.
5 दुसऱ्या दिवशी त्यांचे अधिकारी, शास्त्री, 6 हन्ना प्रमुख-याजक, कयफा, योहान, अलेक्सांद्र आणि प्रमुख याजकाचे
सर्व नातलग यरूशलेमेत एकत्र जमले. 7 त्या लोकांनी पेत्र व योहानाला आपल्यासमोर उभे करून विचारले, “कोणत्या
(कोणाच्या) सामर्थ्याने किंवा नांवाने तुम्ही हे केले आहे?”

8 पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन पेत्र त्यांना म्हणाला, 9 “अहो लोकांच्या अधिकाऱ्यांनो आणि इस्त्राएलाच्या वडील
चर्चच्या वृद्धांनो, हा जो दुर्बळ व कमजोर आहे त्याकरिता आम्ही केलेल्या चांगल्या कार्याच्या कारणांवरून आमची
विचारपूस केली जाते आणि चौकशी होते आहे, की तो कसा बरा केला गेला! 10 म्हणून तुम्हांला आणि इस्त्राएलाच्या
सर्व लोकांना हे कळावे, की येशू ख्रिस्त नासोरी, ज्यांना तुम्ही क्रूसावर खिळले होते आणि ज्यांना परमेश्वराने मेलेल्यांतून
जिवंत उठविले आहे, त्याच येशू ख्रिस्तांच्या नांवाने हा मनुष्य एकदम ताठ उभा होऊ शकला आहे. 11 हाच दगड इमारत
बनविणाऱ्यांनी (राजमिस्त्री) बेकार व तुच्छ ठरविला होता, तोच आता विशेष महत्वाचा दगड अर्थात खास दगड,
‘कोनशिला’ ठरला आहे. 12 इतर कोणत्याही नांवाने (व्यक्तिद्वारे) उद्धार मिळू शकत नाही, कारण लोकांच्यामध्ये आणि
आकाशाखाली (स्वर्ग) आणखी दुसरे कोणतेही नांव दिलेले नाही, ज्याच्याद्वारे आपले तारण होऊ शकेल.”
13 त्यांनी पेत्र व योहानाचे धाडस पाहिले आणि त्यांना हे देखील कळले की ते निरक्षर, अज्ञानी व साधारण लोक
आहेत. ते आश्चर्यात पडले आणि त्यांनी जाणून घेतले की ते येशूंच्या सहवासात (बरोबर राहत) होते. 14 त्यांचाबरोबर
बरा झालेला मनुष्य उभा होता, ते पाहून शिष्यांविरुद्ध ते काहीही बोलू शकले नाहीत. 15 मग जेव्हा त्यांना आज्ञा केली
गेली की त्यांनी सभेबाहेर जावे, तेव्हा आपसांतच त्यांनी सल्ला केला 16 ते म्हणाले, “या लोकांचे आपण काय करावे?
कारण त्यांनी एक मोठे आश्चर्यकृत्य केलेले होते व हा चमत्कार यरूशलेमेत राहणाऱ्या सर्व लोकांसमोर घडला, म्हणून
तो नाकारलाही जाऊ शकत नाही.” 17 ही गोष्ट लोकात पसरू नये म्हणून आपण त्यांना तशी ताकीद (धमकी) देऊ आणि
खडसावून सांगू, की या नांवाविषयी त्यांनी कोणाकडेच उल्लेख करू नये, बोलू नये.
18 त्यांनी पेत्र आणि योहानाला बोलावून आदेश दिला की येशूंसंबंधी काही बोलू नका, शिकवू नका. 19 परंतु पेत्र आणि
योहानाने उत्तर देत म्हटले, तुम्हीच सांगा, हे बरोबर आणि योग्य आहे काय की आम्ही परमेश्वराचे न ऐकता तुमचे
ऐकावे? 20 कारण असे होणे केवळ अशक्य आहे, (होऊच शकत नाही) की जे आम्ही पाहिले आणि ऐकले, ते सर्व बोलू
नये, सांगू नये.”
21 यास्तव त्यांनी अधिक चेतावणी देऊन त्यांना जाऊ दिले, कारण तेथे जे लोक एकत्र जमले होते त्यांच्यामुळे ते
त्यांना शिक्षा देऊ शकले नाहीत; कारण जे काही झाले होते, त्या सर्व गोष्टींसाठी लोक परमेश्वराची स्तुति करीत होते.
22 कारण ज्या मनुष्याच्या जीवनांत, बरे होण्याचे (करण्याचे) चिन्ह दाखविले गेले होते (हा चमत्कार घडला होता) तो
जवळजवळ चाळीस वर्षांहून अधिक वयाचा होता.
23 तेथून सुटल्यानंतर ते आपल्या लोकांत आले आणि जे काही प्रमुख महायाजक आणि वडील चर्चने त्यांना सांगितले
(ताकीद दिली) होते, त्याविषयी सांगितले. 24 ज्या वेळी त्या सर्वांनी हे वर्तमान ऐकले त्या वेळी ते एकचित्त व एकमनाने
सामूहिक रीतिने मोठ्या बुलंदीने (आवाजात) म्हणाले, “हे प्रभू, आमच्या स्वामी, तूच सृष्टीकर्ता आहेस ज्याने आकाश,
पृथ्वी आणि समुद्र आणि जे काही त्यांत आहे, त्यांची निर्मिती केली. 25 तूच आपला सेवक, आमचा बाप दावीद याच्या
मुखानें म्हणाला आहे, “राष्ट्रांनी संतापाने खवळून विरोध का दाखविला? लोकांनी व्यर्थ योजनांचा (गोष्टींचा) विचार
का केला? 26 पृथ्वीवरचे राजे एक झालेत, शासक एकत्र जमले, प्रभूविरूद्ध आणि ख्रिस्तांविरूद्धही;
27 कारण हेरोद, पंत पिलात गव्हर्नर, गैरयहूदी आणि इस्त्राएली, सर्वचे सर्व तुझा अभिषिक्त आणि पवित्र सेवक यांच्या
विरूद्ध होते. 28 जे काही त्यांनी केले ते सर्व तुझ्या शक्तीने आणि इच्छेने (मति) पूर्वीपासूनच निश्चित झालेच (योजिले
गेले) होते. 29 आता हे प्रभू, आमच्या स्वामी तू त्यांच्या धमकावण्यांकडे लक्ष देऊन असे होऊ दे,की तुझ्या सेवकांनी
मोठ्या धैर्याने व हिंमतीने तुझा संदेश द्यावा (येशू-वार्ता गाजवावी). 30 लोकांना बरें करण्यासाठी आपले हात पुढे कर,
म्हणजे तुझा पवित्र पुत्र येशू यांच्या नांवाने अद्‌भुत चिन्हें व आश्चर्यकर्मे केली जावीत.”
31 ज्याठिकाणी ते सर्व एकत्र जमले होते, त्यांनी प्रार्थना केल्यानंतर ते स्थान हादरले. ते सर्व जण पवित्र आत्म्याने
परिपूर्ण होऊन, परमेश्वराचा संदेश (वचन) अधिक हिंमतीने व धाडसाने देऊ लागले.
32 ज्यांनी विश्वास केला होता, ते सर्व जण एकाच मनाचे व एकजिवाचे होते. त्यांच्यापैकी कोणी असे म्हणत नसे, की
जे काही त्याच्याजवळ आहे ते त्याचे स्वतःचे आहे. सर्व लोकांना सूट होती, की ते सर्वांचे सर्व काही उपभोगू शकत
होते, . 33 प्रेषितांचा समूह, येशूंच्या जिवंत (पुनरूत्थान) होण्याविषयीची साक्ष प्रचंड सामर्थ्याने व भक्कम धैर्याने देत होता.

त्या सर्वांवर मोठ्या कृपेचा जणूकाही वर्षावच झालेला होता. 34 त्यांपैकी कोणीच असा नव्हता, जो गरीब (गरजू) होता,
कारण ज्यांच्याजवळ जमीन किंवा घर होते ते विकून, मिळालेले धन आणीत असत. 35 विकून प्राप्त झालेली संपत्ति, ते
प्रेषितांच्या चरणांशी ठेवीत असत आणि जशी ज्याची गरज होती, त्याप्रमाणे लोकांना वांटून दिले जात असे.
36 योसेफ नावाचा कुप्राचा एक लेवी होता. प्रेषितांनी त्याचे नांव बर्णबा (अर्थात शांतीचा पुत्र) असे ठेविले होते.
37 त्याच्याजवळ काही जमीन होती. त्याने ती विकली आणि त्यापासून मिळालेले रूपये प्रेषितांच्या स्वाधीन करून दिले.

# 5

1 हनन्या नांवाचा एक व्यक्ती आणि त्याची पत्नी सप्पीरा यांनी आपली जमीन विकून टाकली. बायकोच्या संमतीने
(तिला कळवून) त्याने त्यातील काही पैसे आपल्याजवळ ठेविले. 2 त्यातील एक भाग आणून त्यांनी प्रेषितांच्या पायांवर
ठेविला.
3 परंतु पेत्र म्हणाला, ‘हनन्या, सैतानाने तुझे मन (अंतःकरण) का भरून टाकिले, की तू पवित्र आत्म्याशी खोटे बोलावे
आणि लबाडी करावी व जमिनीच्या पैश्यांपैकी काही भाग आपल्याजवळ ठेवून घ्यावा, 4 जेव्हा ती तुझ्याजवळ होती,
तेव्हा तुझ्या स्वतःची नव्हती काय? विकल्यानंतर, या जमिनीचे पैसे तुझ्या मालकीचे नव्हते काय? मग तू आपल्या
अंतःकरणात अशी गोष्ट का येऊ दिली? तू मनुष्यांशी नाही तर परमेश्वराशी खोटे बोलला आहेस.”
5 हे ऐकताच हनन्या खाली पडला आणि मेला. ज्या लोकांनी हे सर्व ऐकले होते ते खूप भ्याले. 6 तरूण उठले, त्यांनी
अर्थी तयार केली आणि त्याला नेऊन पुरलें.
7 तीन तासानंतर त्याची बायको आत आली, परंतु तिला काही ठाऊक नव्हते. 8 पेत्राने तिला विचारले, “मला एक
सांग, की तुम्ही एवढ्या किंमतीतच जमीन विकली होती काय? सफीरा म्हणाली, “होय, एवढ्यातच”,
9 तेव्हा पेत्र तिला म्हणाला, “प्रभूच्या आत्म्याला पारखण्याकरिता तुम्ही दोघे ‘एकमन’ कसे झालात? पहा, तुझ्या
पतिचे शव घेऊन जाणारे आता दाराशीच उभे आहेत आणि ते तुला देखील बाहेर घेऊन जातील.”
10 ताबडतोब ती पेत्राच्या पायावर पडली आणि मेली. तरूण आत आले आणि त्यांनी तिला मेलेले पाहिले आणि
तिच्या पतिच्या कबरेजवळ तिला पुरलें. 11 विश्वासी गट (चर्च) आणि जितक्या लोकांनी याविषयी ऐकले त्या सर्वांवर
भयाची दाट छाया पसरली.
12 आणि लोकांमध्ये प्रेषितांच्या हातून अनेक चमत्कारिक चिन्हें आणि अद्भुत कृत्यें केली जात होती. ते सर्व
प्रार्थनाभवनात (मंदिर) शलमोनाच्या स्तंभावलीत एकमन होऊन एकत्र जमत असत. 13 बाकी लोकांपैकी कोणालाही
त्यांच्याबरोबर सामील होण्याचे धाडस होत नव्हते, परंतु लोक त्यांना थोर जाणून मोठ्या आदरदृष्टीने पाहात असत.
14 पुरूष आणि स्त्रिया यांच्यापैकी पुष्कळ लोक येशूंवर विश्वास ठेवीत असत. 15 बिछाना व खाटेंवर आपल्या
आजाऱ्यांना आणून ते रस्त्यावर ठेवून देत असत, यासाठी की निदान (कमीत कमी) पेत्राची सावली तरी त्यांच्यावर
पडावी. 16 यरूशलेमेच्या आसपासच्या शहरांतून देखील एक मोठा लोकसमुदाय आपल्या त्या रोग्यांना आणीत असे जे
अशुद्ध आत्म्यांद्वारे पिडलेले होते. त्यापैकी प्रत्येकाला बरें केले जात असे.
17 मग महापुरोहितआणि जे सदूकी त्याच्याबारोबर होते, प्रचंड क्रोधाने पेटून उठले आणि बावचळले. 18 त्यांनी
प्रेषितांना अटक केली आणि सार्वजनिक तुरूंगात घालून दिले. 19 परंतु रात्रीच्या समयी प्रभूचा देवदूत तेथे आला आणि
त्याने तुरूंगाचा दरवाजा उघडला आणि त्यांना बाहेर आणून म्हणाला, 20 “जा आणि प्रार्थनाभवनात उभे राहून जीवनाचे
वचन सर्व लोकांना सांगा.”
21 जेव्हा त्यांनी हे ऐकले तेव्हा ते भल्या पहाटे आराधनालयात जाऊन शिकवू लागले. 22 परंतु महापुरोहिताने आणि जे
त्याच्याबरोबर होते, येऊन सभा आणि इस्त्राएली पुढाऱ्यांपुढे त्यांना तुरूंगातून आणण्याचा हुकूम केला, पण जेव्हा
अधिकाऱ्यांनी त्यांना तुरूंगांत पाहिले नाही तेव्हा येऊन अशी खबर दिली, 23 “तुरूंगाच्या दरवाज्यांना कुलपें होती, ते
व्यवस्थित बंद केलेले होते ,तसेच बाहेर दारांवर पहारेकरी तैनात होते, परंतु आत कोणी आढळले नाही.” 24 जेव्हा

मुख्य याजक, मंदिर सुरक्षा दलाचा प्रमुख आणि याजकगण (पुरोहित)या सर्वांना कळले, तेव्हा आता काय होईल हे
त्यांना कळेनासे झाले.
25 त्याच वेळी कोणीतरी येऊन त्यांना म्हणाला, “ऐका ऐका, ज्या लोकांना तुम्ही तुरूगांत टाकले होते, ते
प्रार्थनाभवनात उभे राहून लोकांना शिकवीत आहेत.” 26 तेव्हा सुरक्षा -कप्तानाने कोणत्याही बलाचा प्रयोग न करिता,
त्यांना तेथून आणले, कारण त्यांना अशी भीति होती की लोक त्यांना दगडमार करतील.
27 त्यांना तेथे आणल्यानंतर, सभेसमोर हजर केले गेले आणि मुख्य याजकाने त्यांना प्रश्न विचारला, 28 “आम्ही
तुम्हांला अशी कडक आज्ञा (हुकूम) केली नव्हती काय, की या नांवांने काही शिकवू नका? आणि पहा तुम्ही
यरूशलेमेला आपल्या शिकवणीने भरून टाकले आहे आणि या मनुष्याच्या रक्ताचा दोष आमच्यावर आणू पाहाता?”
29 मग पेत्र आणि दुसऱ्या प्रेषितांनी उत्तर दिले, “आवश्यक (कर्तव्य) हे आहे की आम्ही परमेश्वराची आज्ञा मानावी,
मनुष्यांची नव्हे. 30 आपल्या वाडवडिलांच्या परमेश्वराने येशूंना मेलेल्यांतून जिवंत उठविले ज्याला तुम्ही क्रूसावर खिळून
मारून टाकले, 31 त्यालाच परमेश्वराने प्रभू आणि तारणहार ठरवून, उजव्या हाती (आदर व गौरव ) उच्च स्थान दिले,
यासाठी की इस्त्राएलाला (यहूदी) मन परिवर्तन आणि अपराधांची क्षमा द्यावी. 32 आम्ही आणि पवित्र आत्मा या गोष्टींचे
साक्षी आहोत, अर्थात ते ज्यांना परमेश्वर पवित्र आत्मा देतो, जे त्याचा हुकूम पाळतात.
33 या गोष्टी ऐकून ते संतापले, इतके चिडले की त्यांना मारून टाकण्याची इच्छा बाळगली. 34 तेव्हा सभेत गमलियेल
नांवाच्या नियमशास्त्राच्या उत्तम जाणकाराने -अध्यापकाने, ज्याला लोक सन्मान देत असत उभे राहून असा हुकूम
दिला, की प्रेषितांना काही वेळासाठी बाहेर केले (न्यावे) जावे. 35 तेव्हा तो म्हणाला, “हे इस्त्राएली लोकांनो, जे काही
तुम्ही या लोकांचे करणार आहात, त्याविषयी थोडा लक्षपूर्वक विचार करा. 36 कारण काही समया पूर्वी थुदासाने
आपल्या स्वतःला मोठे ठरवून (मी देखील काही आहे) दावा केला आणि त्याच्याबरोबर चारशे लोक त्याच्या मागोमाग
गेले. तो तर मारला गेलाच, पण त्याचे साथीदार इकडे तिकडे पांगले आणि विखुरले व अशा प्रकारे सर्व काही संपले.
37 त्यानंतरच गालीलांचा यहूदा, जनगणनेच्या समयी पुढे आला आणि त्याने पुष्कळ लोकांना आपल्या पक्षाचा केले. तो
स्वतःतर नाश झालाच आणि ज्यांनी त्याचे ऐकले तेही पांगले. 38 मी आता तुम्हांला म्हणतो की यांच्या मागे लागू नका,
त्यांना तसेच सोडा आणि जाऊ द्या, कारण जर त्यांचे कार्य आणि हेतू, मानवी (किंवा लोकांकडचा) असेल तर सर्व
काही संपून जाईल, 39 परंतु जर ते परमेश्वरातर्फे आहे, तर तुम्ही ते कार्य कधीही संपवू (नष्ट करू) शकणार नाही, पण
कदाचित तुम्ही केवळ परमेश्वराविरूद्ध लढणारे (अर्थात परमेश्वर विरोधीच) ठराल.”
40 हे ऐकून सर्वांनी त्याचे म्हणणे मान्य केले. मग त्यांनी प्रेषितांना बोलाविले आणि त्यांना मारहाण केली, व असा
हुकूम करून सोडून दिले की त्यांनी येशूंविषयी लोकांना शिकवू नये. 41 सभेसमोरून जातांना ते खूप आनंदित होते की
कमीत कमी येशूंच्या नांवाकरिता तरी, त्यांना अपमान व लज्जा सहन करण्याची संधी मिळाली. 42 आणि मग, प्रत्येक
दिवशी प्रार्थनाभवनात (प्रार्थना भवनात), आणि घरोघरी लोकांना येशूंविषयीची वार्ता गाजविण्याचे कार्य त्यांनी
थांबविले व सोडले नाही.

# 6

1 त्या दिवसांत जेव्हा शिष्य संख्येने वाढत चालले होते, तेव्हा ग्रीक बोलणारे यहूदी, इब्री बोलणाऱ्या यहूद्यांविरूद्ध
तक्रार करू लागले. असे यामुळे झाले कारण प्रत्येक दिवशी जे काही वाटले जात असे, त्यांत ग्रीक बोलणाऱ्या
यहूद्यांच्या विधवांना काही मिळत नसे, अर्थात त्या वंचित राहून त्यांची उपेक्षा होत असे. 2 मग बारा प्रेषितांनी
शिष्यसमुदायाला एकेठिकाणी बोलावून म्हटले, “ही गोष्ट विचारांपलिकडची आहे की आपण परमेश्वराचे वचन सोडून
लोकांना भोजनाची वाटणी करीत फिरावे; 3 म्हणून भावांनो, आपल्यांतून सात अशा लोकांची निवड करा, ज्यांची प्रतिष्ठा
व सन्मान आहे जे पवित्र आत्मा आणि ज्ञानाने भरलेले आहेत त्यांनाच हे कार्य सोपवून द्या. 4 मग आपण मात्र, आपला
संपूर्ण समय निरंतर प्रार्थना आणि वचन शिकविण्यात खर्च करू.”

5 ही गोष्ट संपूर्ण चर्चला पसंत पडली. त्यांनी स्तेफनाला जो विश्वासाने व पवित्रात्म्याने भरलेला होता आणि फिलिप्प,
प्रखर, नीकानुर, तीमोन, पार्मिना व अत्युंखीयाचा नीकलाव जो यहूदी मतांत आला होता, यांची निवड केली. 6 या
सर्वांना प्रेषितांपुढे आणले गेले, आणि प्रेषितांनी प्रार्थना करून त्यांच्यावर हात ठेवले. परमेश्वराचे वचन वाढत गेले आणि
यरूशलेमेत शिष्यांची गणना विपुल होऊ लागली.
7 याजकांच्या एका मोठ्यासमूहाने देखील येशूंना ग्रहण केले.
8 स्तेफन अनुग्रह आणि सामर्थ्याने भरून लोकांमध्ये मोठी अद्‌भुत कृत्यें व चिन्हें करीत होता. 9 मग निघून गेलेल्या
लोकांचे जे आराधनालय म्हणविले जात होते, त्या आराधनालयातील काही लोक विरूद्ध उठले (विरोध केला) .
यांच्यातीलच आलेक्सांद्रियेकर, किलिकिया व आसीयातील लोक स्तेफनाशी वादविवाद करू लागले. 10 परंतु ज्या
ज्ञानाने व आत्म्याने तो बोलत होता, त्यापुढे त्यांचा टिकाव लागला नाही.
11 म्हणून त्यांनी काही लोकांना असे म्हणण्यासाठी फूस व उभारी दिली (त्यांनी भाग पाडले), की “आम्ही त्याला
परमेश्वर याहवे आणि मोशेविरूद्ध बोलतांना ऐकले आहे”
12 त्यांनी लोकांना, वडिलांना आणि नियमशास्त्र शिकविणाऱ्यांना चेतविल्यामुळे ते त्याला धरून महासभेसमोर घेऊन
आले. 13 तेव्हा त्यांनी खोटे साक्षीदार बोलाविले, ज्यांनी म्हटले, “हा मनुष्य पवित्र स्थान आणि नियमशास्त्राविरूद्ध
बोलण्याचे सोडीतच नाही. 14 कारण आम्ही त्याला असे म्हणतांना ऐकले आहे, की नासरेथकर येशू हे भवन नष्ट करून
टाकतील आणि आपल्याला मोशेकडून मिळालेले रीतिविधी बदलून टाकतील.”
15 मग प्रत्येक जण जो महासभेत बसलेला होता, त्यांनी त्याचे मुख देवदूतासारखे चमकलेले पाहिले.

# 7

1 मग महायाजक म्हणाला, “अशी गोष्ट आहे काय?”
2 त्याने उत्तर दिले, लोकहो, भावांनो आणि वडिलांनो ऐका. हारानांत जाण्यापूर्वी, जेव्हा अब्राहाम मेसोपटेम्यांत होता,
त्या समयी ‘महिमामय परमेश्वर’ त्यावर प्रगट झाला. 3 परमेश्वर त्याला म्हणाला, “आपला देश व आपले लोक (नातलग)
सोडून नीघ आणि त्या ठिकाणी जा, जे मी तुला दाखवीन.”
4 मग तो खास्दयांच्या देशातून बाहेर पडला आणि हारानांत राहू लागला. जेव्हा त्याचा बाप मेला, तेव्हा परमेश्वराने
त्याला या ठिकाणी, जेथे आता तुम्ही आहा बोलावून घेतले. 5 पण त्याला काहीही वतन दिले नव्हते, म्हणजे पाय
ठेवण्याची जागा देखील नाही. परंतु याहवेने प्रतिज्ञा त्याचाशी केली की तो त्याला आणि त्याच्या वंशाला ही जमीन
(देश) देईल. त्या वेळी अब्राहामाला संतान नव्हते. 6 परमेश्वर त्याला म्हणाला,” की त्याचा वंश दुसऱ्या देशात उपरी
(परदेशीय) होईल. तेथील लोक त्यांना 400 वर्षांपर्यंत गुलाम करून ठेवतील आणि त्यांच्याशी वाईट व्यवहार (छळ)
करतील. 7 ज्या देशाचे ते गुलाम होतील, त्या देशाला मी शिक्षा देईन. नंतर ते बाहेर निघून येतील आणि याठिकाणी माझी
सेवा करतील.” 8 परमेश्वराने त्याला ‘सुंतेचा करार’ दिला. म्हणून अब्राहामाला जेव्हा इसहाक झाला तेव्हा त्याने
आठव्या दिवशी त्याची सुंता केली. इसहाक, याकोबाचा पिता झाला आणि याकोब बारा पूर्वजांचा पिता झाला.
9 कुलपती (याकोबाची मुलें) ईर्ष्येने व हेव्याने पेटले आणि त्यांनी योसेफाला मिसर देशात जाणाऱ्यांच्या हाती विकून
टाकले, परंतु परमेश्वर त्याच्याबरोबर होता. 10 आणि मग परमेश्वराने त्याला त्याच्या सर्व संकटातून सोडवून घेतले आणि
फारो राजासमोर अनुग्रह आणि बुद्धि दिली. म्हणून त्याने त्याला मिसर आणि आपल्या कुटुंबावर अधिकारी म्हणून नेमले.
11 मग मिसर आणि कनान देशात दुष्काळ पडला आणि मोठी समस्या निर्माण झाली व आपल्या पूर्वजांना अन्नधान्य
मिळेनासे झाले. 12 जेव्हा याकोबाने ऐकले की मिसर देशात अन्नधान्य आहे, त्याने पहिल्यांदा आपल्या पूर्वजांना
(याकोबाची मुलें) तेथे पाठविले. 13 दुसऱ्यांदा, योसेफाने स्वतःला आपल्या भावांवर प्रगट केले. त्यामुळे फारो राजाला,
योसेफाच्या जातीविषयी कळले. 14 मग योसेफाने आपला बाप याकोब आणि त्याचे संपूर्ण घराणे, ज्यांत सुमारे पंच्याहत्तर
माणसें होती त्यांना बोलाविले. 15 याकोब मिसर देशात गेला, तेथेच तो व आपले दुसरे पूर्वज मरण पावले. 16 त्या सर्वांचे

मृत देह, शखेमांत नेऊन त्या कबरेत ठेवले, जी अब्राहामाने शखेमाचा प्रमुख, हमोरच्या पुत्रांपासून पैश्याने विकत घेतली
होती.
17 परंतु जेव्हा अब्राहामाशी केलेली प्रतिज्ञा पूर्ण होण्याचा समय आला, मिसर देशात त्या लोकांची संख्या भक्कम झाली
आणि ते विपुल झाले. 18 त्यानंतर एक दुसरा राजा गादीवर बसला, जो योसेफाला ओळखीत नव्हता. 19 त्याने आपल्या
लोकांशी वाईट व्यवहार आणि आपल्या पूर्वजांशी दुष्टाई केली, आणि त्यांना भाग पाडले की त्यांनी त्यांची बाळके जगू
नयेत म्हणून ती फेकून द्यावीत.
20 त्याच समयी मोशेचा जन्म झाला. परमेश्वराच्या दृष्टीत मोशे अतिशय सुंदर होता. त्याच्या बापाच्या घरी, तीन महिने
त्याचे पालनपोषण झाले. 21 जेव्हा त्याला फेकून दिले, तेव्हा फारोची कन्या त्याला उचलून घेऊन गेली आणि आपल्या
मुलासारखे त्याचे पोषण व संगोपन केले. 22 मोशेला, मिसरी लोकांची एकूण एक विद्या शिकविली गेली. तो आपल्या
संभाषणात व कार्यांत बहुत सामर्थी (बलवान) होता.
23 जेव्हा तो चाळीस वर्षांचा झाला तेव्हा त्याच्या मनात आले, की त्याने इस्त्राएली लोकांची म्हणजे आपल्या भावांची
भेट घ्यावी. 24 त्यांपैकी एकाचा छळ होतांना पाहून, त्याने भावाला वाचविण्याकरिता आणि सूड घेण्याच्या प्रयत्नात,
एका मिसऱ्याला असे मारिले की तो मेलाच. 25 त्याने विचार केला होता, की त्याचे भाऊबंद त्याला समजू शकतील की
परमेश्वर त्याच्याद्वारे त्यांना सोडवून घेईल, पण ते असे समजू शकले नाहीत. 26 पुढच्या दिवशी जेव्हा दोन इस्त्राएली
आपसात भांडत होते, त्याने असे म्हणून त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला, “तुम्ही आपसांत भाऊ आहां, एक
दुसऱ्याला त्रास कां देत आहा, एकमेकांचे नुकसान करू नका.”
27 परंतु जो आपल्या शेजाऱ्यावर अन्याय करीत होता, तो त्याला म्हणाला, “आमच्यावर तुला कोणी अधिकारी व
न्यायाधीश ठरविले (नेमले)आहे?” 28 जसे तू त्या मिसऱ्याला मारून टाकले तसेच मलाही मारून टाकशील काय? 29 हे
ऐकताच मोशे तेथून पळाला आणि मिद्यान देशास निघून गेला आणि तेथे परदेशीयांसारखा राहिला. तेथे त्याला दोन मुलें
(पुत्र) झाली.
30 जेव्हा चाळीस वर्षे भरली, तेव्हा सीनाय पर्वतांच्या जंगलात एका झुडपाच्या अग्निज्वालेमध्ये त्याला परमेश्वराचा
एक देवदूत दिसला. 31 हे पाहून मोशे आश्चर्यचकित झाला व ते पाहण्यासाठी तो जवळ गेला. तेव्हा त्याने परमेश्वराची
वाणी ऐकली, 32 “मी तुझ्या पूर्वजांचा, अब्राहम, इसहाक व याकोबाचा परमेश्वर आहे”, मोशे घाबरला आणि तिकडे
पाहण्याची त्याने हिंमत केली नाही.
33 मग परमेश्वर त्याला म्हणाला, “आपल्या पायांतले जोडे काढ, कारण ज्या जागेवर तू उभा आहेस ती पवित्र जागा
आहे; 34 मी पाहिले आहे होय, मी मिसर देशात, आपल्या लोकांवर होणार अत्याचार व छळ पाहिला आहे, आणि त्यांचे
कण्हणे मी ऐकले आहे. मी त्यांना सोडविण्यासाठी खाली उतरलो आहे आणि तुला मिसर देशात पाठवीन.”
35 हा तोच आहे ज्याला असे बोलून इब्री लोकांनी झिडकारले (तुच्छ जाणले)होते ,की “आमच्यावर तुला कोणी
न्यायाधीश नेमले आहे?” हाच तो मोशे आहे ज्याला परमेश्वराने त्या देवदूताद्वारे जो त्या झुडपांत दिसला होता, त्याच्या
हातांद्वारे मिसरच्या गुलामीच्या बंधनांतून मुक्ति देण्यासाठी आणि न्यायाधीश होण्यासाठी पाठविले होते. 36 मिसर,
तांबडा समुद्र आणि चाळीस वर्षें जंगलातील अद्‌भुतें आणि चमत्कारिक चिन्हें दाखविल्यानंतर त्याने त्या लोकांना
बाहेर काढले.
37 हा तोच मोशे आहे, ज्याने इस्त्राएली लोकांना म्हटले, “की तुमच्या भावांतूनच (मधून) परमेश्वर तुमच्याकरिता
माझ्यासारखा एक संदेष्टा उभा करील.” 38 हा तोच आहे जो जंगलात सभेमध्ये (लोकसमुदाय) त्या देवदूताबरोबर होता,
ज्याने सीनाय पर्वतावर त्याच्याशी संभाषण केले होते, आणि आमच्या पूर्वजांबरोबर त्यालाच जिवंत वचन (संदेश)
मिळाले की ते त्याने आम्हांपर्यंत पोचते करावे.
39 आमच्या पूर्वजांनी त्याचे ऐकले नाही, त्याला तुच्छ लेखून (ते) आपल्या अंतःकरणात पुन्हा मिसर देशाकडे वळले.
40 ते अहरोनाला म्हणाले, “आमचे मार्गदर्शन करण्यासाठी आमच्याकरिता देवता तयार कर, कारण आम्हांला ठाऊक
नाही की मोशे ज्याने आम्हांला मिसर देशातून बाहेर काढले होते तो कोठे गेला आहे. 41 त्या समयी, त्या लोकांनी

वासराची मूर्ति बनविली आणि तिच्यापुढे बलिदान अर्पण केले . ते आपल्या हातच्या कामाविषयी खुश होते, 42 जसे
संदेष्टयांच्या पुस्तकांत लिहिले आहे, ‘मग परमेश्वर त्या लोकांवर रागावला (पाठ फिरविली) आणि त्यांना
आकाशांतील ताऱ्यांची उपासना करण्याकरिता सोडून दिले’ आणि म्हटले, “हे इस्त्राएलाच्या घराण्या, जंगलात चाळीस
वर्षे तुम्ही वध केलेले पशू, आणि बलिदान, माझ्याकरिता केले होते काय? 43 तुम्ही मोलखाचा तंबू आणि रेफान
देवताचा तारा आणि मूर्तींची उपासना करण्यासाठी त्या ठेवून घेतल्या; म्हणून मी तुम्हांला बाबेलापर्यंत घेऊन जाईन.”
44 जंगलात आपल्या पूर्वजांजवळ साक्षीचा असा तंबू होता, जसा मोशेला करण्याचा आदेश दिला होता अर्थात ‘जसा
तू पाहिला आहेस, त्याच नमून्याप्रमाणे कर.’ 45 तो तंबू प्राप्त करून, आपले पूर्वज यहोशवाबरोबर गैरयहूदीयांच्या देशांत
आले. परमेश्वराने आपल्या पूर्वजांसमोरून जी राष्ट्रें धुडकावून घालवून दिली होती, त्यांनी त्या देशावर ताबा मिळविला
आणि तो तंबू दावीदाच्या काळापर्यंत राहिला. 46 परमेश्वराची कृपादृष्टी दावीदावर होती, त्याने अशी प्रार्थना केली की,
“त्याला याकोबाच्या परमेश्वराकरिता निवासस्थान तयार करिता यावे; 47 परंतु शलमोन ते निवासस्थान बांधू शकला.
48 सर्वशक्तिमान, सर्वसामर्थी, हातांनी बांधलेल्या भवनात रहात नाही, जसे संदेष्टयाने म्हटले आहे : 49 प्रभू म्हणतो,
की “स्वर्ग माझे राजासन आहे, पृथ्वी माझ्या पायांचे पदासन आहे; माझ्याकरिता तुम्ही कशाप्रकारचे भवन बांधाल
आणि माझ्या विसाव्याचे स्थान कोणते असणार? 50 माझ्या हातांनीच हे सर्व काही बनविले (रचले)नाही काय? “
51 तुम्ही हट्टी लोक आहा, ज्यांच्या कानांवर आणि मनांवर थर जमलेले आहेत, तुम्ही नेहमी पवित्र आत्म्याशी भांडत
असता. तुम्ही अगदी आपल्या पूर्वजांसारखे आहा. 52 असे कोणते संदेष्टे होते ज्यांना तुमच्या पूर्वजांनी छळले नव्हते?
त्यांनी त्यांना मारून टाकले ज्यांनी त्या नीतिमान पुरूषाच्या येण्याविषयी भविष्यवाणी केली होती आणि आता तुम्ही
देखील त्यांना धरून देणारे व मारून टाकणारे झाला. 53 देवदूतांद्वारे दिले गेलेले (ठरविलेले) नियमशास्त्र तुम्ही प्राप्त
केले, परंतु त्या हिशेबाने केले नाही.
54 जेव्हा ऐकणाऱ्यांनी हे सर्व ऐकले तेव्हा ते अस्वस्थ झाले (ईर्षा झाली) आणि ते त्याच्यावर दांतओठ खाऊ लागले.
55 पण पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन जेव्हा त्याने वर स्वर्गाकडे पाहिले तेव्हा त्याला परमेश्वराचे गौरव दिसले, जेथे
परमेश्वराच्या उजवीकडे (परमेश्वरी अधिकाराबरोबर) येशू ख्रिस्त उभे होते. 56 तो म्हणाला, “पहा, मी स्वर्ग उघडलेला
आणि मनुष्याचा पुत्र परमेश्वराच्या संपूर्ण अधिकारांसमवेत उभा असलेला पाहतो आहे”.
57 तेव्हा त्यांनी आपआपले कान बंद केले आणि मोठ्याने ओरडले व एकजूट होऊन त्याच्यावर धावले. 58 त्याला
शहराच्या बाहेर फरफटत ओढत घेऊन गेले, आणि दगडमार करू लागले. तेथे शौल नांवाच्या एका मनुष्याच्या
पायांजवळ साक्षीदारांनी आपले कपडे ठेवले होते.
59 ज्या वेळी तो परमेश्वराचा धावा करून असे म्हणत होता, “येशू स्वामी, माझ्या आत्म्याचा स्वीकार करा” त्या वेळी
त्याच्यावर दगड फेकले जात होते. 60 तेथे त्याने गुडघे टेकले आणि मोठ्या उंच आवाजात ओरडला, “स्वामी, हा
अपराध त्यांच्या नांवावर लावू नका” असे म्हटल्यानंतर तो मेल्यासारखा झाला (मेला) आणि शौल त्याच्या वधात
सामील होता.

# 8

1 त्या दिवशी यरूशलेमेच्या चर्चविरूद्ध मोठ्या छळाचा आरंभ झाला. प्रेषित वगळता सर्व विश्वासीं यहूदीया व
शोमरोनात पांगले. 2 काही भक्त स्तेफनाला पुरण्याकरिता घेऊन गेले आणि खूप रडले. 3 शौलाविषयी म्हटल्यास तो
चर्चवर जुलूम करू लागला, करीत राहिला; घरांत जाऊन तो लोकांना ओढून बाहेर आणीत असे आणि त्यांना तुरूगांत
टाकीत असे.
4 या कारणास्तव ते सर्व जे इकडे तिकडे पांगलेल्या दशेत होते, ते येशू-वार्ता गाजवीत चारीं बाजूंना पोचले. 5 त्या
वेळी फिलिप्प, शोमरोन शहरात गेला आणि त्याने त्या लोकांना ख्रिस्तांविषयी वार्ता सांगितली. 6 जो संदेश फिलिप्पाने
लोकांना दिला आणि जी अद्भुत कृत्यें त्याने केली ती पाहून लोकांनी एकमन होऊन संदेशाकडे लक्ष दिले. 7 पुष्कळ

लोकांतून अशुद्ध आत्में किंचाळीत, मोठ्या आवाजाने ओरडून बाहेर निघाले, जे अपंग व लंगडे होते त्यांपैकी अनेक
माणसें बरी झाली; [8] सर्व शहर आनंदाने भरून गेले.
[9] शिमोन नांवाचा एक मनुष्य त्या शहरात जादूटोणा करीत असे. तो असा दावा करीत असे की मी कोणी तरी मोठा
आहे, शोमरोनाच्या लोकांना तो आपल्या जादूगिरीने आश्चर्याने थक्क करून सोडीत असे. [10] लहान आणि मोठे सर्वच
त्याला म्हणाले, “हा मनुष्य परमेश्वराची ती शक्ति आहे जिला महाशक्ति असे म्हणतात.” [11] बऱ्याच समयापासून ते
त्याचा मोठा आदर सन्मान करीत राहिलेले होते, कारण त्याने आपल्या जादूने लोकांना मोहित करून ठेवले होते.
[12] आणि मग असे झाले की त्यांनी परमेश्वराच्या राज्याची येशू-वार्ता ऐकली आणि फिलिप्पाने सांगितलेल्या वचनांवर
आणि येशू ख्रिस्तांच्या नांवावर विश्वास ठेवला आणि मग स्त्रीपुरूषांचा बाप्तिस्मा झाला. [13] स्वतः शिमोनाने देखील
विश्वास धरला, बाप्तिस्मा घेतल्यानंतर तो फिलिप्पाबरोबर वावरू लागला. मोठमोठी महत्कृत्यें (महापराक्रमाची कार्यें)
आणि चिन्हें पाहून तो आश्चर्याने भरून जात असे.
[14] ज्या वेळी यरूशलेमेच्या प्रेषितांनी ऐकले, की कशा प्रकारे शोमरोनाच्या लोकांनी वचनांचा स्वीकार केला आहे,
तेव्हा त्यांनी पेत्र आणि योहानाला त्यांच्याकडे पाठविले. [15] तेथे पोचल्यानंतर पेत्र व योहानाने प्रार्थना केली, की त्या
लोकांना पवित्र आत्मा मिळावा. [16] कारण अजूनही त्यांच्यापैकी कोणावर देखील तो उतरला नव्हता. त्यांचा केवळ येशू
ख्रिस्तांच्या नांवात बाप्तिस्मा केला होता. [17] मग त्यांनी त्या लोकांवर हात ठेवले आणि त्यांनी पवित्र आत्मा मिळविला.
[18] शिमोनाने पाहिले होते की प्रेषितांनी हात ठेवल्यामुळे पवित्र आत्मा मिळतो, [19] तेव्हा तो रूपये घेऊन आला आणि
म्हणाला, “मला देखील हा अधिकार द्या, की ज्या कोणावर मी हात ठेवीन त्याला पवित्र आत्मा मिळावा.”
[20] पण पेत्र म्हणाला, “तुझा पैसा तुझ्याबरोबर नाश होवो, कारण तू असा विचार करितोस की परमेश्वराचे वरदान
पैश्याने विकत घेतले जाऊ शकते. [21] याविषयी तुझा कोणताच भाग (हिस्सा) नाहीये, कारण तुझे अंतःकरण
परमेश्वराच्या दृष्टीत नीट व बरोबर नाहीये. [22] म्हणून आपल्या अंतःकरणाच्या आत असलेल्या या दुष्टाईपासून वळ,
पश्चात्ताप कर आणि परमेश्वराजवळ प्रार्थना कर; कदाचित तुझ्या मनात येणाऱ्या विचारांची तुला माफी मिळून जाईल.
[23] कारण मी पाहतो आहे, की तू पित्तासारख्या कडूपणात आणि दुष्टाईच्या बंधनात जखडलेला आहेस”
[24] मग शिमोनाने उत्तर दिले, “माझ्याकरिता प्रभूकडे विनंती कर, की ज्या गोष्टी तुम्ही सांगितल्या आहे त्या माझ्यावर
येऊ नयेत.”
[25] जेव्हा त्यांनी साक्ष दिली आणि परमेश्वराचे वचन सांगितले, तेव्हा शोमरोनाच्या पुष्कळ गावांत येशू-वार्ता गाजवीत
ते यरूशलेमेत परत आले.
[26] प्रभूच्या देवदूताने फिलिप्पाला म्हटले, “ऊठ, दक्षिणेकडे जी वाट यरूशलेमेतून गज्जाकडे जाते, आणि जी
वाळवंटाच्या ओसाड प्रदेशात आहे तेथे जा.” [27] ✦फिलिप्प उठला आणि तेथून निघाला. त्याने त्या वाटेंवर एक
इथयोपियन (कुशी) मनुष्य पाहिला. त्याला इथयोपियाच्या राणीकडून अधिकार प्राप्त झाला होता. तो राणीच्या
खजिन्याचा मालक (कारभारी) होता, आणि आराधना करण्यासाठी यरूशलेमेस आला होता. [28] तो यशया संदेष्टयाचे
पुस्तक वाचीत रथात बसून जात होता, [29] तेव्हा आत्म्याने फिलिप्पाने म्हटले, “या रथाजवळ जा”
[30] फिलिप्प त्या दिशेने धावला आणि तो यशया संदेष्टयाचे पुस्तक वाचीत आहे हे पाहून त्याला म्हणाला, “जे काही
तू वाचीत आहेस, ते तुला समजत तरी आहे काय?”
[31] तो म्हणाला, “जोपर्यंत मला कोणी समजावीत नाही तोपर्यंत मी ते कसे समजू शकणार?” मग त्याने फिलिप्पाला
आपल्याजवळ बसावयास बोलाविले.
[32] पवित्रशास्त्रामधून (बायबल) तो जे वाचीत होता ते असे होते : ‘तो वधासाठी जाणाऱ्या मेंढरांसारखा नेला गेला;
ज्या प्रकारे कोंकरू लोकर कातरणाऱ्यापुढे गप्प असते, तसेच त्याने (येशूंनी) आपले तोंड उघडले नाही. [33] त्याच्या
दैन्यावस्थेत त्याला न्याय मिळू शकला नाही आणि त्याच्या पिढीच्या लोकांचे वर्णन कोण करील, कारण पृथ्वीवरून
त्याचा प्राण उचलून घेतला जातो आहे.”

---

✦**8.27**

[34] तेव्हा तो इथयोपियन पुरूष त्याला म्हणाला, “मला एक सांग की संदेष्टा याठिकाणी कोणाविषयी म्हणतो आहे,
आपल्याविषयी किंवा आणखी कोणा दुसऱ्याविषयी?” [35] मग फिलिप्पाने सांगावयास आरंभ केला आणि त्याच
भागांतून येशू ख्रिस्तांविषयी सांगितले,
[36] वाटेने जातांना ते पाण्याच्या जागेवर आले, तेव्हा इथयोपियन त्याला म्हणाला “पहा, याठिकाणी खूप पाणी
आहे,येथेच मी बाप्तिस्मा का बरे घेऊ शकणार नाही?” [37] फिलिप्प त्याला म्हणाला, “जर तू संपूर्ण अंतःकरणाने विश्वास
बाळगतो, तर तुला बाप्तिस्मा दिला जाऊ शकतो.” तो म्हणाला, “माझा पुरेपूर विश्वास हाच आहे की येशू ख्रिस्त
परमेश्वराचा पुत्र आहे.” [38] मग फिलिप्पाने रथ थांबविण्यास सांगितले. फिलिप्प आणि इथयोपियन, दोघे पाण्यात उतरले,
आणि फिलिप्पाने त्याला बाप्तिस्मा दिला. [39] ज्या वेळी ते पाण्यातून बाहेर आले, प्रभूचा आत्मा फिलिप्पाला कोठेतरी
उचलून घेऊन गेला. यानंतर, इथयोपियन मनुष्याने फिलिप्पाला कधीच पाहिले नाही, आणि तो आनंदाने भरून आपल्या
वाटेने निघून गेला. [40] परंतु फिलिप्प अजोतच्या भागात आला. त्या क्षेत्रातून जाताना कैसरीया येथे पोचेपर्यंत तेथील सर्व
नगरात तो येशू-वार्ता गाजवीत राहिला.

# 9

[1] येशू ख्रिस्तांच्या शिष्यांना धमकाविल्यानंतर आणि त्यांना जिवें मारल्यानंतर शौल प्रमुख याजकाकडे पोचला. [2] त्याने
दिमिष्कातील आराधनालयांकरितांची अनुमति पत्रें मागितली, यासाठी की येशूंचे अनुसरण करणारे स्त्रीपुरूष बांधून
त्यांना यरूशलेमेस आणले जावे. [3] तो दिमिष्काजवळ पोचला होताच, की इतक्यात अचानक त्याच्या चारीं बाजूला
आकाशांतून प्रकाश चकाकला. [4] तो जमिनीवर पडला आणि त्याने ही वाणी ऐकली, ‘शौला, शौला, तू मला का पीडा
देत आहेस.’
[5] तो म्हणाला, “आपण कोण आहात प्रभू!” येशू त्याला म्हणाले, “मी येशू आहे, ज्याला तू पीडा देतो आहेस;”
[6] येशू त्याला म्हणाले, “ऊठ आणि शहरात जा आणि तुला सांगितले जाईल की तू काय करावयाचे आहेस.”
[7] जे लोक त्याच्याबरोबर यात्रा करीत होते ते तोंड बंद करून उभे राहिले. ते आवाज तर ऐकीत होते, पण त्यांना
काहीही दिसत नव्हते. [8] शौल जमिनीवरून उठला आणि जेव्हा त्याने आपले डोळे उघडिले तेव्हा तो काहीच पाहू
शकत नव्हता; त्याच्याबरोबर जे होते त्यांनी त्याचा हात धरून त्याला दिमिष्कापर्यंत आणले. [9] तीन दिवस तो काहीच
पाहू शकला नाही, किंवा त्या दिवसांत त्याने काही खाल्ले सुद्धा नाही.
[10] दिमिष्कात हनन्या नांवाचा येशूंचा एक शिष्य होता, एका दर्शनात येशू त्याला म्हणाले, “हनन्या!” उत्तर देऊन तो
म्हणाला, “हा, मी येथे आहे प्रभू”.
[11] येशू त्याला म्हणाले, “ऊठ आणि त्या रस्त्याकडे जा, ज्याला ‘नीट’ असे म्हणतात; तेथे यहूदाच्या घरी, तार्साच्या
शौलाविषयी विचारपूस कर, तो प्रार्थना करीत आहे.” [12] त्याने दर्शनात हनन्या नांवाचा पुरूष त्याच्यावर हात ठेवून
प्रार्थना करीतो आहे, असे पाहिले आहे;यासाठी की त्याला पुन्हा पाहता यावे (डोळस व्हावे).
[13] मग हनन्याने उत्तर दिले, “प्रभू या मनुष्याविषयी मी पुष्कळांकडून ऐकलेले आहे. ते हेच की हा मनुष्य यरूशलेमेच्या
संतांशी वाईट व्यवहार करितो; [14] याठिकाणी तो याजकाच्या अधिकारांसमवेत यासाठीच आलेला आहे, की जे लोक
आपले नांव घेतात, त्यांना साखळीने बांधावे.”
[15] पण येशू त्याला म्हणाले, “जा, कारण तो माझा ‘निवडलेला’ मनुष्य आहे, (यासाठी) की त्याने राजे आणि इस्त्राएली
लोकांसमोर माझी साक्ष द्यावी; [16] मी त्याला शिकवीन की माझ्या नांवाकरिता त्याला किती दुःख भोगावे लागेल.”
[17] हनन्या निघाला व त्याने त्या घरात प्रवेश केला, आणि आपले हात त्याच्यावर ठेवले तो म्हणाला, “भाऊ शौला
,प्रभू येशूंनी, जे तुला वाटेने जात असता दिसले होते, (तुला दर्शन दिले होते) मला तुझ्याजवळ पाठविलेले आहे की तुला
पुन्हा दृष्टि यावी (तुझे डोळे उघडावेत) आणि तू पवित्र आत्म्याने भरून जावे.” [18] त्याच क्षणी त्याच्या डोळयांवरून
खपल्यांसारखे काही पडले आणि त्याच्या डोळयांत पुन्हा प्रकाश आला, तो उठला आणि त्याचा बाप्तिस्मा केला गेला.

19 जेव्हा त्याने अन्न खाल्ले, तेव्हा त्याला शक्ति प्राप्त झाली, मग तो त्या शिष्यांबरोबर थांबला जे दिमिष्कात होते.
20 लगेच तो आराधनालयात जाऊन असा संदेश देऊ लागला, की येशू ख्रिस्त परमेश्वराचा पुत्र आहे. 21 पण जितक्यांनी
ते ऐकले, ते सर्व आश्चर्याने थक्क झाले आणि म्हणाले, “हा तोच नव्हे काय जो यरूशलेमेत येशूंचे नांव घेणाऱ्यांना
(त्यांच्या लोकांना) नाश करीत असे, येथे तो याच हेतूने आला आहे ना, की अशा लोकांना मुख्ययाजकांकडे साखळीने
बांधून नेता यावे?” 22 परंतु शौल आणखी सामर्थी होत गेला आणि तो दिमिष्कात राहणाऱ्या यहूद्यांना प्रमाण देत राहिला
की येशूच ख्रिस्त आहेत.
23 बऱ्याच दिवसांनंतर यहूद्यांनी त्याला ठार मारण्याचा बेत केला. 24 पण पौलाला या गोष्टीची खबर लागली की ते
रात्रंदिवस फाटकाशी पाळत देत आहेत; संधिच्या शोधात बसलेले आहेत, की कसेही का होईना पौलाला कशा प्रकारे
संपविले जावे. 25 तेव्हा शिष्यांनी रात्री टोपलीत बसवून भिंतीवरून लटकवून खाली सोडले व त्याला बाहेर केले.
26 जेव्हा शौल यरूशलेमेत आला, त्याने पूर्ण (भरसक) प्रयत्न केला की, शिष्यांबरोबर मिसळावे, पण ते सर्व जण
त्याला भीत होते व त्यांचा विश्वासच बसत नव्हता की शौल येशूंचा शिष्य झाला आहे. 27 परंतु बर्णबा त्याला घेऊन
प्रेषितांकडे आला आणि त्यांना सांगितले की कशा प्रकारे शौलाला दिमिष्काकडे जातांना रस्त्यावर येशूंचे दर्शन झाले; हे
देखील की येशू त्याच्याशी बोलले आणि त्याने येशूंच्या नांवाने दिमिष्कात कशा प्रकारे धाडसाने संदेश दिला. 28 तो
त्यांच्याबरोबर यरूशलेमेत राहिला आणि त्यांच्याबरोबर येत-जात राहिला, 29 येशूंविषयी तो मोठ्या हिंमतीने व बहादुरीने
बोलत राहिला. तो ग्रीक बोलणाऱ्या यहूदी लोकांशी वादविवाद करीत राहिला, म्हणून ते लोक त्याला मारण्याची योजना
(इच्छा) करू लागले होते. 30 जेव्हा भावांना याविषयी कळले, तेव्हा ते त्याला कैसरीयात घेऊन आले आणि नंतर
त्याला तार्सास पाठविले.
31 संपूर्ण यहूदीया, गालील आणि शोमरोनात चर्चमध्ये शांति स्थिर झाली, मजबूती मिळत गेली आणि प्रभूच्या भयात व
पवित्र आत्म्याच्या शांतीत, चर्च संख्येत देखील वाढत गेले.
32 ज्या वेळी पेत्र देशाच्या त्या भागांतून फिरत निघाला, त्या वेळी तो लोद येथे राहणाऱ्या संतांशी भेटला. 33 तेथे त्याने
ऐनेयास नांवाचा एक मनुष्य पाहिला, जो अपंग होता आणि आठ वर्षांपासून बिछान्याला खिळलेला होता. 34 पेत्राने
त्याला म्हटले, “ऐनेयास, येशू ख्रिस्त तुला बरे करितात, ऊठ आणि आपला बिछाना नीट कर”. तो लगेच उठून बसला.
35 ते सर्व लोक जे लोद आणि शारोनात होते, त्यांनी त्याला पाहून येशूंवर विश्वास ठेवला.
36 यापोमध्ये टबीथा उर्फ दुर्कस नांवाची एक शिष्या होती. ही स्त्री दुसऱ्यांची खूप मदत (भलेपणाची कृत्यें आणि दान)
करीत असे. 37 त्या दिवसांत आजारी झाल्यानंतर ती मेली. तिला आंघोळ घालून झाल्यानंतर वरच्या खोलीत ठेवले.
38 लोद, यापोजवळ असल्यामुळे शिष्यांना कळले होते, की पेत्र तेथे आहे म्हणून त्यांनी तेथे दोन व्यक्ती पाठविले की
पेत्राने उशीर न करता लवकर यावे.
39 पेत्र उठला आणि त्यांच्याबरोबर निघाला; जेव्हा तो तेथे पोचला, ते त्याला वरच्या खोलीत घेऊन गेले. सर्व विधवा
तिच्याजवळ उभ्या राहून रडत होत्या. दुर्कसने आपल्या जीवनकाळी जे कपडे शिवले होते, ते त्यांनी पेत्राला दाखविले.
40 मग पेत्राने त्या सर्वांना बाहेर काढले, गुडघ्यांवर बसून त्याने प्रार्थना केली. त्या शवाकडे पाहून तो म्हणाला,
“टबीथे ऊठ”; तिने आपले डोळे उघडिले आणि जेव्हा तिने पेत्राला पाहिले तेव्हा ती उठून बसली. 41 पेत्राने आपले हात
तिच्याकडे केले व तिला उठवून उभे केले. 42 ही गोष्ट संपूर्ण यापोंत पसरली आणि अनेकांनी येशूंवर विश्वास ठेविला.
43 नंतर असे झाले, की यापो येथे शिमोन नांवाच्या कातडयाचे काम करणाऱ्या एका चांभाराकडे तो बरेच दिवस
राहिला.

# 10

1 कैसरीयात कर्नेल्य नांवाचा एक पुरूष होता. तो इटलिक रेजिमेण्टचा (पलटन) प्रमुख होता. 2 तो सज्जन व भक्त
मनुष्य असून आपल्या कुटुंबासमवेत परमेश्वराचा आदर सन्मान करणारा व्यक्ती होता. तो यहूदी लोकांना भरपूर दान देत

असे. त्याचे जीवन प्रार्थनामय होते. 3 दुपारी तीन वाजता त्याने एक दर्शन पाहिले; त्यात एक देवदूत येऊन असे बोलतांना
त्याने ऐकला, ‘कर्नेल्या ’!
4 त्याला पाहताच तो प्रचंड भ्याला आणि म्हणाला, “हे काय आहे प्रभू?” त्याने उत्तर देऊन म्हटले, “तुझ्या प्रार्थना
आणि चांगुलपणाची कार्ये परमेश्वरासमोर, स्मरण स्वरूपात पोचली आहेत. 5 आता यापो येथे काही लोकांना पाठवून
शिमोनाला ज्याला पेत्र म्हणतात, बोलावून घे. 6 तो समुद्राकाठी राहणाऱ्या व कातडयाचा व्यवसाय करणाऱ्या
शिमोनाकडे पाहुणा म्हणून आहे.”
7 कर्नेल्याशी बोलणारा देवदूत निघून गेला, त्यानंतर त्याने आपल्या घरच्या दोन नोकरांना आणि एका प्रामाणिक
सैनिकाला, जो त्याची सेवा करणाऱ्यांपैकी एक होता बोलाविले. 8 सर्व गोष्टी सांगून त्याने त्यांना यापो येथे पाठविले.
9 दुसऱ्या दिवशी जेव्हा ते चालत चालत शहराजवळ पोचणारच होते, तेव्हा दुपारचे बारा वाजत होते, त्या वेळी पेत्र
घराच्या धाब्यावर प्रार्थना करावयास गेला होता. 10 त्याला खूप जोराची भूक लागली आणि काही खावेसे वाटले; पण
जेव्हा ते जेवण तयार करीतच होते, तेव्हा सभोवती काय चालले आहे याचे भान नसणारी तंद्री त्याला (बेमान)लागली.
11 आकाश उघडले आणि त्याने एक मोठी चादर पृथ्वीवर त्याच्याकडे उतरत असताना पाहिली. 12 या चादरीत
जमिनीवर सरपटणारे चार पायांचे प्राणी, जंगली जनावरें आणि उडणारे पक्षी होते. 13 तेव्हा एक वाणी झाली, “पेत्रा,
ऊठ, मार आणि खा.”
14 पण पेत्र म्हणाला, “असे होऊ शकत नाही प्रभू, कारण मी असे काही खाल्ले नाही जे अशुद्ध किंवा अपवित्र आहे.”
15 दुसऱ्यांदा त्याने पुन्हा वाणी ऐकली, “जे परमेश्वराने शुद्ध ठरविले आहे, त्याला अशुद्ध म्हणू नको.” 16 असे तीनदां
झाले आणि ती चादर पुन्हा आकाशात उचलली गेली.
17 ज्या वेळी पेत्र विचार करीतच होता की या दर्शनाचा अर्थ काय असावा, त्याच वेळी कर्नेल्याद्वारे पाठविलेले लोक
शिमोनाच्या घरचा पत्ता विचारीत दारासमोर उभे होते. 18 त्यांनी विचारले “शिमोन, ज्याला पेत्र म्हणतात, येथेच पाहुणा
म्हणून आहे काय?
19 जेव्हा पेत्र त्या दर्शनाविषयी विचार करीत होता तेव्हा पवित्र आत्म्याने सांगितले, “पहा, तीन मनुष्य तुला भेटू
इच्छितात; 20 म्हणून ऊठ आणि खाली जा. काहीएक संकोच न बाळगता त्यांच्याबरोबर जा, कारण मीच त्यांना
पाठविलेले आहे.”
21 मग पेत्र त्यांना भेटण्याकरिता उतरला (ज्यांना कर्नेल्याने पाठविले होते). तो म्हणाला, “पहा, मीच आहे, ज्याच्या
शोधात तुम्ही आहा. तुम्ही येथे का आला आहा?”
22 मग ते म्हणाले, “सुभेदार कर्नेल्य जो एक भक्त व्यक्ती आहे, परमेश्वराचा आदर करणारा आहे व यहूदी लोकांत
ज्याचे सुनाम आहे, त्यांना देवदूताद्वारे परमेश्वराने आज्ञा दिली की त्यांनी आपल्याला घरी बोलावून आपले ऐकावें”.
23 तेव्हा त्याने त्यांना आत बोलाविले व त्यांचा पाहुणचार केला.
24 दुसऱ्या दिवशी पेत्र त्यांच्याबरोबर निघाला. यापो येथील काही भाऊ त्याच्याबरोबर गेले. पुढच्या दिवशी ते
कैसरिया येथे पोचले. कर्नेल्य आपले नातलग आणि जवळच्या मित्रांसह त्यांची वाट पाहात होता. 25 ज्या वेळी पेत्र आत
प्रवेश करणार होता, त्याच वेळी आदर स्वरूपात कर्नेल्य पालथा झाला आणि पेत्राला नमन केले. 26 परंतु पेत्राने त्याला
असे म्हणून उठविले की, “ऊठ उभा हो, मी तर (सुद्धा) एक मनुष्य आहे.”
27 त्यांच्याशी बोलत बोलत तो आत गेला आणि तेथे त्याने पुष्कळशा लोकांना बसलेले पाहिले. 28 तो त्यांना म्हणाला,
“तुम्हांला ठाऊक आहे की एका यहूदी मनुष्याने अन्य जातीच्या मनुष्याबरोबर मिसळणे किंवा त्याच्याकडे येजा करणे
किंवा त्याला काही दान देणे, रीतिनुसार योग्य नाही. परंतु परमेश्वराने मला दाखविले आहे की मी कोणत्याही मनुष्याला
अपवित्र किंवा अशुद्ध म्हणू नये; 29 म्हणून कोणतीही तक्रार न करिता आणि उशीर न लावता मी येथे आला आहे. म्हणून
माझा प्रश्न हा आहे की मला लोक पाठवून तुम्ही का बोलाविलेले आहे?”
30 कर्नेल्य म्हणाला, “चार दिवसांपासून आतापर्यंत मी उपास केलेला आहे, तीन वाजता मी आपल्या घरी प्रार्थना
करीत होतो आणि पहा, चमकणारे कपडे घालून एक पुरूष माझ्यासमोर येऊन उभा झाला. 31 तो म्हणाला, कर्नेल्या,

तुझी प्रार्थना ऐकली गेली आहे आणि परमेश्वरासमोर तुझी कार्यें स्मरण केली जातात. 32 म्हणून यापा येथे, शिमोनाला जो
पेत्र देखील म्हटला जातो बोलावून घे; तो समुद्राकाठी राहणाऱ्या, कातडयाचा व्यापार करणाऱ्या शिमोनाकडे पाहुणा
आहे.” 33 म्हणून मी लगेच तुमच्याकडे संदेश पाठविला व बरे झाले की तुम्ही आला आहा. म्हणून आता, आम्ही सर्व
जण परमेश्वरासमोर ते सर्व ऐकण्यासाठी बसलो आहोत, जे सांगण्याची परमेश्वराने तुम्हांला आज्ञा केली आहे.
34 मग पेत्राने आपले तोंड उघडिले आणि म्हटले, 35 “हे अगदी सत्य आहे, की परमेश्वर कोणाचाही पक्षपात करीत
नाही; प्रत्येक जातीमध्ये (राष्ट्र) तो सर्वांना ग्रहण करितो. जे सर्व त्याचा आदर- सन्मान करितात, त्याचे भय बाळगतात
आणि सच्चेपणाची वागणूक करतात, असे सर्व लोक त्याला आवडतात. 36 परमेश्वराने इस्त्राएली लोकांना जे वचन दिले
होते त्यानुसार त्यांनी येशू ख्रिस्तांद्वारे (जे सर्वांचे प्रभू आहेत) शांतीची वार्ता गाजविली. 37 मी म्हणतो की तुम्हांला ते
वचन ठाऊक आहे जे योहानाच्या बाप्तिस्म्याच्या प्रचारानंतर गालीलापासून आरंभ होऊन संपूर्ण यहूदी लोकांत पसरले,
38 की कशा प्रकारे परमेश्वराने येशू नासोरीचा पवित्र आत्मा आणि सामर्थ्याने (अधिकार) अभिषेक केला; कशा प्रकारे ते
चांगली कृत्यें करीत असत, व त्या सर्वांना बरे करीत गेले जे सैतानाद्वारे छळले गेले होते, कारण परमेश्वर त्यांच्याबरोबर
होता.
39 यहूद्यांची भूमी आणि यरूशलेम या दोन्हीत जे काही त्यांनी केले, त्या सर्वांचे आम्ही साक्षी आहोत. त्यांनी त्यांना
क्रूसावर खिळून मारून टाकले. 40 परमेश्वराने येशूंना तिसऱ्या दिवशी जिवंत केले, आणि त्यांना सर्वांवर प्रगट केले.
41 अर्थात त्या साक्षीदारांना ज्यांना परमेश्वराने पूर्वीपासूनच निवडले होते; म्हणजे आम्हांला ज्यांनी त्यांच्या
पुनरूत्थानानंतर त्यांच्याबरोबर खाणेंपिणे केले होते. 42 त्यांनी आम्हांला असा आदेश दिला, की आम्ही लोकांना संदेश
द्यावा आणि साक्ष द्यावी की तेच आहेत, ज्यांचा परमेश्वराने अभिषेक (वेगळे) केला आहे, यासाठी की त्यांनीच
जिवंतांचा व मेलेल्यांचाही न्याय करावा. 43 सर्व संदेष्टे त्यांच्याविषयीची साक्ष देतात, ती अशी की जो कोणी त्यांच्यावर
(येशूं) विश्वास ठेवतो, त्याला त्यांच्या नांवाने अपराधांची क्षमा मिळेल.”
44 जेव्हा पेत्र हे सर्व बोलतच होता, तेव्हा पवित्र आत्मा त्या सर्वांवर उतरला, अर्थात ज्यांनी वचन ऐकले आणि ते सर्व
विश्वासीं जे पेत्राबरोबर आले होते, 45 आणि जे सुंता झालेले होते ते आश्चर्याने भरून गेले कारण पवित्रात्मा गैरयहूदी
लोकांवर सुद्धा ओतला गेला होता, 46 कारण त्यांनी गैरयहूद्यांना अन्य अन्य भाषा (अनेक वेगळया भाषा) बोलतांना
आणि परमेश्वराची स्तुति-प्रशंसा करताना ऐकले. 47 तेव्हा पेत्र म्हणाला, “ज्या लोकांनी आमच्यासारखा पवित्रात्मा प्राप्त
केलेला आहे, त्यांना बाप्तिस्मा घेण्याविषयी कोणी मनाई किंवा बंदी लागू करू शकतो काय?” 48 तेव्हा त्याने आज्ञा
दिली की येशू ख्रिस्त (परमेश्वर पिता, पुत्र आणि पवित्रात्मा) यांच्या नांवाने त्यांचा बाप्तिस्मा केला जावा. त्यांनी त्यांला
अशी विनंती केली की आणखी काही दिवस त्याने त्यांच्याबरोबर रहावे.

# 11

1 यहूदीयात राहणारे प्रेषित आणि भावांनी ऐकले की गैरयहूदी लोकांनी परमेश्वराचे वचन स्वीकारले (ग्रहण) आहे.
2 जेव्हा पेत्र यरूशलेमेत आला, तेव्हा सुंता झालेल्या विश्वासींनी त्याचा विरोध केला व असे म्हणून खिलाफ़त केली की
3 “तुम्ही सुंता न झालेल्या लोकांना जाऊन भेटला आणि त्यांच्याकडे जाऊन खाणेपिणें केले.”
4 पण पेत्राने आरंभापासून सर्व काही विस्तारपूर्वक त्यांना सांगितले 5 तो म्हणाला, “मी यापो नांवाच्या शहरात प्रार्थना
करीत होतो, तेव्हा मी बेभान झालो आणि एक दर्शन पाहिले. चादरीसारखी काहीतरी, चार कोपरे धरून आकाशांतून
लटकविल्यासारखी माझ्याजवळ आली. 6 म्हणून जेव्हा मी लक्षपूर्वक पाहिले, तेव्हा मला त्यात पृथ्वीवरचे चार पायांचे
पशू, जंगली पशू, सरपटणारे जंतु आणि आकाशाचे पक्षी दिसले. 7 मी एक वाणी असे बोलतांना ऐकली, “ऊठ पेत्रा, मार
आणि खा”.
8 पण मी म्हटले, “नाही प्रभू, असे होणार नाही, कारण कोणतीही अपवित्र किंवा अशुद्ध वस्तु माझ्या तोंडात आजवर
गेली नाही “.

9 परंतु आकाशांतून पुन्हा एक वाणी आली, ‘जे परमेश्वराने पवित्र केले आहे ते अपवित्र म्हणूं नको.’ 10 असे तीनदां
झाले आणि मग ते सर्व काही आकाशात उचलले गेले.
11 आणि पहा, त्याच क्षणी कैसरीयातून तीन मनुष्य मला तेथे भेटावयास आले. 12 पवित्र आत्म्याने मला त्या वेळी
सांगितले की मी निःसंकोच पणे त्यांच्याबरोबर जावे. 13 त्याने आम्हांला सांगितले की आपल्या घरी कशा प्रकारे त्याने
देवदूत पाहिला जो उभा राहून म्हणाला, “यापो येथे पाठवून शिमोनाला जो पेत्र म्हणविला जातो, बोलावून घे. 14 तो
तुम्हांला ते सर्व काही सांगील, ज्यामुळे तू आणि तुझे संपूर्ण कुटूंब मुक्ति प्राप्त करील.”
15 ज्या क्षणी मी बोलण्याकरिता तोंड उघडिले, त्याच क्षणी पवित्रात्मा त्यांच्यावर तसाच उतरला, जसा प्रारंभी
आपल्यावर उतरला होता; 16 त्या वेळी मला प्रभूची तीच गोष्ट आठवली : ‘योहानाने तुमचा पाण्याने बाप्तिस्मा केला,
परंतु तुम्हांला पवित्र आत्म्यापासून (ने) बापतिस्मा मिळेल, 17 म्हणून जेव्हा परमेश्वराने विश्वास करणाऱ्यांना तेच दान
दिले, जे आम्हांला दिले तर मी कोण आहे की परमेश्वराविरूद्ध उभा राहू?”
18 मग जेव्हा त्यांनी या गोष्टी ऐकल्या, तेव्हा ते शांत झाले आणि असे म्हणून परमेश्वराची स्तुति करू लागले की,
“परमेश्वराने गैरयहूदी लोकांच्या जीवनासाठी देखील अंतःकरणाच्या पालटाचे (पश्चात्ताप) दान दिले आहे.”
19 लोक स्तेफनाच्या समयी होणाऱ्या छळामुळे, यात्रा करीत करीत फेनीके, कुप्र व अंत्युखियापर्यंत केवळ यहूदी
लोकांना वचन सांगीत गेले होते. 20 त्यांच्यापैकी काही लोक कुप्री व कुरेनेकर होते. जेव्हा ते अंत्युखिया येथे आले
तेव्हा त्यांनी ग्रीक लोकांना येशूंविषयी सांगितले. 21 प्रभूचा हात त्यांच्याबरोबर होता, पुष्कळ लोकांनी विश्वास ठेवला
आणि येशूंचा स्वीकार केला.
22 तेव्हा यरूशलेमेच्या चर्चच्या कानी ही खबर पोचली. त्यांनी बर्णबाला अंत्युखियास पाठविले. 23 तेथे आल्यावर
जेव्हा त्याने परमेश्वराची असीम कृपा (अनुग्रह) पाहिली तेव्हा त्याला आनंद झाला. त्याने सर्वांना दिलासा आणि उत्तेजन
दिले की त्यांनी येशूंच्या अतिशय जवळ ( सततचे सानिध्य) रहावे. 24 बर्णबा पवित्रात्मा आणि विश्वासाने भरलेला एक
सज्जन (भला) मनुष्य होता आणि मोठ्या संख्येने लोक येशूंचे शिष्य झाले.
25 मग बर्णबा शौलाच्या शोधात तार्सास गेला. 26 जेव्हा त्याला शौल मिळाला, तेव्हा तो त्याला अंत्युखियाला घेऊन
आला. पूर्ण वर्षभर ते चर्चमध्ये (विश्वासींशी) मिळून व मिसळून राहिले आणि अनेकांना शिकवीत राहिले. अंत्युखिया
येथे पहिल्यांदा लोकांनी शिष्यांना ख्रिस्ती (मशीहाचे)असे म्हटले.
27 त्याच दिवसांत पुष्कळ संदेष्टे यरूशलेमेंतून अंत्युखियास आले. 28 त्यांच्यातील एकाने म्हणजे अगबाने उभे होऊन
पवित्रात्म्याच्या प्रेरणेने म्हटले, की सर्व जगात एक महाभयंकर दुष्काळ पडेल. क्लौद्य सीजरच्या समयी असे झाले
देखील. 29 मग शिष्यांनी असा निर्णय (फैसला केला) घेतला की प्रत्येकाने आपआपल्या क्षमतेनुसार, यहूदीयात
राहणाऱ्या विश्वासींच्या मदतीकरिता काही पाठवावे. 30 त्यांनी असे केले सुद्धा, बर्णबा व शौलाच्या हाती त्यांनी
पुढाऱ्यांकडे (प्राचीन, वडील वर्ग) मदत पोचती केली होती.

# 12

1 त्याच समयी हेरोद राजाने चर्चच्या काही लोकांचा छळ करण्यासाठी आपला हात टाकला. 2 त्याने योहानाचा भाऊ
याकोब याला तरवारीने मारून टाकले. 3 असे केल्यामुळे यहूदी खुश झाले, म्हणून त्याने पेत्राचेही तसेच करण्याची
इच्छा बाळगली. ते बेखमीर भाकरीचे दिवस होते. 4 त्याने पेत्राला अटक करून तुरूंगात टाकले आणि सैनिकांच्या चार
गटांच्या पहाऱ्यांत ठेवले, त्याने असे यासाठी केले कारण वल्हांडण सणानंतर त्यांना लोकांसमोर आणता यावे.
5 म्हणून पेत्र तुरूंगात ठेवला गेला, परंतु चर्च न थांबता सतत अथक प्रार्थनेत व्यस्त राहिले. 6 जेव्हा हेरोद त्याला
बाहेर आणण्याच्या बेतात होता, त्याच रात्री पेत्र दोन साखळयांनी बांधलेला असा, दोन शिपायांच्यामध्ये झोपलेला
होता. दरवाज्याशी बसून पहारेकरी तुरूंगाचा पहारा देत होते. 7 अचानक प्रभूचा दूत तेथे पोचला आणि तुरूगांत प्रकाश
चमकला; त्याने पेत्राच्या कुशीवर थाप दिली, त्याला जागे केले आणि म्हटले, “लवकर उठ”, त्याचवेळी त्याच्या

हातातील साखळी खाली पडली.
[8] देवदूत त्याला म्हणाला, “आपली कंबर बांध आणि जोडे घाल” आणि त्याने तसेच केले. देवदूत त्याला म्हणाला,
“आपले कपडे घाल आणि माझ्या मागे ये.”
[9] पेत्र त्याच्यामागे निघाला, त्याला असा भास होत होता, की जे काही तो करीत आहे ते केवळ स्वप्नांतच आहे,
[10] जेव्हा ते पहिल्या व दुसऱ्या पहाऱ्यांतून बाहेर पडले, तेव्हा ते एका लोखंडी दाराजवळ आले जो शहराकडे घेऊन
जातो, आणि तो आपोआप उघडला. ते बाहेर रस्त्यावर आले आणि अचानक देवदूत त्याला सोडून गेला.
[11] ज्या वेळी पेत्राला भान आले त्या वेळी तो म्हणाला, “आता मला नीट ठाऊक आहे की येशूंनी आपला देवदूत
पाठवून मला हेरोदाच्या आणि यहूदी लोकांच्या हातांतून सोडविले आहे.
[12] जेव्हा त्याला हे सर्व कळले, तेव्हा तो मरीयेचा मुलगा योहान ज्याला मार्क म्हटले जाते तिच्या घरी गेला. तेथे
पुष्कळ लोक प्रार्थना करण्यासाठी एकत्र जमलेले होते. [13] ज्या वेळी पेत्राने फाटकाची खिडकी ठोकली, त्या वेळी रूदा
नांवाची एक मुलगी दाराकडे आली. [14] तिने पेत्राचा आवाज ऐकला आणि आनंदाच्या भरात आधी दरवाजा न उघडता
ती सर्वांना सांगण्यासाठी आत पळाली. तिने सर्वांना सांगितले की पेत्र दाराशी उभा आहे.
[15] ते तिला म्हणाले, “तू वेडी झाली आहेस” पण ती वारंवार तसेच बोलत राहिली; तेव्हा ते म्हणाले, “तो पेत्राचा
देवदूत असेल.”
[16] इकडे पेत्र दार ठोकीत राहिला आणि जेव्हा त्यांनी दरवाजा उघडला तेव्हा त्याला पाहून ते आश्चर्याने भरून गेले.
[17] त्याने त्यांना इशाऱ्याने शांत रहावयास सांगितले, आणि नंतर सांगू लागला की येशूंनी त्याला कशा प्रकारे तुरूगांतून
सोडविले आहे. तो त्यांना म्हणाला, “या सर्व गोष्टी याकोब आणि दुसऱ्या भावांना सांगा.” मग तो तेथून दुसऱ्या ठिकाणी
निघून गेला.
[18] पहाट झाल्यावर, शिपायांत मोठी खळबळ माजली, की पेत्राचे काय झाले, तो गेला तर कोठे गेला! [19] हेरोदाच्या
तपासानंतरही जेव्हा त्याचा शोध लागला नाही तेव्हा त्याने पहारेकऱ्यांची चौकशी (कडक विचारपूस)केली आणि
त्यानंतर असा हुकूम सोडला की त्यांना ठार मारले जावे. तो यहूदीयातून कैसरियात गेला आणि तेथेच राहिला.
[20] हेरोद, सोरच्या लोकांवर रागावला होता, नव्हे तो त्यांच्यामुळे फार नाखुश होता, पण ते सर्व एकमताने त्याच्याकडे
आले. त्यांनी राजाचा वैयक्तिक सेवक ब्लेस्त याच्याशी मैत्री केली, आणि अशी मागणी केली की शांति स्थापित केली
तर फार बरें! कारण त्या राजाच्या देशामुळे, त्यांच्या देशाला भोजन सामग्री दिली जात असे.
[21] एका निश्चित आणि नेमलेल्या दिवशी, हेरोद राजसी वस्त्रें घालून मोठ्या डौलाने राजासनावर बसला आणि त्यांना
भाषण देऊ लागला. [22] लोक मोठी घोषणा करून ओरडू लागले, “ही मनुष्याची नव्हे तर ईश्वराची वाणी आहे”. [23] त्याच
समयी परमेश्वराच्या दूताने त्याला मारले, कारण त्याने परमेश्वराची स्तुति केली नव्हती. त्याला किडे पडले आणि तो
मेला.
[24] परंतु इकडे, परमेश्वराचे वचन पसरीत गेले, त्याचा प्रसार वाढत गेला.
[25] जेव्हा बर्णबा आणि शौल यरूशलेमेस आपले सेवा -कार्य करून परत आले, तेव्हा त्यांनी योहानाला ज्याला मार्क
देखील म्हणत आपल्याबरोबर घेतले.

# 13

[1] अंत्युखियाच्या चर्चमध्ये काही संदेष्टे आणि शिक्षक होते: बर्णबा, शिमोन निग्र, लूक्य कुरेनेकर आणि मनाएन जो
हेरोद टॅट्रार्कबरोबर वाढला होता व शौल. [2] जेव्हा ते उपासासह प्रभूची आराधना करीत होते तेव्हा पवित्र आत्म्याने
म्हटले, “माझ्याकरिता बर्णबा आणि शौलाला, त्या कार्यासाठी वेगळे करा ज्यासाठी मी त्यांना बोलाविलेले आहे.”
[3] उपास व प्रार्थनेनंतर त्यांच्यावर हात ठेवून त्यांनी शौल व बर्णबाला निरोप दिला.
[4] पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनात बर्णबा आणि शौल सलुकीया येथे गेले आणि तेथून जहाजाद्वारे ते कुप्रासकरिता

रवाना झाले. [5] जेव्हा ते सलमीना येथे पोचले, त्यांनी यहूदी आराधनालयात परमेश्वराचे वचन सांगितले. तेथे योहानाने
त्यांना मदत केली.
[6] जेव्हा ते पफेस टापू ओलांडून गेले, तेव्हा त्यांना बर्येशू नांवाचा एक यहूदी जादूगार व लबाड संदेष्टा भेटला. [7] तो
देशाचा प्रोकाँसल (सुभेदार) सिर्ग्य पौल नावाच्या एका बुद्धीमान व्यक्तिबरोबर होता, जो बर्णबा आणि शौलाकडून
परमेश्वराचे वचन ऐकू इच्छित होता. [8] परंतु अलीम जादूटोणा करणाऱ्याने त्यांचा विरोध केला आणि सुभेदाराला विश्वास
ठेवण्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. [9] तेव्हा शौलाने पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन त्याच्याकडे कटाक्षाने रोखून
पाहिले आणि म्हटले, [10] अरे, “सर्वप्रकारच्या धोक्याने, कपटाने आणि चलाखीने भरलेल्या सैतानाच्या मुला, संपूर्ण
नीतिमत्वाच्या वैऱ्या, तू येशूंचे सत्य मार्ग, वाईट रीतिने बदलण्याचे व खराब करण्याचे (भलतीकडे नेण्याचे) कार्य बंद
करणार नाहीस काय? [11] आता पहा, येशूंचा हात तुझ्याविरूद्ध आहे. तू आंधळा होशील आणि काही समयापर्यंत प्रकाश
पाहू शकणार नाहीस”. लगेच त्याच्यावर धुकें पडल्यासारखे होऊन त्याच्या डोळयांपुढे अंधुकपणा आला आणि तो
इकडे तिकडे चांचपडू (शोधू) लागला की कोणी त्याचा हात धरून त्याची मदत करावी.
[12] सुभेदाराने, जो काही प्रकार झाला ते पाहून आश्चर्यचकित होऊन विश्वास ठेविला.
[13] पौल व त्याचे साथीदार पफेहून निघाले आणि पंफुल्यातील पिर्गापर्यंत गेले. तेथे योहानाने त्यांना सोडले आणि तो
यरूशलेमेस परत गेला. [14] पिर्गा येथून निघाल्यावर ते पिसिदियात असणाऱ्या अंत्युखिया येथे आले. तेथे शब्बाथ दिवशी
ते आराधनालयात जाऊन बसले. [15] नियमशास्त्र आणि संदेष्टयांच्या पुस्तकांतून वाचले गेल्यानंतर, आराधनालय
चालविणाऱ्यांनी त्यांना समाचार पाठविला, की “हे भावांनो, जर तुमच्याजवळ लोकांसाठी काही संदेश आहे तर सांगा”.
[16] मग पौलाने उभे होऊन आपल्या हातांनी खुणा करीत म्हटले, “हे इस्त्राएली लोकांनो, तुम्ही जे परमेश्वराचा आदर
करिता (त्याचे भय बाळगता) ऐका; [17] या इस्त्राएलांच्या परमेश्वराने आमच्या पूर्वजांना निवडले. जेव्हा ते मिसर देशात
परदेशी होऊन (प्रमाणे) रहात होते तेव्हा त्यांची उन्नति केली व पुढे केलेल्या पराक्रमी भुजेनें, त्याने मिसर देशातून बाहेर
आणले. [18] सुमारें चाळीस वर्षांपर्यंत परमेश्वर जंगलात, त्यांचे गैरआचरण सहन करीत राहिला. [19] जेव्हा कनान देशात
त्याने सात राष्ट्रांचा (जातींचा) नाश केला, तेव्हापासून त्यांची भूमि वाटून दिली.
[20] जवळजवळ चारशें पन्नास वर्षांपर्यंत, शमुवेल येईपर्यंत त्याने त्यांना न्यायाधीश दिले. [21] त्यानंतर त्या लोकांनी एक
राजा मागितला म्हणून परमेश्वराने त्यांना किशाचा मुलगा शौल जो बन्यामीन वंशाचा होता, त्यांचा राजा होण्याकरिता
दिला, त्याने चाळीस वर्षें शासन केले. [22] जेव्हा त्याला राजासनावरून खाली उतरवले तेव्हा दावीदाला राजा
होण्याकरिता उभा केला. दावीदाविषयी अशी साक्ष दिली गेली, “मला इशायाचा मुलगा दावीद मिळालेला आहे, तो
माझ्या मनासारखा (मनपसंद) आहे, आणि जे काही मी त्याला करावयास सांगीन तो तेच करील.”
[23] परमेश्वराने आपल्या प्रतिज्ञेनुसार, याच पुरूषाच्या वंशातून इस्त्राएलांकरिता एक मुक्तिदाता येशूं यांना पाठविले.
[24] येशू येण्यापूर्वी, योहान बाप्तिस्मा करणाऱ्याने इस्त्राएलाच्या सर्व लोकांना, मनाचा पालट करून बाप्तिस्मा घेण्याचा
संदेश दिला होता. [25] जेव्हा योहानाचा समय संपणारच होता त्याने म्हटले, “तुम्ही जे मला समजता, तो मी नव्हेच. पण
पहा, माझ्यानंतर एक येणार आहेत, व मी या लायकीचाही नाही की त्यांच्या पायातील जोडे काढावेत!”
[26] हे लोकहो, भावांनो, अब्राहामाच्या घराण्याच्या बाळकांनो, तुमच्यापैकी जो कोणी परमेश्वराला भितो, तुमच्यासाठी
हा मुक्तिचा संदेश पाठविला गेलेला आहे. [27] कारण यरूशलेमेंत राहणाऱ्या लोकांनी व त्यांच्या शासकांनी त्यांना
ओळखले नाही,त्या संदेष्टयांचेही ऐकले नाही ज्यांची पुस्तकें प्रत्येक शब्बाथ दिवशी वाचली जातात. येशूंचे दोषी
ठरविले जाणे देखील संदेष्टयांच्या वचनांची पूर्तताच (पूर्ण होणे)होती. [28] जरी त्यांनी येशूंना ‘मृत्युच्या शिक्षेचा’ अपराधी
मानिले नव्हते, (त्यांना कारण मिळाले नाही) तरी त्यांनी पिलाताला विनंती केली की त्यांना मारून टाकले जावे.
[29] येशूंविषयी सर्व लिहिलेले त्यांनी (लोकांनी) पूर्ण केले आणि त्यांना क्रूसावरून खाली काढून कबरेंत ठेवले. [30] परंतु
परमेश्वराने येशूंना मेलेल्यांतून पुन्हा उठविले. [31] गालीलातून यरूशलेमेत जे लोक येशूंबरोबर आले होते, त्यांनी पुष्कळ
दिवस त्यांना पाहिले. दुसऱ्यांपुढे हेच लोक या सत्याचे साक्षी होते.
[32] आम्ही याच येशु-वार्तेची घोषणा तुम्हांला केली आहे, की जी प्रतिज्ञा पूर्वजांशी केली गेली होती [33] परमेश्वराने, येशूंना

पुन्हा जिवंत करूनआपल्यासाठी ती प्रतिज्ञा पूर्ण केलेली आहे. जसे - स्तोत्र 2 रा अध्याय यात लिहिले देखीलआहे, की
‘तू माझा पुत्र आहेस, मी तुला आज जन्म दिला आहे’.
[34] परमेश्वराने येशूंना मेलेल्यांतून जिवंत केले, जे पुन्हा कधीच मरणार नाहीत आणि असे सुद्धा म्हटले: “मी तुला
दावीदाचा अटळ आणि पवित्र आशीर्वाद देईन”,
[35] म्हणून आणखी एका दुसऱ्या स्तोत्रांत त्याने म्हटले, “तू आपल्या पवित्र जणाला कधीच कुजू (सडू) देणार नाही. “
[36] परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे आपल्या पिढीची (युग) सेवा केल्यानंतर दावीद मरण पावला, त्याच्या पूर्वजांच्या
कबरेजवळ त्याला पुरले गेले आणि तो कुजला. [37] परंतु ज्याला (येशूंना) परमेश्वराने जिवंत उठविले, तो मातीत कुजला
नाही.
[38] म्हणून भावांनो आणि बहिणीनों, हे नीट समजून घ्या, की या पुरूषाद्वारे अपराधांच्या क्षमेचा संदेश दिला गेलेला
आहे. [39] ज्या सर्वांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला, ते सर्व निर्दोषी ठरविले गेले (सोडविले). मोशेच्या नियमान्वये, असे
निर्दोषी ठरविले जाणे शक्य नव्हते. [40] म्हणून सावध असा, की जे काही संदेष्टयांनी म्हटले होते ते सर्व काही तुमच्यावर
येऊ नये: [41] “हे बदनामी (निंदा) करणाऱ्यांनो, पहा आणि आश्चर्याने थक्क होऊन नाहीतसे व्हा, कारण मी तुमच्या
समयांत, एक असे कार्य करीत आहे, ज्याविषयी जर तुम्हांला कोणी सांगितले, तरी तुम्ही त्यांचावर अजिबात विश्वास
ठेवणार नाही”.
[42] मग पौल व बर्णबा बाहेर जाऊ लागले तेव्हा लोकांनी विनंती केली की येणाऱ्या शब्बाथ-दिनी, याच गोष्टी त्यांनी
त्यांना पुन्हा सांगाव्यात. [43] जेव्हा आराधना संपली तेव्हा यहूदी आणि यहूदी मतांत येणाऱ्या भक्तांतून बहुतेक लोक पौल
आणि बर्णबा यांचे अनुयायी झालेत. त्या दोघांनी त्यांच्याशी संभाषण करून विनंती केली, की त्यांनी परमेश्वराच्या
असीम कृपेत (अनुग्रह )टिकून रहावे.
[44] पुढच्या शब्बाथ दिवशी जवळजवळ संपूर्ण शहर, परमेश्वराचे वचन ऐकण्याकरिता एकत्र जमले. [45] जेव्हा यहूद्यांनी
ही गर्दी पाहिली, तेव्हा ईर्षेने भरून गेले. त्यांनी निंदा करीत, पौलाच्या गोष्टीविरूद्ध बोलून त्याचा विरोध केला.
[46] मोठ्या धाडसाने पौल आणि बर्णबा म्हणाले, “हे आवश्यक होते की प्रथम परमेश्वराचे वचन,तुमच्यापर्यंत पोचते
केले जावे , परंतु हे पाहून की तुम्ही त्याचा स्वीकार करीत नाही आणि अनंत जीवन प्राप्त करण्याच्या लायकीचे होत
नाही, आता आम्ही गैरयहूदी लोकांना वचन ऐकवू; [47] कारण परमेश्वराने अशी आज्ञा दिली आहे : “मी तुला
गैरयहूद्यांसाठी रोशनी ठरविले आहे की तू पृथ्वीच्या शेवटापर्यंत तारणाचे (मुक्तिचे) कारण व्हावे.”
[48] ज्या वेळी गैरयहूदीयांनी असे ऐकले, ते खूप हर्षित झाले आणि त्या सर्वांनी मिळून परमेश्वराची स्तुति केली. जे
अनंत जीवनाचे नेमलेले हक्कदार होते, त्या सर्वांनी विश्वास ठेवला.
[49] येशूंची वार्ता त्या संपूर्ण क्षेत्रात पसरली. [50] परंतु यहूद्यांनी भक्तांना, उच्च घराण्याच्या स्त्रियांना आणि नगरातील प्रसिद्ध
लोकांना भडकविले. त्यांनी पौल व बर्णबाविरूद्ध बंड करून त्यांना आपल्या सीमेबाहेर हाकून दिले . [51] मग ते
त्यांच्याविरूद्ध आपल्या पायांची धूळ झटकून इकुन्या येथे निघून गेले. [52] आणि शिष्य आनंदित झाले आणि
पवित्रात्म्याने सतत परिपूर्ण होत राहिले.

## 14

[1] इकुन्या येथे, यहूदी आराधनालयात त्यांनी असा प्रभावी संदेश दिला की मोठ्या संख्येने यहूदी आणि ग्रीकांनी
विश्वास ठेवला. [2] पण अविश्वासीं यहूद्यांनी गैरयहूद्यांना, भावांविरूद्ध भडकविले आणि त्यांचे अंतःकरण विरोधाने
(चेतवून) भरून टाकले. [3] म्हणून ते दीर्घकाळ तेथेच राहिले. ते येशूंच्या असीमित कृपेविषयी प्रभूवर विश्वास ठेवून,
मोठ्या उत्साहाने व जोमाने साक्ष देत राहिले आणि प्रभू त्यांच्या हातून चमत्कारिक चिन्हें आणि अद्‌भुत कार्ये करवून
आपल्या अनुग्रही वचनाची साक्ष देत राहिला. [4] पण इकडे असे झाले की शहराच्या सर्व लोकांचे दोन गटांत विभाजन
झाले होते. अर्धे यहूद्यांबरोबर आणि बाकी सर्व अर्धे प्रेषितांबरोबर होते. [5] काही गैरयहूद्यांनी आणि काही यहूद्यांनी

आपल्या अधिकाऱ्यांसमवेत, संतप्त होऊन (प्रचंड क्रोध)त्यांना दगडमार करण्याची इच्छा केली. 6 त्यांना याविषयी
कळले आणि लुस्त्र व दर्बेच्या नगरात आणि आजूबाजूंच्या प्रदेशांत ते पळून गेले, 7 ते तेथेच येशू-वार्ता गाजवू लागले.
8 लुस्त्र येथे पायांनी अशक्त व कमजोर असलेला एक मनुष्य बसलेला होता. तो जन्मापासूनच लंगडा असल्यामुळे,
कधीही चालू फिरू शकला नव्हता. 9 तो पौलाचे वचन ऐकीत होता. पौलाने त्याच्याकडे पाहिल्यावर त्याला कळले की
त्या लंगडयाजवळ बरें होण्याइतका विश्वास होता. 10 पौलाने मोठ्याने ओरडून म्हटले, “आपल्या पायांवर सरळ उभा
हो“. त्याच वेळी तो लंगडा उडी मारून उभा झाला आणि चालू लागला.
11 पौलाचे हे कार्य पाहून लोकांनी लुकवनी भाषेंत मोठ्याने ओरडून म्हटले, “मनुष्याच्या रूपाने (चेहरा घेऊन) देवता
आमच्यामध्ये उतरले आहेत.” 12 त्यांनी बर्णबाला ज्युपितर आणि पौलाला मर्क्युरी म्हटले, तेथे प्रारंभी पौलच बोलीत
होता. 13 ज्युपितराचे मंदिर शहरासमोरच होते. त्या मंदिराचा पुजारी तेथील लोकांबरोबर मिळून बैल व फुलमाळा, बर्णबा
आणि पौलाकरिता अर्पण करण्यासाठी घेऊन आला.
14 ही खबर लागताच प्रेषित, बर्णबा आणि पौलाने आपले कपडे फाडले, लोकांच्यामध्ये घुसून ते ओरडून धावले
आणि म्हणाले, “तुम्ही हे सर्व काय करीत आहा? 15 तुमच्यासारखी आम्हीही माणसें आहोत आणि आम्ही तुम्हांला असा
संदेश देतो की तुम्ही व्यर्थ गोष्टींपासून दूर व्हा, आणि जिवंत परमेश्वराकडे वळा, ज्याने स्वर्ग (आकाश) ,जमीन, समुद्र
आणि जे काही त्यांत आहे त्याची रचना केली आहे. 16 प्राचीन काळी याच परमेश्वराने सर्व राष्ट्रांना आपआपल्या
मार्गानुसार जगू दिले, 17 तरी तो स्वतः विनासाक्ष राहिला नाही, परंतु भलेपणाची कृत्यें करीत राहिला. त्याने तुम्हांला
पाऊस आणि फलदायक ऋतु देऊन तुमचे मन खाण्याने तृप्त केले, तो तुम्हांलाआनंदाने फळवंत व संतुष्ट करीत राहिला.”
18 असे म्हटल्यानंतरही त्याने गर्दीला मोठ्या कठीण प्रयासाने आपल्याकरिता बलिदान करण्यापासून थांबविले.
19 अंत्युखिया आणि इकुन्या येथून आलेल्या यहूद्यांनी लोकांना आपल्या पक्षाचे करून घेतले. पौलाला दगडमार
केल्यानंतर, तो मेला आहे असे समजून त्याला ओढीत शहराबाहेर घेऊन गेले. 20 तरीही जेव्हा शिष्य त्याच्या चारी
बाजूंना उभे होते, तो उभा झाला आणि नंतर शहरात आला. दुसऱ्या दिवशी तो बर्णबाबरोबर दर्बेला गेला.
21 त्या शहरात येशू-वार्ता सांगून शिष्य केल्यानंतर, ते लुस्त्र, इकुन्या व अत्युंखियात परत आले. 22 पौलाने शिष्यांची
हिंमत वाढविली आणि त्यांना विश्वासात दृढ राहणे शिकविले: “मोठ्या समस्या (क्लेश) व संकटांतून जावे लागते,
त्यांत टिकावे लागते, असे करूनच आपल्याला परमेश्वराच्या राज्यांत प्रवेश घ्यावयाचा आहे.” 23 त्यांनी प्रार्थना व
उपास करून प्रत्येक चर्चमध्ये पुढारी नियुक्त केलेत, त्यानंतर ज्या लोकांनी स्वीकार केला होता त्यांना त्यांचा स्वाधीन
केले. 24 त्यानंतर ते पिसिदियामधून पंफुल्यात पोचले.
25 त्यांनी पिर्गा येथे संदेश दिल्यानंतर, ते अत्तलियाला आले.
26 तेथून ते अंत्युखियाला निघाले त्याच ठिकाणी, जेथे त्यांना परमेश्वराच्या त्या कृपेप्रत सोपवून दिले होते, जी त्यांना
पूर्ण केलेल्या कार्यांसाठी लागणार होती. 27 तेथे पोचल्यानंतर त्यांनी चर्चला (चर्च)एकत्र जमवले. परमेश्वराने जी मोठी
(महान) कृत्यें केली होती, त्यांची सूचना त्यांनी त्या सर्वांना दिली. त्यांनी याविषयी सांगितले की कशा प्रकारे परमेश्वराने
गैरयहूदी लोकांसाठी दरवाजा उघडला आहे. 28 ते शिष्यांबरोबर तेथे बऱ्याच समयापर्यंत राहिले.

# 15

1 काही लोक जे यहूदीयाहून आले होते असे शिकवू लागले: “जोपर्यंत मोशेच्या प्रथेनुसार तुमची सुंता होत नाही, तुम्ही
उद्धार प्राप्त करू शकत नाही.” 2 यास्तव पौल आणि बर्णबा यांच्याबरोबर त्यांचा मतभेद व भांडण झाल्यावर त्यांनी
असा विचार केला की या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी त्यांनी प्रेषित आणि पुढारी यांच्याजवळ यरूशलेमेस जावे.
3 चर्चद्वारे पाठविल्यानंतर ते फेनिके व शोमरोन यातून गेले. गैरयहूदी लोकांचा पालट होतो आहे अशी वार्ता ऐकवून
त्यांनी भावांत एक मोठा आनंद निर्माण केला. 4 जेव्हा ते यरूशलेमेस गेले तेव्हा प्रेषित व पुढाऱ्यांनी त्यांचा स्वीकार
केला . परमेश्वराने त्यांच्यासाठी जी जी कार्ये केली होती, त्याविषयी त्यांनी त्यांना सांगितले.

5 परूश्यांतून ज्यांनी विश्वास केला होता, ते उभे राहून म्हणाले, “हे गरजेचे आहे की त्यांची सुंता केली जावी आणि
त्यांनी मोशेद्वारे दिलेल्या नियमांचे पालन करावे.”
6 प्रेषित आणि तेथील वडील वर्ग (प्राचीन) या विषयावर विचार विनिमय करण्यासाठी एका जागी एकत्र जमले.
7 यानंतर खूप विवाद झाल्यावर, पेत्र उभा राहून त्यांना म्हणाला, “लोकांनो व भावांनो, तुम्हांला ठाऊक आहे की काही
समयापूर्वी परमेश्वराने फैसला केला, तो हा की गैरयहूद्यांनी माझ्या तोंडून येशू-वार्ता ऐकावी आणि विश्वास ठेवावा.
8 अंतःकरणे जाणणाऱ्या परमेश्वराने, पवित्र आत्मा देऊन त्याची साक्ष दिली, अगदी त्याचप्रमाणे जसे त्याने आमच्याशी
केले. 9 त्यांच्या आणि आमच्यामध्ये कोणताच भेदभाव केला नाही परंतु विश्वासाद्वारे त्यांचे हृदय शुद्ध केले. 10 म्हणून
शिष्यांच्या मानेवर ओझे ठेवून, जे ना आमचे पूर्वज ना आम्ही सहन करू शकू , तुम्ही परमेश्वराची परीक्षा का पाहात
आहा? 11 परंतु आम्हांला विश्वास आहे की जशी त्यांना अनुग्रहाने मुक्ति मिळाली, आपल्याला देखील येशू ख्रिस्तांद्वारे
मिळेल.”
12 मग सभेचे सर्व लोक शांत राहिले आणि पौल व बर्णबाचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकीत राहिले;त्यांनी त्या सर्व मोठाल्या
चिन्हांची व अद्‌भुत कृत्यांची चर्चा केली जी परमेश्वराने त्यांच्याद्वारे केली होती. 13 जेव्हा ते शांत झाले तेव्हा याकोब
म्हणाला, “लोकांनो आणि भावांनो माझे ऐका. 14 शिमोनाने या गोष्टीची घोषणा केली आहे की परमेश्वराने कशा प्रकारे
सर्वप्रथम, गैरयहूदी लोकांवर कृपा करून, आपल्या नांवाकरिता लोक वेगळे केले. 15 संदेष्टयांच्या शब्दांनी या गोष्टींचा
स्पष्टपणा कळतो, जसे लिहिले आहे की : 16 या गोष्टीनंतर मी परत येईन आणि दावीदाचा पडलेला तंबू पुन्हा उभारीन.
त्याचे भग्नावशेष पुन्हा बांधून व्यवस्थित करीन आणि स्थिर करीन. 17 यासाठी की उरलेले लोक आणि गैरयहूदी जे
माझ्या नांवाने ओळखले जातात, त्या सर्वानी येशूंवर प्रेम करावे.”
18 हा तोच प्रभू आहे जो प्राचीन काळापासून (पूर्वीपासून)या गोष्टी प्रगट करीत आलेला आहे.
19 म्हणून माझ्या विचाराने जे लोक गैरयहूदीयांतून परमेश्वराकडे वळले आहेत, त्यांना आपण त्रास देऊ नये 20 परंतु हेच
की आम्ही त्यांना लिहून पाठवावे, की मूर्तीपासून अशुद्ध केलेले भोजन खाऊ नये, अनैतिक आणि अप्राकृतिक यौन
संबंधांपासून वांचून (दूर) रहावे, गळा दाबून मारलेल्या पशूंचे मास आणि रक्त यापासून अलिप्त (वेगळे) रहावे. 21 कारण
प्राचीन काळांपासून प्रत्येक नगरात, मोशेचे नियमशास्त्र शब्बाथ दिवशी प्रार्थनाभवनात वाचले जात राहिलेले आहे.
22 मग प्रेषित आणि वडील वर्ग आणि चर्चच्या विचारानुसार, तेथूनच काही लोक निवडून पौल व बर्णबाबरोबर
अंत्युखियाला पाठविण्याचा निर्णय घेतला गेला. यांमध्ये यहूदा जो बर्शब्बा सुद्धा म्हटला जातो आणि सीला हे विशेष
प्रमुख होते; 23 त्यांनी त्यांच्या हस्ते असे पत्र पाठविले : ‘प्रेषित, पुढारी आणि भाऊ, अंत्युखिया, सूरिया व
किलिकियाच्या गैरयहूदी लोकांतून विश्वासात येणाऱ्या विश्वासींना सलाम सांगतात. 24 आम्ही ऐकले आहे की
आमच्यापैकी कांहीनी आमच्या आज्ञेविना, आपल्या गोष्टींनी तुम्हांला घाबरून टाकले आणि तुमचे अंतःकरण
डळमळीत केले, पण आम्ही त्यांना तसे करण्याचा आदेश दिलाच नव्हता मुळी. 25 म्हणून एकमत होऊन (सहमत)
आम्हांला हे बरें वाटले की, आमचा प्रिय बर्णबा आणि पौल यांच्याबरोबर काही लोकांना निवडून तुमच्याकडे पाठवावे.
26 हे ते लोक आहेत, ज्यांनी आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांच्या नांवासाठी आपले जीवन जोखीमेत (संकटात) घातले होते,
27 म्हणून आम्ही यहूदा आणि सीला यांना पाठविले आहे, ते स्वतःच तुम्हांला सांगतील. 28 कारण पवित्र आत्म्याला व
आम्हांलाही हेच उत्तम वाटले की आवश्यक गोष्टींशिवाय तुमच्यावर आणखी दुसरे काही ओझे लादू नये.
29 मूर्तीसमोरील अर्पिलेले पदार्थ, रक्त, गळा दाबून मारलेले पशू आणि व्यभिचारापासून दूर रहा, स्वतःला वेगळे ठेवा.
जर तुम्ही स्वतःला या गोष्टींपासून जपाल तर तुमचे भले होईल.
30 त्यांना पाठविल्यानंतर ते अंत्युखियास आले. जेव्हा त्यांनी चर्चची सभा एकत्र बोलाविली, तेव्हा ती चिट्ठी सुद्धा
त्यांना दिली. 31 ते वाचून त्यांना खूप हर्ष झाला आणि धीरही मिळाला. 32 यहूदा आणि सीला, जे स्वतः संदेष्टे होते त्यांनी
पुष्कळ गोष्टींद्वारे त्यांना हिंमत दिली आणि मजबूत व स्थिर केले. 33 काही दिवस तेथे थांबल्यानंतर, भावांनी त्यांना
शांतीने, प्रेषितांकडे पाठवून दिले. 34 (तरी सीलाला हे बरें वाटले की त्याने तिथेच थांबून जावे). 35 पौल आणि बर्णबा
सुद्धा अंत्युखियास राहिले आणि इतर दुसऱ्यांबरोबर प्रभूचे शिक्षण आणि संदेश देत राहिले.

36 काही दिवसांनंतर पौलाने बर्णबाला म्हटले, “चल, आपण त्या सर्व शहरांत जाऊ जेथे प्रभूचा संदेश दिला होता,
आणि पाहू की आपले भाऊ कसे आहेत !” 37 बर्णबाने असा पक्का विचार केलेला होता की मार्क ज्याला योहान म्हणतात
त्याला आपल्याबरोबर घ्यावे. 38 या व्यक्तिने (मार्क) प्रेषितांना पंफुल्यातच सोडून दिले होते आणि तो त्यांच्याबरोबर
गेला नव्हता. 39 म्हणून पौलाने त्याला आपल्याबरोबर नेण्याची इच्छा केली नाही (विचार केला नाही). 40 त्या दोघांमध्ये
आपसांत इतका मतभेद झाला, की ते एकमेकांपासून वेगळे गेले आणि त्यांनी आपआपला मार्ग घेतला. बर्णबा मार्काला
घेऊन कुप्र येथे गेला आणि पौलाने सीलाची निवड केली व त्याला आपल्याबरोबर घेतले. भावांनी या दोन्ही दलांना
प्रभूचे आशीर्वाद वचन बोलून निरोप दिला. 41 आणि तो सूरिया आणि किलिकिया यांमधून चर्चेसना स्थिर करीत गेला.

## 16

1 मग तो दर्बे व लुस्त्र येथे आला. तेथे त्याची भेट तीमथ्य नांवाच्या शिष्याशी झाली. तो येशूंच्यावर विश्वास ठेवणाऱ्या
एका विश्वासी शिष्येचा मुलगा होता, जी आधी यहूदी मताची होती पण त्याचे वडील ग्रीक होते. 2 लुस्त्र आणि
इकुन्यांतील भावांत त्याचे सुनाम होते. 3 त्याला आपल्याबरोबर नेण्याची पौलाची इच्छा होती, म्हणून त्या क्षेत्रांतील
यहूदी लोकांना खुश करण्यासाठी त्याने त्याची सुंता केली कारण त्या सर्वांना ठाऊक होते की त्याचे वडील ग्रीक होते.
4 जेव्हा ते शहरांतून जात होते, तेव्हा त्यांनी त्यांना त्या सर्व गोष्टींचे पालन करावयास सांगितले, ज्याविषयींचा फैसला
यरुशलेमी प्रेषित आणि पुढाऱ्यांनी घेतला होता. 5 यास्तव चर्चेस विश्वासात भक्कम होत गेले, प्रचंड मजबूत झाले, आणि
प्रत्येक दिवशी त्यांची संख्या वाढत चालली होती.
6 जेव्हा ते फ्रुगिया व गलतिया या क्षेत्रांतून जात होते, पवित्र आत्म्याने त्यांना आशिया प्रांतात वचन देण्याची मनाई
केली. 7 जेव्हा ते मुसिया येथे आले तेव्हा त्यांनी बिथुनियात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, परंतु पवित्र आत्म्याने त्यांना
तेथे जाण्यापासून रोखले . 8 मुसियातून जात जात ते त्रोवस येथे पोचले. 9 रात्री पौलाने एक दर्शन पाहिले : मासेदोनियाचा
एक मनुष्य उभा राहून विनंती करीत आहे, की “मासेदोनियाला येऊन आमचे साहाय्य करा.”
10 पौलाला हा दृष्टांत झाल्यावर आम्ही लगेच मासेदोनियाला जाण्याचा प्रयत्न केला, असे समजून की येशूंनी त्यांना
मुक्ति-वार्ता सांगण्याकरिता आम्हांला बोलाविलेले आहे.
11 म्हणून त्रोवसापासून निघून आम्ही सरळ समथ्राके येथे गेलो आणि दुसऱ्या दिवशी नियापुलीसला. 12 तेथून आम्ही
फिलिप्पै येथे गेलो, जे रोमन कॉलोनीच्या मासेदोनियाच्या त्या भागांतील खास शहर आहे, तेथे आम्ही काही दिवस
थांबलो.
13 शब्बाथ दिवशी आम्ही शहराच्या बाहेर नदीकाठी पोचलो, असा विचार करून की तेथे प्रार्थना करण्याचे एखादे
ठिकाण असेल; आम्ही तेथे बसून त्या स्त्रियांशी बोलू लागलो ज्या तेथे बसलेल्या होत्या. 14 थुवतीरा शहराची जांभळी
वस्त्रें विकणारी, लुदिया नांवाची एक स्त्री होती जी परमेश्वराची उपासिका होती. ती आमचे बोलणे ऐकू लागली. येशूंनी
तिचे अंतःकरण उघडिले, यासाठी की पौलाने जे काही सांगितले होते, त्याचा तिने स्वीकार करावा. 15 जेव्हा तिला
आणि तिच्या कुटुंबाला बाप्तिस्मा दिला गेला, तिने एक विनंती केली, “जर आपण मला येशूंप्रत, प्रभूची विश्वासिनी
समजत असाल तर माझ्या येथे येऊन रहा.”
16 जेव्हा आम्ही प्रार्थना करीत होतो, आमची भेट एका अशा गुलाम दासीशी झाली, जी भविष्य सांगणाऱ्या आत्म्याने
ग्रसित होती. ती लोकांना भविष्य सांगून, आपल्या मालकासाठी खूप पैसे गोळा करून घेत असे. 17 ती आमच्या मागे
ओरडून ओरडून असे म्हणत होती, “हे लोक महान परमेश्वराचे सेवक आहेत, जे आम्हां सर्वांना मुक्तिचा मार्ग
कळवितात” 18 बरेंच दिवस ती असेच करीत राहिली. पौल खूप दुःखी झाला आणि तिच्याकडे वळून त्या आत्म्याला
त्याने म्हटले, “येशू ख्रिस्तांच्या नांवाने मी तुला हुकूम देतो की हिच्या आंतून नीघ”, त्याच क्षणी तो आत्मा तिच्यातून
निघाला.
19 तिच्या मालकांनी जेव्हा पाहिले की फायदा होण्याची आशा आता संपली तेव्हा त्यांनी पौल व सीला यांना पकडले

आणि बाजारापर्यंत अधिकाऱ्यांकडे ओढत घेऊन गेले. 20 मग मॅजिस्ट्रेटांपर्यंत (न्याय देणारा) त्याला नेऊन म्हणाले, “हे
लोक यहूदी आहेत आणि आमच्या शहरात गडबडी माजवीत आहेत. 21 ते अशा गोष्टी शिकवीत आहेत ज्या आपण
रोमन लोकांनी स्वीकारणे किंवा त्यांचे पालन करणे योग्य नाही.
22 लोकांचा समुदाय त्यांच्याविरूद्ध उठला आणि मॅजिस्ट्रेटने त्यांचे कपडे फाडले, त्यांना बदाडले (मारहाण). 23 जेव्हा
त्यांना बहुत फटके (छडया) मारले तेव्हा त्यांना तुरूंगात टाकिले आणि जेलरला हुकूम दिला की त्याने त्यांचा बंदोबस्त
करावा व त्यांच्यावर लक्ष ठेवावे . 24 असा हुकूम मिळताच त्याने त्यांना आतल्या कोठडीत टाकून दिले आणि त्यांचे
पाय लाकडांनी जखडून टाकले.
25 मध्यरात्री असे झाले की पौल आणि सीला प्रार्थना करीत राहिले, प्रभूचे गीत गात राहिले आणि कैदी त्यांचे ऐकीत
होते. 26 अचानक एक असा भूकंप झाला ज्यामुळे तुरूंगाचा पाया डगमगला. सर्व दरवाजे लगेच उघडले आणि प्रत्येक
साखळी उघडून खाली पडली. 27 जेलर जागा झाला आणि तुरूंगाचे दरवाजे उघडे पाहून त्याला वाटले की कैदी पळाले
असतील; लगेच त्याने आपली तरवार उपसून बाहेर काढली आणि स्वतःला मारून टाकण्याचा प्रयत्न करणार
इतक्यात; 28 पौलाने मोठ्या आवाजात ओरडून म्हटले, “आपल्या स्वतःला मारू नको, कारण आम्ही सर्व येथेच
आहोत.”
29 मग जेलर दिवे घेऊन भीत, कांपत धावत आला आणि पौल व सीला यांच्या पायाशी पडला. 30 त्यांना बाहेर आणून
त्याने विचारले, “महोदय, उद्धार प्राप्त करण्यासाठी मला काय करावे लागेल?”
31 ते म्हणाले, “येशू ख्रिस्तांवर विश्वास ठेव म्हणजे तुला मुक्ति मिळेल आणि तुझ्या कुटुंबाला सुद्धा.” 32 त्याला आणि
जे लोक (कुटुंबाचे) तेथे होते, त्यांना त्यांनी येशूंविषयी सांगितले. 33 रात्रीच्या त्याच वेळी त्याने त्यांचे घाव धुतले
(जखमा स्वच्छ केल्या) आणि आपल्या कुटुंबासमवेत सर्वांनी बाप्तिस्मा घेतला. 34 त्यांना आपल्या घरी नेऊन जेवू
घातले. परमेश्वरावर विश्वास करून आपल्या घरातील सर्व लोकांसह त्याने आनंदोत्सव साजरा केला.
35 सकाळ होताच मॅजिस्ट्रेटने काही अधिकाऱ्यांना सांगण्यासाठी पाठविले की “या लोकांना जाऊ दिले जावे.”
36 जेलर म्हणाला, “मॅजिस्ट्रेटने अशी आज्ञा दिली आहे की तुम्हां लोकांना सोडून दिले जावे, म्हणून येथून शांतीपूर्वक
जा.”
37 पण पौलाने उत्तर दिले, “कोणतीही चौकशी न करिता त्यांनी आम्हांला सर्वांसमोर मारलेले आहे. आम्ही रोमन
नागरिक आहोत. त्यांनी आम्हांला तुरूंगात टाकलेले आहे, आता गुप्तपणे आम्हांला पाठवू इच्छितात काय? असे होऊ
शकत नाही, त्यांनी स्वतः येऊन आम्हांला बाहेर काढावे असे त्यांना सांगा”.
38 अधिकाऱ्यांनी ही गोष्ट मॅजिस्ट्रेटला सांगितली, जेव्हा त्यांना कळले की ते रोमन नागरिक आहेत, तेव्हा ते भ्यालेत.
39 येऊन त्यांनी त्यांना विनंती केली आणि बाहेर काढल्यानंतर, त्यांना शहरातून निघून जाण्यास सांगितले. 40 ते तुरूंगातून
निघून लुदियेच्या घरी पोचले. तेथे भाऊबहिणींना ते भेटले आणि त्यांना धीर दिला, त्यांची हिंमत वाढविली आणि मग ते
तेथून पुढे गेले.

# 17

1 ते अंफिपुली व अपुल्लोनिया यांतून जाऊन थेस्सलनीका येथे पोचले, जेथे एक यहूदी आराधनालय होते. 2 पौल
आपल्या पद्धतीनुसार, आराधनालयात तीन शब्बाथ दिवशी जात राहिला आणि पवित्रशास्त्रांनुसार (बायबल) त्यांच्याशी
संभाषण करीत राहिला. 3 त्याने त्यांना नीट समजाविले आणि ही गोष्ट पटवून दिली, की ख्रिस्तांचे दुःख सहन करणे
आणि मेलेल्यांतून जिवंत उठणे किती आवश्यक होते. तो त्यांना म्हणाला, “मी ज्या येशूंविषयी तुम्हांला शिकवीत आहे,
तेच ‘मशीहा’ आहेत.” 4 त्यांपैकी काही लोकांची निश्चिती झाली आणि भारावून जाऊन ते पौल व सिला यांच्याबरोबर
जुळले. त्यांच्याबरोबरच काही ग्रीक भक्त आणि सन्माननीय स्त्रिया होत्या.
5 पण ज्या यहूदी लोकांची खात्री होऊ शकली नाही ते सर्व ईर्षेने पेटून उठले, ते बाजारात गेले. त्यांनी तेथून काही

फालतू (गुंड) लोकांची गर्दी जमविली, शहरात घबराट, गदारोळ व गोंधळ माजविला आणि यासोनाच्या घरांत घुसून त्यांना बाहेर लोकांच्यामध्ये आणण्याच्या इच्छेने तसा प्रयत्न करू लागले. [6] जेव्हा तसे झाले नाही तेव्हा त्यांनी यासोन आणि काही भाऊबहिणींना शहराच्या अधिकाऱ्यांसमोर ओढीत आणले आणि म्हणाले, “हेच ते लोक आहेत, ज्यांनी जगाची (दुनिया) उलटापालट केली आहे, ते येथे देखील आले आहेत. [7] यासोन त्यांची सेवा करितो आहे, ते सर्व जण कैसराच्या आज्ञेविरूद्ध जात आहेत; ते म्हणतात की येशू नांवाचे एक दुसरे राजे आहेत.” [8] जेव्हा त्यांनी या सर्व गोष्टी ऐकल्या तेव्हा त्यांनी लोकांच्या व शहरी अधिकाऱ्यांच्या भावना चेतविल्या आणि गोंधळ निर्माण केला. [9] यासोन आणि दुसऱ्यांकडून जामीन (जमानत) घेतली आणि नंतर त्या सर्वांना त्यांनी जाऊ दिले.

[10] भावांनी लगेच त्याच रात्री पौल व सीला यांना बिरूया येथे पाठवून दिले. तेथे पोचल्यानंतर ते आराधनालयात गेले. [11] थेस्सलनीकेच्या यहूद्यांपेक्षा येथील यहूदी शहाणे व समंजस होते; त्यांनी पूर्ण अंतःकरणीय तयारीने, परमेश्वराचा संदेश मान्य केला. ते प्रत्येक दिवशी पवित्रशास्त्रात शोध करीत राहिलेत की जसे पौल सांगतो आहे, ते सर्व काही तसेच सत्य (खरेखरे) आहे किंवा नाही. [12] म्हणूनच त्यांच्यापैकी विपुल प्रमाणात लोकांनी विश्वास ठेवला, त्यांत उच्च घराण्यांच्या प्रतिष्ठित ग्रीक स्त्रियांचाही समावेश होता, आणि सोबतच बऱ्याच पुरूषांनी देखील येशूंचे वचन स्वीकारिले.

[13] इकडे, ज्या वेळी थेस्सलनीकातल्या यहूदी लोकांना कळले, की पौल बिरूया येथेही परमेश्वर याहवेचा संदेश देतो आहे, त्या वेळी ते तेथे गेले आणि तेथील लोकांनाही त्यांनी चेतविण्याची खटपट केली. [14] म्हणून लगेच भावांनी पौलाला समुद्राकाठी पाठविले, पण सीला व तीमथ्य हे तेथेच राहिले. [15] पौलाला पोचविणारे त्याला अथेनैपर्यंत घेऊन गेले, आणि सीला व तीमथ्य यांच्यासाठी अशी आज्ञा देऊन त्यांचा निरोप घेतला की, “होईल तितके लवकरात लवकर माझ्याकडे या”.

[16] पौल अथेनै येथे त्यांची वाट पाहात होता, त्या शहराला मूर्तींनी भरलेले पाहून, आतल्या आत तो व्याकूळ झाला, त्याला मानसिक संताप होऊ लागला. [17] म्हणून आराधनालयांत आणि बाजारात त्याच्याजवळ येणाऱ्या यहूदी लोकांबरोबर आणि भक्तांबरोबर व गैरयहूदी लोकांबरोबर वादविवाद करीत असे.

[18] तेव्हा काही एपिकूर व स्तोयिक पंथाच्या तत्वज्ञानी लोकांनी त्याचा सामना केला. त्यांपैकी काहीजण म्हणाले, “हा बडबड्या काय सांगायचा प्रयत्न करतो?” दुसरे म्हणाले, “कदाचित तो विदेशी (परक्या) ईश्वरांची चर्चा करितो आहे”. असे यासाठी झाले कारण पौल येशूंची वार्ता आणि येशूंच्या पुनरूत्थानाविषयी (जिवंत उठण्याविषयी) घोषणा करीत असे. [19] मग ते त्याला धरून असे म्हणत अरीयपगात घेऊन आले, “आम्ही त्या नवीन शिक्षणाविषयी (शिकवण) जाणू शकतो काय, जी तुम्ही आम्हांला देत आहा? [20] तुम्ही आम्हांला काही विचित्र गोष्टी सांगत आहा म्हणून आम्हांला त्याविषयी जाणून घ्यावयाचे आहे.” [21] तेथे सर्व अथेनैकर आणि विदेशी , एक दुसऱ्यांना काहीतरी नवीन गोष्ट सांगण्याशिवाय आणि ऐकण्याशिवाय दुसरे काहीच करीत नसत, किंबहुना तसे केल्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे.

[22] मग पौल अरीयपगाच्या मध्ये उभा राहून म्हणू लागला, “अथेनैच्या लोकहो, मला असे वाटते की तुम्ही फारच धार्मिक स्वभावाचे आहा, [23] कारण जेव्हा मी येथे फिरत होतो तेव्हा तुमच्या उपासनेच्या एका वस्तूवर असे लिहिलेले मी पाहिले, ‘अज्ञात परमेश्वरासाठी’; म्हणून मी तुम्हांला सांगू इच्छितो, की तुम्ही अजाण राहून ज्याला वंदनीय समजता, [24] त्या परमेश्वराने हे जग आणि जे काही त्यांत आहे, त्याची निर्मिती केलेली आहे. तो स्वर्ग आणि पृथ्वीचा स्वामी आहे ,आणि हातांनी बांधलेल्या प्रार्थनाभवनात तो रहात नाही; [25] तोच सर्वांना जीवन, श्वास आणि सर्व काही देतो. केवळ याच कारणास्तव त्याला मनुष्याच्या हातांची सेवा किंवा कोणत्याही वस्तूची गरज नाही. [26] त्याने एकाच माणसाद्वारे, सर्व भूमिवर (जगात) राहणाऱ्या लोकांची निर्मिती व सृष्टि केली आणि त्यांचे नेमलेले समय व राहण्याची सीमा निर्धारित केली. [27] यासाठी की संपूर्ण मानवजातीने आपल्या परमेश्वराला हवेहवेसे करून घ्यावे, त्याचा शोध करून त्याच्यापर्यंत पोचावे, त्याला मिळवून घ्यावे, कारण तो आपल्यांपैकी एकापासूनही दूर नाहीये, [28] आपण केवळ त्याच्याच ठायी चालतो, फिरतो आणि जिवंतही रहातो आहोत - जसे तुमच्या काही कवींनी म्हटले आहे की “आम्हां सर्वांचा प्रारंभ हे परमेश्वरा, तुझ्यापासूनच आहे (आम्ही तर त्याचेच वंशज आहोत).”

[29] परमेश्वरानेच आम्हांला रचलेले आहे, म्हणूनआपण असा विचार करता कामा नये ,की परमेश्वर सोने, चांदी किंवा

दगडासारखा आहे, ज्याला एका आकृतिच्या मर्यादेत ठेवले जाऊ शकते. [30] अशा अज्ञानी काळांकडे (समयाकंडे)
परमेश्वराने दुर्लक्ष केले होते, परंतु आता मात्र सर्व ठिकाणच्या, सर्व लोकांना तोअसा हुकूम करितो की लोकांनी
आपल्या मनाचा पालट करावा. [31] कारण परमेश्वराने एक दिवस नेमलेला (निश्चित) आहे, ज्यात तो एका मनुष्याद्वारे
धार्मिकतेने (प्रामाणिकपणा) या जगाचा न्याय करील, हा मनुष्य मेलेल्यांतून जिवंत उठवून, त्याद्वारे त्याने (परमेश्वराने)
या गोष्टीचे सबळ प्रमाण (सर्वांना पटवून) दिलेले आहे.
[32] जेव्हा तेथे जमलेल्या लोकांनी मेलेल्यांतून जिवंत होण्याविषयीची ही गोष्ट ऐकली, तेव्हा त्यांपैकी काही लोकांनी
त्याची थट्टा करीत म्हटले, “या विषयावर आम्ही पुन्हा कधीतरी तुमचे ऐकू.” [33] म्हणून पौल त्यांच्यामधून निघाला.
[34] तरीपण काही लोक त्याच्याबाजूचे झाले आणि त्यांनी विश्वास देखील ठेवला. या लोकांत ,दिओनुस्य अरीयपगकर,
दामारी नांवाची एक स्त्री आणि त्यांच्याबरोबर काही दुसऱ्या लोकांचा समावेश होता.

# 18

[1] यानंतर पौल करिंथ येथे गेला. [2] तेथे तो अक्विल्ला नांवाच्या यहूद्याशी भेटला; हा यहूदी पंत येथे जन्मला होता. काही
दिवसांपूर्वी आपली पत्नी प्रिस्किल्ला हिच्याबरोबर इटालीहून नवीनच आलेला होता. [3] असे यासाठी की दोघांचा
व्यवसाय एकाच प्रकारचा होता, तो त्यांच्याच घरी राहून काम करीत राहिला. दोघे तंबू बनविण्याचा व्यवसाय करीत
होते. [4] प्रत्येक शब्बाथ-दिनी तो आराधनालयात शिकवीत राहिला आणि यहूदी व गैरयहूदी लोकांना समजवून सांगत
असे.
[5] जेव्हा सीला व तीमथ्य मासेदोनियाहून आलेत, तेव्हा पौलाने वचन शिकविण्याच्या आवडीमुळे यहूद्यांना असे
पटवून दिले होते की येशूच ख्रिस्त (अभिषिक्त) आहेत ज्यांची वाट ते पाहात आहेत. [6] ज्या वेळी त्यांनी त्याचा विरोध
केला, निंदा केली त्या वेळी पौलाने आपले कपडे झाडले आणि म्हणाला, “तुमचे रक्त तुमच्याच माथी येवो, मी निर्दोष
आहे, आता यापुढे मी गैरयहूदी लोकांकडेच जाईन.”
[7] तेथून निघून तो युस्त नांवाच्या पुरूषाच्या घरी आला, हा युस्त परमेश्वरावर विश्वास ठेवणारा विश्वासीं होता. त्याचे
घर आराधनालयाच्या जवळच होते. [8] त्या आराधनालयाचा प्रमुख क्रिस्प याने आपल्या परिवारांसमवेत येशूंवर विश्वास
ठेवला. त्याच्याबरोबरच पुष्कळ करिंथकरांनी देखील विश्वास ठेवला आणि त्या सर्वांना बाप्तिस्मा दिला गेला.
[9] रात्री दर्शनच्या माध्यमाद्वारे येशू पौलाशी बोलले, “भिऊ नको, बोलत जा आणि शांत (गप्प) राहू नको. [10] कारण मी
तुझ्याबरोबर आहे म्हणून कोणताही व्यक्ती तुझ्यावर आक्रमण करून तुझे नुकसान करू शकणार नाही. कारण या
शहरात माझे विपुल लोक आहेत.” [11] तेथे त्यांच्यामध्ये राहून पौल सुमारें दीड वर्षांपर्यंत त्यांना शिकवीत राहिला.
[12] ज्या दिवसांत गल्लियो हा अखयाचा अधिकारी होता, यहूदी लोक एकमत होऊन पौलाविरूद्ध उभे राहिले आणि
त्याला त्यांनी न्यायासनापुढे (न्याय जागा) आणले. [13] ते असे म्हणत होते की, “हे लोक दुसऱ्यांना, अशा प्रकारे
परमेश्वराची उपासना करण्याकरिता उत्तेजित (चिथवीत) करीत आहेत, जी नियमशास्त्रांविरूद्ध आहे.”
[14] आता ज्या वेळी पौल आपले तोंड उघडणारच होता, तेवढ्यात गल्लियो यहूदी लोकांना म्हणाला, “अहो यहूद्यांनो,
जर ही वाईट कार्ये किंवा दुष्टाईची कृत्यें याविषयीची बाब राहिली असती, तर मी तुमच्याबरोबर सहन केले असते;
[15] परंतु हा विषय, शब्द, नांव आणि तुमच्या नियमशास्त्राचा आहे म्हणून तुम्हीच तुमचे ,काय करावयाचे ते पाहून घ्या.
मी या सर्व बाबींविषयी तुमचा न्याय करणार नाही.” [16] असे बोलून त्याने त्यांना न्यायासनापुढून काढून (हाकून)
लाविले. [17] तेव्हा सर्व ग्रीक लोकांनी सोस्थनेस याला घेतले, जो आराधनालयाचा प्रमुख होता आणि त्याच जागेवर
त्याला मारहाण केली, परंतु गल्लियोने या गोष्टींची काहीच पर्वा केली नाही.
[18] त्यानंतर पौल तेथे पुष्कळ दिवस राहिला. भावांचा निरोप घेऊन त्याने किंख्रयांत आपल्या डोक्याचे केस काढून
घेतले (मुंडण), कारण त्याने नवस केला होता. मग तो जहाजात बसून सूरियाकडे रवाना झाला, यावेळी प्रिस्कील्ला व
अक्विल्ला ही देखील त्याच्याबरोबर गेली. [19] इफिसात आल्यावर त्याने त्यांना तेथेच सोडले, पण स्वतः तो

आराधनालयात जाऊन यहूदी लोकांशी वादविवाद करू लागला. 20 जेव्हा त्यांनी त्याला काही दिवस थांबण्याकरिता
सांगितले, तेव्हा त्याने त्यांचा सल्ला घेतला नाही, 21 पण असे म्हणून त्यांचा निरोप घेतला आणि त्यांना सोडले की,
“आवश्यक आहे की मी पुढे येणारा सण यरूशलेमेंत साजरा करावा पण जर परमेश्वराला हवे (इच्छा) असेल, तर मी
तुमच्याकडे परत येईन.” तेथून तो इफिसकडे निघाला. 22 कैसरिया येथे पोचल्यावर त्याने चर्चला भेट दिली आणि मग
अंत्युखियाला गेला.
23 तेथे काही दिवस राहिल्यानंतर तो गलतिया आणि फ्रुगियाच्या क्षेत्रांतील सर्व शिष्यांचा धीर वाढवीत राहिला आणि
त्यांना स्थिर रहावयाचा उपदेश केला. 24 आलेक्सांद्रियाचा निवासी यहूदी अपुल्लो, जो बोलण्यात योग्य वक्ता आणि
शास्त्राचे उत्तम ज्ञान बाळगणारा होता इफिसात आला.
25 या व्यक्तिला येशूंच्या मार्गाविषयी शिकविले गेलेले होते. तो प्रचंड आवेशी आणि कळकळीची भावना ठेऊन
नीट-नीट शिकवीत असे. परंतु त्याला केवळ योहानाच्या बाप्तिस्म्याविषयीच ठाऊक होते. 26 तो आराधनालयात मोठ्या
हिंमतीने आणि न भिता बोलू लागला. ज्या वेळी अक्विल्ला आणि प्रिस्किल्लाने त्याचे बोलणे ऐकले तेव्हा परमेश्वरी
मार्गाविषयी त्यांना आणखी उत्तम प्रकारे शिकविले.
27 ज्या वेळी तो अखयातून जाण्याचा बेत करीत होता, भावांनी शिष्यांवर यासाठी भर दिला, की त्यांनी त्याचे स्वागत
करावे, त्याचा स्वीकार करावा. जेव्हा तो तेथे पोचला, तेव्हा ज्या सर्वांनी अनुग्रहाद्वारे विश्वास केलेला होता त्या सर्वांचे
त्याने सहाय्य केले, . 28 तो मोठ्या प्रबळतेने यहूदी लोकांशी सार्वजनिक रूपाने सर्वांपुढे तर्क करीत होता. तो यहूदी
शास्त्रांतून दाखवून खंडण करीत असे की येणारे “ख्रिस्त” येशू हेच होते.

# 19

1 जेव्हा अपुल्लो करिंथात होता, तेव्हा पौल वरच्या भागांतून यात्रा करीत इफिस येथे पोचला, तेथे त्याची भेट काही
शिष्यांशी झाली. 2 तो त्यांना म्हणाला, “विश्वास करीत असताना तुम्ही पवित्र आत्मा प्राप्त केला होता काय?” ते त्याला
म्हणाले, “आम्ही पवित्र आत्म्याविषयी काही ऐकलेही नाही.”
3 त्याने त्यांना विचारले, “तुम्ही कोणता बाप्तिस्मा घेतला?” त्यांनी म्हटले, “योहानाचा बाप्तिस्मा”.
4 मग पौल म्हणाला, “यांत काही शंकाच नाही की योहानाने तुम्हांला मन पालटाचा (पश्चात्ताप) बाप्तिस्मा दिला होता”,
पण त्याने हे देखील म्हटले होते की, “येशू ख्रिस्त जे येणार आहेत, त्यांच्यावरच तुमचा विश्वास असावा”. 5 हे
ऐकल्यानंतर त्यांना प्रभू येशूंच्या नांवाने बाप्तिस्मा दिला गेला. 6 ज्या वेळी पौलाने त्यांच्यावर हात ठेवले, त्या वेळी
पवित्र आत्मा त्यांच्यावर उतरला आणि ते वेगवेगळया भाषा बोलून संदेश (परमेश्वरी) देऊ लागले. 7 ते सगळे सुमारे बारा
लोक होते.
8 आराधनालयांत जाऊन तो तीन महिन्यांपर्यंत बेधडक व निर्भय होऊन बोलत राहिला. तो परमेश्वराच्या राज्याविषयी
मोठ्या धाडसाने व दिलेरीने वादविवाद करीत राहिला, आणि लोकांना समजावीत राहिला. 9 परंतु काही लोकांनी
आपले मन कठोर केले आणि विश्वास करण्यास नकार दिला. लोकांच्या मोठ्या समुदायासमोर येशूंच्या नांवाची बेज्जती
(निंदा) देखील केली गेली. पौल त्यांच्यामधून निघाला व त्यांना सोडून त्याने शिष्यांना वेगळे केले आणि दररोज तो
तुरन्नाच्या पाठशाळेत शिकवीत राहिला. 10 असे सुमारे दोन वर्षें चालत राहिले आणि आशिया प्रांतात राहणाऱ्या यहूदी
आणि ग्रीक लोकांनी प्रभू येशू ख्रिस्तांविषयी ऐकून घेतले.
11 परमेश्वराने विशेष अद्‌भुत सामर्थ्याची कार्ये पौलाच्या हातून केलीत. 12 ते अशा प्रकारे की रूमाल आणि फडकी
त्याच्या अंगाला स्पर्शून (लावून)आजारी लोकांवर ठेवली जात असत, या कपड्यांच्या स्पर्शानेच आजार बरे होत आणि
दुष्ट आत्मा त्यांच्यातून निघून जात असत.
13 काही यहूदी मांत्रिक, दुष्ट आत्म्यांना काढीत असत. येशूंच्या नांवाचा उपयोग करून दुष्टात्माग्रस्ताकडे पाहून म्हणत
असत, “ज्या येशूंचा संदेश पौल देतो, त्यांच्याच नांवाने आम्ही तुला आज्ञा करतो.” 14 तेथे एक यहूदी याजकाचा प्रधान

स्कीवा होता, त्याला सात मुलगे होते जे असेच करीत असत. 15 दुष्टात्म्याने उत्तर दिले, “येशूंना मी ओळखतो (जाणतो),
आणि पौलही मला ठाऊक आहे, पण तू कोण आहेस?” 16 ज्या व्यक्तित दुष्टात्मा होता, त्या दुष्टात्म्याने त्याच्यावर उडी
घातली, आपले बळ दाखविले आणि म्हणून ते त्या घरातून नागडे व घायाळ अशा अवस्थेत पळाले.
17 इफिसात राहणाऱ्या सर्व यहूदी आणि ग्रीक लोकांना ही गोष्ट कळली आणि ते फार घाबरले. येशूंच्या नांवाचे गौरव
(महिमा झाला) झाले. 18 ज्यांनी विश्वास केला त्यांनी आपल्या वाईट कृत्यांचा अंगीकार केला, ती मान्य केली आणि
त्यांचा खुलासा केला. 19 पुष्कळ लोक जे जादू करीत होते त्यांनी आपली पुस्तकें आणली, आणि सर्वांसमोर जाळून
टाकिली. जेव्हा त्यांची किंमत मोजली गेली तेव्हा ती पन्नास हजार चांदीची नाणी इतकी झाली होती. 20 अशा प्रकारे
प्रभूचे वचन मोठ्या सामर्थ्याने वाढत गेले आणि प्रबळ होत गेले.
21 या सर्व गोष्टींनंतर पौलाने आत्म्यांत हा निश्चय केला की तो मासेदोनिया व अखयातून निघून यरूशलेमेस जाणार.
22 तो म्हणाला, “तेथे गेल्यानंतर मला रोमलाही गेले पाहिजे.” म्हणून आपले साहाय्यक तीमथ्य आणि एरास्त यांना त्याने
मासेदोनियाला पाठविले, परंतु तो स्वतः काही समयाकरिता आशिया प्रांतात थांबला.
23 त्याच समयी या मताविषयी मोठा उपद्रव झाला, खळबळ माजली.
24 देमेत्रिय नांवाचा एक सोनार होता, जो अर्तमीकरिता (डायना) चांदीचे मंदिर तयार करीत होता आणि खूप कमाई
करीत असे. 25 त्याने आपल्याच व्यवसायातील लोकांना बोलाविले आणि म्हटले, “लोकांनो, तुम्हांला ठाऊक आहे की
हा व्यवसाय आपल्याला पैसे मिळवून देण्याचे एक साधन आहे, ते पैसे कमविण्याचे एक माध्यम आहे. 26 तसेच तुम्ही
पाहात आणि ऐकीत आहा की केवळ इफिसातच नव्हे तर सबंध आशिया प्रांतात या पौलाने, लोकांना आपल्याकडे
ओढले आहे. त्याने लोकांच्या मनांत अशी उभारी दिली आहे, की जे ईश्वर हातांनी तयार केलेले आहेत ते ईश्वरच नाहीत.
27 म्हणून हा धंदा आता धोक्यात आहे (येईल) आणि तसेच महान देवी अर्तमीचे मंदिर देखील तुच्छ लेखिले जाईल
आणि ज्या देवीची पूजा संपूर्ण आशिया आणि जगात केली जाते, तिचे अवघे महत्व व शान नष्ट होईल.”
28 जेव्हा त्यांनी हे सर्व ऐकले तेव्हा क्रोधाने भरून ओरडू लागले, की “इफिसकरांची अर्तमी महान आहे”. 29 सबंध
शहरात खळबळ माजली. पौलाचे यात्री-सहयोगी गायस व अरिस्तार्ख जे मासेदोनियाचे होते, त्यांना पकडले आणि
एकत्र मिळून ते नाटकगृहात धावीत गेले. 30 मग पौलाने तेथे आत जाण्याचा प्रयत्न केला, तेव्हा शिष्यांनी त्याला असे
करू दिले नाही. 31 आशियाचे काही अधिकारी जे त्याचे मित्र होते, त्याला अशी विनंती केली की त्याने नाट्यगृहांत
जाऊ नये.
32 काही लोक एक गोष्ट बोलत होते, तर दुसरे आणखी काही. तेथे खूपच गोंधळ होता आणि बहुतेक लोकांना हेच
ठाऊक नव्हते की ते तेथे का होते! 33 त्यांनी अलेक्सांद्राला गर्दीतून ओढून बाहेर काढले कारण यहूद्यांनी त्याला धक्का
मारून पुढे केले होते. आलेक्सांद्र हात हालवून लोकांना समजवण्याचा व स्वतःच्या बाजूने काही बोलण्याचा इशारा
करीत होता. 34 ज्या वेळी त्यांना कळले की तो यहूदी आहे, जवळजवळ दोन तास ते एका आवाजात मोठ्याने ओरडत
राहिले, की “इफिसकरांची अर्तमी महान आहे”.
35 जेव्हा शहराच्या मंत्र्याने लोकांना शांत केले तेव्हा तो म्हणाला, “इफिसाच्या लोकांत असा कोण आहे ज्याला हे
ठाऊक नाही की इफिस शहर, महान देवी अर्तमी आणि तिच्या मूर्तिचा उपासक आहे. होय, तिचाच जी आकाशांतून
उतरली होती. 36 हे सर्व पाहून की या गोष्टीं नाकारल्या जाऊ शकत नाहीत, तुम्ही कृपया शांत रहावे आणि आवेशी होता
कामा नये, उतावीळ होऊन काहीच करू नये. 37 कारण तुम्ही ज्या लोकांना येथे आणले आहे ते मंदिर लुटणारे नाहीत
किंवा तुमच्या देवीला वाईट (निंदा) म्हणणारेही नाहीत. 38 म्हणून जर देमेत्रिय व त्याचे सोबती कारागीर व मूर्तिकारांची
काही तक्रार आहे, तर न्यायालयाची व न्यायधीशाची दारें उघडी आहेत (आणि न्यायाधीश उपलब्ध आहे), तेथे
यांच्याविरूद्धचे आरोप प्रमाणित केले जाऊ शकतात. 39 परंतु जर याशिवाय, तुमची आणखी काही मागणी (विषय)
असेल, तर कार्यदेशीरपणे सभेत त्याचा निकाल लावला जाऊ शकतो. 40 आजच्या उपद्रवाविषयी आपण बंड केले असा
आरोप आपल्यावर येण्याचे भय आहे. पण आपण याचे उत्तर देणार तरी काय?” 41 हे सर्व बोलून त्याने सभा बरखास्त
केली.

# 20

1 जेव्हा गोंधळ थांबला, पौलाने शिष्यांना आपल्याजवळ बोलाविले, त्यांना समजाविले आणि त्यानंतर तो
मासेदोनियाला निघून गेला. 2 त्या सर्व ठिकाणांतून जात असताना तो लोकांची हिंमत वाढवीत गेला आणि शेवटी ग्रीस
येथे आला. 3 तेथे तो तीन महिने राहिला. जेव्हा तो सूरियात जाणार होता तेव्हा यहूदी लोकांनी त्याच्याविरूद्ध एक
योजना आखली, तेव्हा त्याने मासेदोनियातून परत जाण्याचा बेत केला. 4 बिरूयातील सोपत्र, त्याच्याबरोबर आशिया
यात्रेत सामिल झाला, तसेच थेस्सलनीकातील अरिस्तार्ख आणि सकूंद, दर्बेचा गायस, तीमथ्य, तुखिक आणि
आशियाचा त्रफिम. 5 पुढे जाऊन हे लोक त्रोवसांत आमची वाट पाहू लागले. 6 बेखमीर भाकरीच्या दिवसांनंतर आम्ही
फिलिपैहून निघालो. पांच दिवसानंतर आम्ही त्रोवसात त्यांना भेटलो, येथे आम्ही सात दिवस थांबलो.
7 आठवडयाच्या पहिल्या दिवशी, शिष्य भाकर मोडण्यासाठी एकत्र जमले. पौल दुसऱ्या दिवशी तेथून जाण्याच्या
तयारीत तर होताच, परंतु त्यांना तो मध्यरात्रीपर्यंत शिकवीत राहिला. 8 वरच्या खोलीत जेथे ते सर्व एकत्र जमले होते,
बरेच दिवे जळत होते. 9 तेथे खिडकीत बसून एक तरूण मनुष्य युतुख याला खूप जोराने झोप आलेली होती. पौलाचे
शिकविणे खूप रात्रीपर्यंत चालले होते, या दरम्यान तो मनुष्य झोपेच्या गुंगीमुळें, तिसऱ्या मजल्यावरून खाली पडला
आणि मेला. 10 खाली जाऊन पौल त्याच्यावर पालथा पडला, त्यावर पसरला; त्याने आपले हात त्याच्या चारीं बाजूंना
घातले, त्याला कवटाळून धरिले आणि म्हणाला, “अस्वस्थ होऊ नका, कारण अजून त्याच्यात प्राण आहे, तो जिवंत
आहे“. 11 जेव्हा तो पुन्हा वर आला त्याने भाकर मोडली आणि खाल्ली; तो पहाटेपर्यंत त्यांच्याशी बोलत राहिला आणि
त्यानंतर तेथून निघाला.
12 या दरम्यान त्या तरूणाला जिवंत असा त्याच्या घरी पोचविले गेले, त्यामुळे प्रत्येकाला खूप बरें वाटले आणि ते
संतुष्ट झाले. 13 आम्ही जहाजाने पुढचा प्रवास केला आणि अस्साकडे गेलो. त्याच ठिकाणी त्याने आमच्याशी भेटण्याचा
प्रबंध केला. 14 तेथे भेट झाल्यानंतर आम्ही सर्व जण मितुलेना येथे गेलो 15 पुढच्या दिवशी आम्ही खिया टापूसमोर
पोंचलो त्याच्या पुढच्या दिवशी आम्ही सामास गेलो, त्रोगुल्यांत थांबलो आणि नंतर मिलेतास आलो. 16 पौलाने या
यात्रेत, इफिसात थांबण्याचा प्रयत्न केला नाही कारण तो आशिया प्रांतात आपला समय व्यतित करू इच्छित नव्हता,
कारण कोणत्या ना कोणत्या प्रकारे जर शक्य झाले तर, पेंटेकॉस्टच्या दिवसापर्यंत आपण यरूशलेमेत रहावे असे
पौलाला हवे होते.
17 मिलेतावरून त्याने इफिसात खबर पाठविली आणि चर्चच्या पुढाऱ्यांना बोलाविणे पाठविले. 18 जेव्हा ते तेथे आले
तेव्हा तो त्यांना म्हणाला, “तुम्हांला ठाऊक आहे की जेव्हा मी आशियात आलो तेव्हा पहिल्या दिवसापासून
तुमच्याबरोबर होतो आणि तुम्ही माझे जीवन पाहिले; 19 हेच की मी कशा प्रकारे, मनाच्या दीनतेने आणि यहूद्यांच्या
षडयंत्रांमुळे अश्रू गाळीत येशूंची सेवा केली. 20 जे काही तुमच्या हिताचे व फायद्याचे होते, ते सर्व तुम्हांला सांगीत
राहिलो. मी घरोघरी जाऊन आणि उघडपणे लोकांना शिकविले. 21 यहूदी व ग्रीक लोकांनी मनाचा पालट करून
परमेश्वराकडे वळणे आणि येशू ख्रिस्तांवर विश्वास करणे किती गरजेचे आहे, यावर मी गंभीरतापूर्ण भरपूर भर देत
राहिलेलो आहे.
22 आता पहा, मी पवित्रात्म्याने बांधलेला असा यरूशलेमेत जातो आहे. मला याविषयी काहीही ठाऊक नाही की माझे
काय होईल. 23 प्रत्येक शहरात, पवित्रात्मा केवळ हीच साक्ष देतो आहे की साखळयां आणि त्रास, छळ व संकटें माझी
वाट पाहात आहेत. 24 परंतु या सर्व गोष्टी मला अजिबात अस्वस्थ करीत नाहीत, आणि मी आपले जीवन देखील प्रिय
जाणीत नाही, किंवा माझ्याकरिता प्राणाचे काही मोल नाही; असे यासाठीच की मी परमेश्वराच्या कृपेच्या वार्तेची साक्ष
देऊ शकण्यास समर्थ व्हावे, आणि येशूपासून मिळालेली सेवा करून आनंदाने आपली धाव पूर्ण करावी.
25 आणि आता पहा, मला ठाऊक आहे की ते सर्व जण ज्यांच्यामध्ये मी परमेश्वरी राज्याविषयी शिकवीत राहिलो,
माझे तोंड पुन्हा पाहू शकणार नाहीत. 26 म्हणूनच आज मी तुम्हांला याविषयी साक्षी ठरवून म्हणतो, की मी सर्वांच्या
रक्तासंबंधी निर्दोषी आहे.” 27 कारण मी कधीही परमेश्वराच्या संपूर्ण योजनेची घोषणा करण्यात विलंब केला नाही किंवा
कचरलो नाही. 28 यास्तव तुम्ही आपले रक्षण करा, आणि त्या कळपाचीही निगा राखा ज्याची काळजी वाहण्यासाठी

पवित्र आत्म्याने तुम्हांला परमेश्वराच्या चर्चचा मेंढपाळ म्हणून ठरविले आहे; हे चर्च येशूंनी आपल्या रक्ताने विकत घेतले
आहे. [29] कारण मला ठाऊक आहे, की मी गेल्यानंतर फाडून खाणारे लांडगे तुमच्यामध्ये शिरतील आणि ते कळपाला
सोडणार नाहीत. [30] तसेच तुमच्यामधूनच लोक उठतील आणि शिष्यांना आपल्याकडे ओढून घेण्यासाठी लबाड्या
करतील. [31] म्हणून सावध असा आणि लक्षात ठेवा की तीन वर्षे मी दिवसरात्र तुम्हांला अश्रूंनी भरून, सावध करीत
राहणे व चेतावनी देणे सोडले नाही.

[32] आणि आता भाऊबहिणींनो, मी तुम्हांला परमेश्वर आणि त्याचे कृपा-वचन यांच्याकडे (प्रत) सोपवून देतो, तो
तुम्हांला बळ देईल आणि सर्व पवित्र आणि तो वेगळे केलेल्या लोकांना वेतन देण्याच्या लायकीचा व समर्थ आहे. [33] मी
कोणाच्याही चांदीसोन्याचा लोभ धरिला नाही किंवा वस्त्रांचा मोह धरिला नाही. [34] तुम्ही स्वतः ही गोष्ट जाणता, की
माझ्या याच हातांनी मी माझ्या आणि माझ्या सोबत्यांच्या आवश्यकता पूर्ण केल्या. [35] मी तुम्हांला सर्व काही करून
दाखविले, की अशाच प्रकारें परिश्रम करून स्वमेहनतीने दुर्बळांना सांभाळणे आणि प्रभू येशूंच्या वचनांचे स्मरण करणे
आवश्यक आहे, कारण त्यांनी स्वतःच म्हटले होते की “घेण्यापेक्षा देणे धन्य आहे.”

[36] असे बोलून त्याने गुडघे टेकले आणि त्या सर्वांबरोबर मिळून प्रार्थना केली. [37] आणि ते सर्व खूप रडले आणि
पौलाच्या गळ्यात गळा घालून, त्याला कवटाळून त्याचे बहुत मुके घेतले. [38] विशेष करून ते या गोष्टीचा शोक करीत
होते जी त्याने म्हटली होती, की तुम्ही माझे तोंड पुन्हा पाहणार नाही; आणि त्यानंतर त्यांनीच त्याला जहाजापर्यंत
पोचविले.

## 21

[1] मग त्यांचा निरोप घेतल्यानंतर आणि तेथून निघाल्यानंतर आम्ही कोस येथे आलो; पुढच्या दिवशी रूदा आणि तेथून
पातऱ्यास गेलो. [2] एक जहाज फेनीकेहून जाणार होते, आम्ही त्यात चढलो. [3] जेव्हा आम्ही कुप्र पाहिले तेव्हा ते आम्ही
डावीकडे सोडून, सूरियाकडे जाऊन सोरास थांबलो. तेथे जहाजातून सामान उतरावयाचे होते. [4] शिष्यांची भेट झाल्यावर
आम्ही तेथे सात दिवस थांबलो. पवित्रात्म्याद्वारे त्यांनी पौलाला ताकीद दिली की त्याने यरूशलेमेस जाता कामा नये.
[5] आमचे दिवस पूर्ण झाल्यावर, आम्ही तेथून निघालो आणि आपला मार्ग घेतला तेव्हा सर्व स्त्रियांनी आणि मुलांनी
आम्हांला नगराबाहेर पोचविले, आणि आम्ही समुद्राकाठी गुडघे टेकून प्रार्थना केली. [6] मगआम्ही एकमेकांचेअभिवादन
केले व नंतर निरोप घेतला. मगआम्ही जहाजात चढलो आणि ते सर्व आपआपल्या घरी परतले.

[7] जेव्हा आम्ही सोरापासूनची जलयात्रा पूर्ण करून चुकलो आम्ही पोलेमास येथे आलो; भावांचे अभिवादन करून
आम्ही एक दिवस त्यांच्याचबरोबर थांबलो. [8] पुढच्या दिवशी आम्ही जे पौलाबरोबर होतो, कैसरिया येथे आलो आणि
येशू-वार्ता गाजविणाऱ्या फिलिप्पाच्या घरी गेलो. तो सातांपैकी एक होता; आम्ही त्याचाच घरी मुक्काम केला.
[9] याच्याकडे चार अविवाहित मुली होत्या, त्या भविष्यवाणी करीत असत.

[10] जेव्हा आम्ही तेथे बरेच दिवस थांबलो, तेव्हा अगब नांवाचा एक संदेष्टा यहूदीयातून आला. [11] जेव्हा तो
आमच्याजवळ आला तेव्हा पौलाचा पट्टा (बेल्ट) घेऊन आपले हातपाय बांधून म्हणाला, “पवित्र आत्मा असे म्हणतो :
ज्या माणसाचा हा पट्टा आहे, त्याला यहूदी यरूशलेमेत बांधतील आणि गैरयहूदीयांच्या हाती सोपवितील.”

[12] ज्या वेळी आम्ही या गोष्टी ऐकल्या, त्या वेळी आम्ही आणि तेथील लोकांनी त्याला विनंती केली की त्याने
यरूशलेमेस जाऊ नये. [13] त्या वेळी पौलाने उत्तर दिले, “तुम्ही रडून मला दुःखी का करीत आहा? यरूशलेमेत मी येशू
ख्रिस्तांच्या नांवाकरिता केवळ बांधले जाण्यासाठीच नव्हे तर मरण्यासाठीही तयार आहे.” [14] जेव्हा पौलाला डळमळीत
(ढिम्म हालला नाही) करिता आले नाही तेव्हा त्याचा निर्धार पाहून आम्ही शांत झालो आणि म्हणालो, “परमेश्वराची
इच्छा पूर्ण होवो”.

[15] त्या दिवसांनंतर आम्ही तयारी केली आणि यरूशलेमेस गेलो. [16] कैसरीयातील काही शिष्य आमच्याबरोबर
कुप्रासआले आणि ज्याच्या घरी आम्ही पाहुणे म्हणून राहणार होतो त्या म्नासोन नांवाच्या एका वृद्ध (जुन्या) शिष्याला

घेऊन आले.
[17] जेव्हा आम्ही यरूशलेमेस पोचलो, भाऊबहिणींनी आनंदाने आमचा स्वीकार केला. [18] पुढच्या दिवशी पौल आमच्याबरोबर याकोबाजवळ गेला, तेथे सर्व पुढारी हजर होते. [19] त्या सर्वांना अभिवादन केल्यानंतर त्याने त्यांना सर्व कार्यांविषयी सांगितले, जी परमेश्वराने त्यांच्यामध्ये त्याच्याद्वारे केली होती.
[20] त्यांनी जेव्हा ऐकले तेव्हा परमेश्वराची स्तुति केली आणि पौल म्हणाला, “आपणच पहा भाऊ, किती हजार यहूदी लोकांनी विश्वास ठेवला. ते सर्व नियमशास्त्रांविषयी स्फूर्तिदायक आणि प्रचंड उत्साही आहेत. [21] तुमच्याविषयी त्यांना सांगितले गेले आहे, की जे यहूदी लोक गैरयहूदी लोकांमध्ये राहतात, त्यांना तुम्ही मोशेचा त्याग करावयास सांगता, आणि असे देखील सांगता की त्यांनी आपल्या मुलांची सुंता करू नये आणि रीती-विधींचेही पालन करू नये. [22] या गोष्टींचा काय परिणाम होईल? आता त्यांना कळले आहे की तुम्ही येथे आला आहा, [23] म्हणून तुम्ही तसेच व तेच करा जे आम्ही तुम्हांला सांगतो आहोत. आमच्यांत चार लोक असे आहेत ज्यांनी शपथ वाहिलेली आहे. [24] त्यांना धरा (घ्या) आणि त्यांना घेऊन आपल्या स्वतःला शुद्ध करा, त्यांना खर्च द्या यासाठी की त्यांनी आपले मुंडण करावे. मग ज्या गोष्टी तुमच्याविषयी पसरल्या होत्या, त्या सर्व खोटया आहेत हे लोकांना कळेल. हे देखील की तुम्ही व्यवस्थित जीवन जगत आहा आणि नियमशास्त्राचे पालन करीत आहा. [25] गैरयहूद्यांच्या बाबतीत म्हटले तर, आम्ही हा फ़ैसला केलाआहे की त्यांना या सर्व गोष्टींचे पालन करण्याची गरज नाही, केवळ हेच की मूर्तीसमोर अर्पिलेले पदार्थ, रक्त आणि गळा दाबून मारलेल्या जनावरांचे मांस आणि यौन अनैतिकतेपासून त्यांनी जपून (स्वत:स राखावे) रहावे.
[26] मग पौलाने पुढच्या दिवशी लोकांना आपल्याबरोबर घेतले आणि त्यांच्याबरोबर स्वतःला देखील शुद्ध केले. तेथे त्याने सांगितले की शुद्ध होण्याचे दिवस केव्हा पूर्ण होतील, अर्थात आमच्यापैकी प्रत्येक जणासाठीचे बलिदान केव्हा अर्पिले जाईल. [27] जेव्हा सात दिवस जवळ-जवळ संपणारच होते, आशिया प्रांतातील यहूद्यांनी त्याला प्रार्थनाभवनात पाहिले आणि लोकांना भडकवून त्यांना पकडले. [28] आणि ओरडून म्हणाले, “इस्त्राएलांच्या लोकांनो, मदत करा! हाच तो मनुष्य आहे जो सर्व ठिकाणी, लोकांना नियमशास्त्र व या जागेविरूद्ध शिकवितो, त्याबरोबरच याने ग्रीक लोकांना या प्रार्थनाभवनात आणून ही पवित्र जागा प्रदूषित (घाणेरडी) केली आहे. [29] त्यापूर्वी शहरात त्यांनी इफिसातील त्रफिमाला त्याच्याबरोबर पाहिले होते. त्यांचा विचार होता की पौल त्यांना प्रार्थनाभवनात घेऊन आला होता.
[30] संपूर्ण शहर प्रचंड खवळले आणि लोक त्यांच्याविरूद्ध गजबजून एकाजागी एकत्र जमू लागले. त्यांनी पौलाला प्रार्थनाभवनाबाहेर ओढले आणि लगेच दरवाजा बंद केला. [31] ते त्याला मारून टाकणार इतक्यात, रोमी सेनेच्या प्रमुखाकडे ही खबर पोचली, की सबंध यरूशलेमेत वादळी परिस्थिती आणि गदारोळ उडाला आहे. [32] लगेच त्याने शिपायांना आणि सुभेदारांना बरोबर घेतले आणि त्यांच्याकडे धावले. जेव्हा त्यांनी कप्तानाला आणि शिपायांना पाहिले तेव्हा पौलाला घात करण्याचे थांबविले.
[33] तेव्हा प्रमुख (कमाण्डर)पुढे आला, त्याने दोन साखळयांनी त्याला बांधण्याची आज्ञा केली आणि विचारले तो कोण आहे आणि त्याने काय केले आहे. [34] गर्दीतून कोणी काही ,तर कोणी काही ओरडत होते. जेव्हा गोंधळामुळे त्याला सत्य काय आहे, ते समजले नाही तेव्हा त्याने त्याला बैरेक (सैनिकांच्या इमारती) येथे घेऊन जाण्याचा हुकूम दिला.
[35] जेव्हा तो पायऱ्यांपर्यत पोचला, लोकांच्या उपद्रवामुळे शिपायांनी त्याला उचलून नेले. [36] लोकांची गर्दी ओरडत राहिली, “याला मारून टाका”.
[37] जेव्हा पौलाला बैरेकमध्ये घेऊन जाणार होते, त्याच वेळी पौल प्रमुखाला म्हणाला, “मी आपल्याशी काही बोलू शकतो काय? त्याने म्हटले, तुला ग्रीक भाषा येते काय? [38] तू तोच मिसरी नाहीस काय, ज्याने काही दिवसांपूर्वी बंड केले आणि चार हजार लोकांना जंगलात नेले होते?
[39] परंतु पौल म्हणाला, “मी किलिकियातील तार्साचा, जे एक प्रसिद्ध शहर आहे; तेथील रहिवाशी असून यहूदी आहे, मला लोकांशी बोलण्याची परवानगी द्यावी.”
[40] जेव्हा त्याला परवानगी मिळाली तेव्हा शांतता झाल्यानंतर तेथेच पायरीवर उभे राहून त्याने आपल्या हातांनी खुणा करून, इब्री भाषेत संभाषण केले.

# 22

1 “लोकांनो, भावांनो, बहिणींनो आणि वडीलांनो, आपल्या बचावादाखल मी तुम्हांला जे प्रत्युत्तर करितो, ते ऐका.”
2 जेव्हा त्या लोकांनी त्याला इब्री भाषेत बोलतांना ऐकले, तेव्हा आणखी शांत व स्तब्ध झाले. 3 किलिकियाच्या तार्स
शहरात मी राहणारा आहे, परंतु गमलिएलाच्या चरणांजवळ याच शहरात माझ्या पूर्वजांचे नियम आणि रीतिविधी मला
शिकविले गेले आणि आपण सर्व जण ज्या प्रकारे परमेश्वराकरिता उत्साहाने व जोमाने भरलेले आहात, तसाच मी देखील
होतो. 4 या मताचे पुरूष व स्त्रिया जिवें मारून, बांधून आणि तुरूंगात घालण्याद्वारे मी त्यांचा छळ करीत राहिलो. 5 या
गोष्टीचे साक्षी महायाजक आणि वडीलांची सभा देखील आहे. त्यांच्याचद्वारें मला भावांसाठी चिठ्या (पत्रें) मिळाल्या
होत्या, याकरिता की जे लोक दिमिष्कांत बांधले गेले होते, त्यांना यरूशलेमात दंड देण्याकरिता घेऊन यावे.
6 आपल्या यात्रेत, जेव्हा मी दिमिष्कात पोचणारच होतो, तेव्हा अचानक आकाशांतून एक मोठा प्रकाश उतरला
(रोशनी)आणि त्याने मला वेढून घेतले. 7 ज्या वेळी जमिनीवर पडलो त्या वेळी मी आपल्या कानांनी ऐकले, “शौला,
शौला, तू मला कां पीडा देत आहेस?”
8 मी उत्तर दिले, “आपण कोण आहांत प्रभूजी?” त्यांनी मला म्हटले, “मी नासरेथाचा येशू आहे, ज्याला तू पीडा देत
आहेस.”
9 जे लोक माझ्याबरोबर होते, ते तो प्रकाश पाहून घाबरले, परंतु जो माझ्याशी बोलला होता, त्याचा आवाज ते ऐकू
शकले नाहीत. 10 मी म्हटले, “प्रभू मी काय करू?” येशू म्हणाले, “ऊठ आणि दिमिष्कात जा, तेथे तुला त्या सर्व गोष्टी
सांगितल्या जातील, ज्या तुला करावयाच्या आहेत”. 11 प्रकाशाच्या चकाकणाऱ्या उजेडामुळे मी काहीच पाहू शकत
नव्हतो, माझ्या सोबत्यांनी माझे हात धरून मला दिमिष्कास आणले.
12 हनन्या नांवाचा एक यहूदी भक्त, तेथील यहूदी लोकांमध्ये बराच आदरणीय पुरूष होता. 13 तो येऊन तेथे उभा झाला
आणि मला म्हणाला, “भाऊ शौला, पाहू लाग” त्याच समयी मला दिसू लागले.
14 त्याने मला असेही म्हटले, “आपल्या पूर्वजांच्या परमेश्वराने तुला निवडले आहे, यासाठी की तू त्याची इच्छा जाणून
घ्यावी आणि त्या नीतिमानास पाहावे आणि त्याच्या तोंडची वाणी तुला ऐकता यावी. 15 कारण जे तू पाहिले आणि
ऐकले आहे, त्या सर्वांविषयी तू त्याचा साक्षी ठरशील. 16 आता तू का उशीर करीत आहेस? ऊठ आणि बाप्तिस्मा घे
आणि त्यांचे (येशूंचे) नांव घेऊन आपले अपराध धुवून टाक.
17 तेव्हा मी यरूशलेमेस आलो आणि प्रार्थनाभवनात प्रार्थना करू लागलो, तेव्हा बेभान असा झालो. 18 मग त्या वेळी
मी, येशूंना माझ्याशी असे बोलतांना ऐकले, “घाई कर आणि यरूशलेमेतून लवकर पळ काढ, कारण येथे लोक तुझ्या
गोष्टीं स्वीकार करणार नाहीत.”
19 मी म्हटले, “येशू त्यांना ठाऊक आहे, की मीआपल्यावर विश्वास करणाऱ्या लोकांना मारीत होतो, त्यांना तुरूंगात
घालीत होतो. 20 ज्या वेळी आपला हुतात्मा (शहीद) स्तेफन, याला दगडमार केला जात होता, त्या वेळी मी तेथेच उभा
होतो, आणि त्याला मारणाऱ्या लोकांच्या वस्त्रांचा सांभाळ करीत होतो; आणि स्तेफनाच्या हत्येत सहभागी देखील
होतो”.
21 ते मला म्हणाले, “जा, कारण मी तुला येथून, दूर असलेल्या गैरयहूदी लोकांकडेही पाठविणार आहे”.
22 हे सर्व ऐकल्यानंतर त्या लोकांनी आपला आवाज बुलंद केला आणि ओरडून म्हणाले, “अशा मनुष्याला तर, या
जगात जिवंत ठेवले जाऊ नये.”
23 त्या वेळी ते असे किंचाळीत चालले होते आणि आपले कपडे फेकीत, हवेत धूळ उधळीत जात होते, 24 तेव्हा
प्रमुखाने हुकूम दिला की त्याला किल्ल्यांत नेण्यात यावे. तो असे म्हणाला,” चाबुक मारून, त्याला जाणून घ्यावयाचे
आहे की हे लोक त्याच्या विरूद्ध इतक्या जोराने का ओरडत आहेत.” 25 ज्या वेळी त्यांनी त्याला कातडी पटट्याने
बांधले तेव्हा त्याच्या जवळ उभ्या असलेल्या सुभेदाराला पौल म्हणाला, “एखाद्याचा अपराध ,सिद्ध झालेला
(बिनाप्रमाणाचा) नसतानाही, एखाद्या रोमन नागरिकाला फटके मारणे योग्य आहे काय?”
26 हे ऐकून सुभेदाराने प्रमुखाला जाऊन म्हटले, “सांभाळून रहा, कारण हा पुरूष रोमन नागरिक आहे.”

[27] प्रमुखाने येऊन पौलाला विचारले, “मला सांग, तू रोमन नागरिक आहेस काय?” त्याने उत्तर दिले, “होय” [28] प्रमुख
म्हणाला, “मी पुष्कळ कींमत चुकती करून हे स्वातंत्र्य मिळविलेले आहे”. पौल म्हणाला, “मी तर स्वतंत्र असाच
जन्मलो होतो”.
[29] तेव्हा जे लोक त्याची विचारपूस करणार होते, त्यांनी लगेच त्याला सोडून दिले. प्रमुखही घाबरला, कारण त्याला
कळले होते की त्याने एका रोमन नागरिकाला अटक करून बांधण्याचा हुकूम दिला होता.
[30] पुढच्या दिवशी प्रमुखाला जाणून घ्यावयाचे होते, की यहूदी त्याच्यावर दोष का लावीत होते; म्हणून त्याने त्याला
स्वतंत्र (मोकळे) केले आणि महायाजक व त्यांची सभा बोलाविली. त्याने पौलाला त्यांच्यासमोर आणून उभे केले.

# 23

[1] सभेकडे एकटक पाहून पौलाने म्हटले, “भावांनो, आजवर मी चांगल्या मनाने (विवेक) परमेश्वरासमोर जीवन जगत
आलो आहे.” [2] हनन्या महायाजकाने जवळ उभ्या असलेल्या लोकांना आज्ञा केली की त्यांनी त्याच्या गालावर मारावे.
[3] त्या वेळी पौल म्हणाला, “अरे! तू चूना लावलेल्या भिंती (कबर), परमेश्वर तुला शिक्षा देईल; कारण तू
नियमशास्त्रांप्रमाणे माझा न्याय करावयास बसला आहेस, आणि नियमशास्त्रांविरूद्ध, मला मारण्याचा हुकूम देत
आहेस?”
[4] तेव्हा जे लोक जवळ उभे होते ते म्हणाले, “तू महायाजकाशी असा उध्दटपणे वागत आहेस?”
[5] त्या वेळी पौल बोलला, “भावांनो मला ठाऊक नव्हते की तो महायाजक आहे, कारण असे लिहिले आहे की तुम्ही
आपल्या पुढाऱ्यांशी दुर्व्यवहार करू नका.
[6] ज्या वेळी पौलाला कळले की त्याठिकाणी काही परूशी होते आणि काही सदूकी, त्या वेळी तो सभेत उंच व
मोठ्या आवाजात (वाणीने) बोलू लागला, “भावांनो मी परूशी आहे आणि परूशीचा मुलगा देखील. मेलेल्यांची आशा
आणि मेलेल्यांतून जिवंत उठण्याविषयीची चौकशी करण्याकरिता माझ्यावर खटला चालविला जातो आहे (मला येथे
उभे केलेले आहे).” [7] त्याने असे म्हटले आणि परूशी व सदूकी यांच्यात आपसांत मतभेद व असहमति झाली आणि पूर्ण
सभा दोन भागांत विभागली गेली. [8] कारण सदूकी म्हणतात की मेलेल्यांचे पुनरूत्थान नाहीच मुळी, ते असेही म्हणतात
की देवदूत किंवा आत्मा असे काही नसतात, परंतु परूशी दोन्ही गोष्टी मान्य करितात.
[9] तेथे एकच हैदोस माजला (गोंधळ उडाला) आणि जे विद्वान परूश्यांच्या पक्षाचे होते, त्यांनी उभे राहून विरोध करीत
म्हटले की, “आम्हांला या माणसात कशाही प्रकारचा वाईटपणा (खोट) दिसत नाही. जर एखाद्या आत्म्याने किंवा
देवदूताने त्याच्याशी संभाषण केलेही असेल तर आम्ही परमेश्वराशी लढणारे आहोत तरी कोण?” [10] मग जेव्हा
आपसांतील भांडण खूप वाढत गेले, तेव्हा प्रमुखाने सैनिकांना हुकूम दिला, की कसेही करून त्याला लोकांमधून काढून
बैरेकमध्ये न्यावे, कारण प्रमुखाला ही भीति होती की लोक पौलाला फाडून टाकतील.
[11] पुढच्या रात्री येशू त्याच्याजवळ येऊन उभे राहिले आणि म्हणाले, “पौला, हिंमत सोडू नको, धीर बाळग;
यरूशलेमेत जशी तू माझी साक्ष दिली, तशीच तुला रोम शहरात देखील द्यावयाची आहे.”
[12] पहाट होताच, काही यहूदी लोकांनी एक गट तयार केला आणि शपथ वाहिली, की जोपर्यंत ते पौलाला जिवें मारीत
नाहीत तोपर्यंत ते खाणार नाहीत किंवा पाणीही पिणार नाहीत. [13] ज्या लोकांनी ही वाईट योजना तयार केली होती,
त्यांची संख्या सुमारे चाळीस इतकी असेल. [14] त्यांनी महायाजक, वडील आणि चर्चकडे येऊन म्हटले, “आम्ही एक
ज़बरदस्त (मोठा) प्रण केला आहे; जोपर्यंत आम्ही पौलाला मारून टाकीत नाही, तोपर्यंत आम्ही उपाशी राहूं [15] म्हणून
तुम्ही सभेबरोबर एकमत होऊन प्रमुखाला इशारा करा, की त्याने पौलाला तुमच्याकडे उद्या पुन्हा आणावे.
त्याच्याविषयी अधिक चौकशी करण्याचा हा एक बहाणा (निमित्त) असेल. तो येथपर्यंत येण्याआधीच आम्ही त्याचा
जीव घेण्याकरिता तयार राहू.
[16] ज्या वेळी पौलाच्या भाच्याने, दबा धरून बसण्याविषयीचे प्रकरण आणि पौलाचा घात करण्याच्या योजनेविषयी

ऐकले, त्या वेळी तो बैरेकमध्ये गेला आणि त्याने पौलाला ही खबर (बातमी) सांगितली.
[17] तेव्हा पौलाने सुभेदाराला बोलावून म्हटले, “या तरूणाला प्रमुखाकडे घेऊन जा, त्याला काही सांगायचे आहे.”
[18] यास्तव तो त्याला प्रमुखाकडे घेऊन गेला आणि म्हणाला, “कैदी पौलाने, मला बोलावून म्हटले आहे, की मी या तरूणाला तुमच्याकडे आणावे, कारण याला काही बोलावयाचे आहे”.
[19] तेव्हा प्रमुखाने त्याचा हात धरला, त्याला एका बाजूला नेऊन एकटे असताना विचारले, “तुला, मला काय सांगावयाचे आहे”.
[20] तो म्हणाला, “यहूद्यांनी असा ठाम विचार केला आहे, की उद्या पौलाला सभेसमोर, या निमित्ताने बाहेर आणले जावे की त्यांना आणखी काही बारकाईने विचारपूस करावयाची आहे; [21] परंतु त्यांचे काहीही ऐकू नका कारण त्यांच्यातील सुमारे चाळीस लोक घात लावून तयार बसले आहेत, की बारीक तपासणीकरिता ज्या क्षणी पौल बाहेर येईल त्याचक्षणी मोका मिळताच त्याला जिवें मारण्याकरिता हल्ला करावा. त्यांनी अशी शपथ वाहिली आहे, की जोपर्यंत ते पौलाला ठार करीत नाहीत तोपर्यंत खाणार- पिणार नाहीत; आता ते आपल्या आदेशाची वाट पाहात आहेत.”
[22] म्हणून प्रमुखाने त्या तरूणाला असा हुकूम देऊन निरोप दिला, की “जे काही तू मला सांगितलेले आहे ते आणखी कोणालाच सांगू नको.”
[23] त्याने दोन सुभेदारांना बोलावून म्हटले, “200 सैनिक (शिपाई), सत्तर घोडेस्वार आणि दोनशे भालेकरी, रात्री नऊ वाजता कैसरीयास पाठवा. [24] पौलाला एखाद्या घोड्यावर बसवून गव्हर्नर फेलिक्सकडे सुरक्षित पोचवून द्या.”
[25] त्याने अशा प्रकारचे एक पत्र लिहिले:
[26] महाप्रतापी फेलिक्स सुभेदार यांना क्लौद्य लुसियाचा सलाम.
[27] या मनुष्याला यहूदी लोकांनी धरलेले होते आणि त्याला जिवे मारण्याच्या बेतात होते. तेव्हा मी आपल्या फौजेबरोबर तेथे पोचलो आणि त्याला वाचविले कारण मला असे कळले की तो रोमन नागरिक आहे. [28] मी त्याचे आरोप जाणून घेण्याच्या हेतूने त्याला सभेसमोर आणले. [29] मला हे देखील आढळले की यहूदी लोकांच्या धर्मपुस्तकांविषयी उद्‌भवणाऱ्या , प्रश्नांच्या संदर्भातच, त्याला दोषी मानले जात होते. पण मृत्युदंड किंवा शिक्षा किंवा अटक करण्याजोगा अपराध त्याने केलाच नव्हता. [30] ज्या वेळी मला कळले की काही यहूदी त्याला घात करण्याच्या हेतूने संधीची वाट पाहात तयार बसलेले आहेत, मी त्याला आपल्याकडे पाठवून दिलेले आहे. आरोप लावणाऱ्यांना मी असा निर्देश दिलेला आहे की त्यांनी आपल्या उपस्थितीत त्याचा आरोप सिद्ध करावा.
[31] मग ते शिपाई आज्ञेनुसार, पौलाला घेऊन रात्रीच्या रात्रीच अंतिपत्रिसाजवळ घेऊन आले. [32] पुढच्या दिवशी त्याच्याबरोबर जाण्यास त्यांनी घोडेस्वार तेथेच सोडून दिले आणि परत बैरेकांकडे परतले. [33] ज्या वेळी ते घोडेस्वार कैसरीयास पोचले, त्यांनी गव्हर्नरला पत्र देऊन, पौलाला त्याच्यासमोर प्रस्तुत केले. [34] गव्हर्नरने पत्र वाचले आणि पौल कोणत्या प्रांताचा आहे याविषयी विचारले. [35] जेव्हा त्याला कळले की तो किलिकियाचा आहे, तेव्हा तो म्हणाला, “जेव्हा तुझ्यावर आरोप ठेवणारे येतील तेव्हा मी तुझे म्हणणे ऐकेन.” तो असेही म्हणाला की त्याला हेरोदाच्या सरकारी निवासस्थानी ठेविले जावे.

# 24

[1] पाच दिवसानंतर हनन्या महापुरोहित, काही पुढारी (वडील) आणि एक वकील तिर्तुल्ल यांना आपल्याबरोबर घेऊन आला. या लोकांनी गव्हर्नरसमोर पौलाविरूद्ध आरोप ठेवले. [2] मग जेव्हा पौलाला समोर आणले गेले, तेव्हा तिर्तुल्याने त्याच्याविरूद्ध आरोप ठेवीत गव्हर्नरला असे सांगितले : “महामहिम फेलिक्स महाराज, आपल्यामुळे आम्ही पूर्ण शांतीने रहात आहोत. आपल्या ईश्वरकृत दूरदर्शीपणामुळे आणि विवेकशील प्रबंधामुळे या राष्ट्रासाठी सर्वप्रकारची उत्तम व्यवस्था उपलबध आहे. [3] सर्व ठिकाणी आणि सदैव आम्ही या सर्व गोष्टींकरिता आपले हृदयाने आभारी आहोत.
[4] आपला अधिक वेळ न घेतां, मी एवढी विनंती करितो की कृपाकरून, आमचे ऐकण्याकरिता आपण आम्हांला थोडा

समय द्यावा.
[5] आम्ही पाहिले आहे की हा मनुष्य सर्व जगात, यहूदी लोकांच्यामध्ये बंड भडकवीत आहे. हा एक उपद्रवी मनुष्य
आहे आणि नासोरीच्या कुपंथाचा तो नेता आहे; हा नासोरी समुदायाचा प्रमुख (पुढारी) देखील आहे. [6] याने
प्रार्थनाभवनाला अशुद्ध करण्याची हिंमत केलेली आहे. आम्ही याला धरिले आणि नियमशास्त्रांनुसार याचा न्याय देखील
करून टाकला असता. [7] परंतु कमांडर लुसिया यांनी जबरदस्तीने येऊन याला आमच्या हातून सोडवून घेतले. [8] त्याने
आरोपींना अशी आज्ञा केली की त्यांनी येऊन आपणास भेटावे. आपण स्वतः त्याची चौकशी करून समजू शकता की
आमच्या आरोपात किती वजन (दम)आहे.”
[9] यहूदी लोकांनी सुद्धा या गोष्टीविषयी आपला होकार दिला.
[10] गव्हर्नरचा इशारा मिळताच पौलाने उत्तर दिले, “मला ठाऊक आहे की आपण पुष्कळ वर्षांपासून या देशाचे
न्यायाधीश आहात, म्हणूनच आता मी स्वतः आनंदाने स्पष्ट करुन आपली बाजू मांडतो. [11] आपल्याला ते कळेलच की
आता बारा दिवस सुद्धा झाले नाहीत, जेव्हा मी आराधना करण्यासाठी यरूशलेमेस गेलो होतो; [12] त्याठिकाणी
आराधनालयात किंवा शहरात त्यांनी मला कोणाशी वादविवाद करताना किंवा बंडाचा प्रारंभ करताना पाहिले नाही.
[13] आणि ते या गोष्टींचे प्रमाण सुद्धा देऊ शकत नाहीत, ज्याविषयी ते मला गुन्हेंगार ठरविण्याचा प्रयत्न करीत आहेत.
[14] पण मी ही गोष्ट पूर्ण दाव्याने म्हणू शकतो की ज्या मताला कुपंथाचे नांव दिले जात आहे, मी त्याच पंथाच्या रीतिंवर
नियमशास्त्रानुसार आणि संदेष्टयांच्या पुस्तकातील वचनें मानतो आणि त्याप्रमाणचेआपल्या पूर्वजांच्या परमेश्वराची
उपासना करितो. [15] मला परमेश्वराकडून जी आशा आहे त्यावर त्यांचाही विश्वास आहे; ती अशी की मेलेले जिवंत
होतील, मग ते नीतिमान असोत की अनीतिमान! [16] मी परमेश्वर आणि मनुष्य संबंधाने एक शुद्ध विवेक बाळगण्याविषयी
कष्ट सहन करीत असतो.
[17] पुष्कळ वर्षांनंतर मी गरीबांसाठी दान व अर्पण आणण्यासाठी आपल्या देशी आलो होतो. [18] माझ्याविरूद्ध एखादी
बाब होती, तर त्यांनी आज याठिकाणी ती बाब आपल्यासमोर मांडायला हवी होती. [19,20] किंवा जे याठिकाणी आहेत,
त्यांनी सांगावे की ज्या वेळी मी सभेसमोर उभा होतो, त्या वेळी यांना माझ्याठायी कोणता दोष आढळला होता. [21] होय,
केवळ एकच गोष्ट असू शकते, जी मी ओरडून ओरडून सांगितली होती :” ती म्हणजे, मेलेल्यांच्या पुनरूत्थानावरचा
(जिवंत होण्याचा) माझा विश्वास; कदाचित याकरिताच आज माझा न्याय होतो आहे.”
[22] मग फेलिक्साने सर्व गोष्टीं अचूक (खराखरा खुलासा) ऐकल्या, तेव्हा त्याने असे म्हणून सभा टाळली “की जेव्हा
लुसिया प्रमुख येथे हजर असेल, तेव्हा मी उत्तम प्रकारे या विषयांसंबंधी योग्य व समर्पक निदान करु शकेन.” [23] त्याने
एका सुभेदाराला असा हुकूम केला, की त्याने पौलाला कडक पहाऱ्यात ठेवावे, तरीपण त्याला काही अंशी स्वातंत्र्य
द्यावे. त्याचे मित्र बंधु त्यांची सेवा करावयास किंवा दान द्यावयास आले तर त्यांना मना केले जाऊ नये.
[24] काही दिवसांनंतर फेलिक्स आपली पत्नी द्रुसिल्ला हिच्यासह तेथे आला. त्याने पौलाला बोलावून घेतले आणि
त्याचा जो येशूंवरील विश्वास होता त्याविषयी ऐकले. [25] पौलाने त्यांना, नीतिमान ठरविले जाणे, आत्मसंयम व
भविष्यकाळी येणाऱ्या न्यायाविषयी सांगितले. भीत व थरथर कांपत फेलिक्स म्हणाला, “आता तू परत जा, ज्या वेळी
मला समय लाभेल (वेळ काढता येईल), त्या वेळी मी तुला बोलावीन.” [26] पौलाला सोडण्याचा मोबदला म्हणून
फेलिक्स पौलाकडून काही धनाची अपेक्षा देखील करीत होता, म्हणूनच त्याला वारंवार बोलावून त्याच्याबरोबर बोलून
तो वेळ घालवीत असे.
[27] दोन वर्षांनंतर पुर्क्य फेस्त हा फेलिक्साच्या जागेवर नियुक्त केला गेला. फेलिक्स यहूदी लोकांना खुश करू पाहात
होता म्हणून त्याने पौलाला तुरूंगातच राहू दिले.

# 25

[1] तीन दिवसांनंतर फेस्त प्रांतात आला. तो कैसरीयाहून यरूशलेमेस गेला. [2] तेव्हा महायाजक आणि यहूदी पुढाऱ्यांनी

पौलाविरूद्ध तक्रार केली आणि विनंती केली. 3 आपण पौलाला यरूशलेमेस बोलावून घ्यावे, कारण वाटेत दबा धरून
ते त्याच्यावर वार करून त्याला मारुन टाकणार होते. 4 पण फेस्त म्हणाला, “त्याला कैसरीयातच राहू दिले जावे, तो
स्वतः लवकरच तेथे जाणार आहे.” 5 म्हणून त्याने उत्तर दिले, तुमच्यापैकी जो प्रमुख आहे, त्याने माझ्याबरोबर यावे
आणि जर त्याची काही चूक आहे, तर ती सिद्ध करावी”.
6 तो तेथे त्यांच्याबरोबर आठ-दहा दिवस राहिला आणि मग कैसरीयास गेला. पुढच्या दिवशी न्यायासनावर बसताच
त्याने पौलाला आपल्यासमोर प्रस्तुत करण्याची आज्ञा दिली. 7 जेव्हा त्याला तेथे आणले गेले तेव्हा यरूशलेमेंतून
पुष्कळ यहूदी आले आणि त्याच्याभोवती वेढा घालून उभे झाले, इतकेच केवळ नव्हे, तर त्याच्यावर असे आरोप
ठेवले ज्यांचे काही प्रमाण देखील त्यांच्याजवळ नव्हते.
8 पौलाने बचाव बाजू मांडून म्हटले, “मी कोणत्याही प्रकारे यहूदी लोकांच्या धार्मिक आस्था दुखाविल्या नाहीत किंवा
मी मंदिर व कैसराविरूद्धही काही बोललो नाहीये”.
9 परंतु यहूदी लोकांना खुश करण्यासाठी फेस्ताने पौलाला उत्तर देऊन म्हटले, “तू यरूशलेमेस जाऊन माझ्यापुढे
न्यायाकरिता उभा राहण्यास तयार आहेस काय?”
10 मग पौल म्हणाला, “मी आज आत्ता कैसराच्या येथेच न्यायआसनापुढे उभा आहे, येथेच माझा न्याय व्हावा.
तुम्हांला ठाऊकच आहे, की मी यहूदी लोकांचे काही वाईट केलेले नाही. 11 जर मी काही चुकीचे वागलो असेन किंवा
मृत्युदंडाजोगा अपराध केलेला असेन, तर मी मरावयास तयार आहे; पण जर माझ्याविरूद्ध ठेवलेल्या आरोपात काही
दम (वजन) नाही, तर मला त्यांच्या हाती सोपविण्याचा हक्क कोणालाही नाहीये, कैसरास मला हेच सांगायचे आहे. “
12 मग सभेबरोबर सल्ला -मसलत केल्यानंतर फेस्ताने उत्तर दिले, “तू कैसराजवळ न्यायाची मागणी केली आहेस काय?
तुला कैसरापुढे उभे व्हावे लागेल.”
13 काही दिवसांनंतर राजा अग्रिप्पा आणि बर्णीका, फेस्ताला भेटण्यासाठी कैसरीयास आले. 14 पुष्कळ दिवस
झाल्यानंतर, फेस्ताने पौलाचा विषय राजासमोर प्रस्तुत करताना म्हटले, “फेलिक्साने एक मनुष्य तुरूगात ठेवलेला
आहे. 15 जेव्हा मी यरूशलेमेत होतो, त्या समयी महायाजक व यहूदी वडील चर्चने त्याच्याविरूद्ध फ़ैसला सुनाविण्याचे
कार्य मला दिले होते,
16 मी त्यांना सांगितले की रोमन लोकांची अशी पद्धत नाहीये की जोपर्यंत आरोपीला आपल्या विरोधकांसमोर आपला
निर्दोषीपणा सिद्ध करावयाची संधी मिळत नाही, तोपर्यंत कोणत्याही आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा ऐकविली जावी.
17 म्हणून जेव्हा ते येथे आले होते, तेव्हा उशीर न लावता मी दुसऱ्याच दिवशी न्यायासनावर बसलो आणि त्या
माणसाला आत आणण्याचा हुकूम केला. 18 जेव्हा आरोपी उभे झाले तेव्हा, जसा विचार मी केला होता तसा आरोप ते
त्याच्याविरूद्ध ठेवू शकले नाहीत. 19 त्यांच्या स्वतःच्या धर्मा संबंधी त्याच्या विरूद्ध काही प्रश्नांसह, तसेच येशू
नांवाच्या व्यक्तिच्या मेलेल्यांतून जिवंत होण्याविषयी पौलाच्या विश्वासासंबंधी प्रश्न देखील होते. 20 कारण या सर्व
प्रश्नांविषयी मला शंका होती, म्हणून मी त्याच्याकडून माहीत करून घेतले की याविषयीचा न्याय करण्याकरिता तो
यरूशलेमेस जावयास (त्याची इच्छा)तयार असेल किंवा नाही. 21 पण जेव्हा पौलाने म्हटले की महाराज अगस्तुंचा
फ़ैसला त्याला मंजूर होईल, मी आज्ञा केली की जोपर्यंत मी त्याचे कैसराकडे पाठवीत नाही, तोपर्यंत त्याला येथेच
ठेवले जावे.”
22 मग अग्रिपाने फेस्ताला म्हटले, “मी या मनुष्याच्या तोंडून सर्व काही ऐकू इच्छितो.”
23 पुढच्या दिवशी जेव्हा अग्रिप्पा व बर्णीका मोठ्या वैभवाने मिरवीत आले आणि त्याचे ऐकण्यासाठी कमांडर आणि
शहरातील गणमान्य लोकांबरोबर महालात दाखल झाले तेव्हा फेस्ताच्या आज्ञेप्रमाणे पौलाला तेथे आणले गेले. 24 फेस्त
म्हणाला, “राजा अग्रिप्पा आणि येथे उपस्थित प्रत्येकाने पाहून घ्यावे, की यहूदी लोकांनी माझ्याकडे या मनुष्याची
तक्रार केलेली आहे. यरूशलेम आणि येथील लोकांची अशी मागणी आहे की या मनुष्याला जिवंत राहू देऊ नये; 25 परंतु
मला असे आढळले की मरणदंडाची शिक्षा मिळण्याजोगा कोणताच अपराध त्याने केलेला नाहीये. त्याची इच्छा सुद्धा
होती की महाराजा अगस्तुंपुढे त्याची मागणी (खटला) न्यायाकरिता सादर केली जावी, म्हणून मी त्याला तेथे

पाठविण्याचा विचार केला. [26] पण माझ्याजवळ त्याच्याविरूद्ध असे कोणतेच प्रमाण नाहीये, जे मी आपल्या महाराजांना
सांगावे. म्हणून राजा अग्रिप्पा ,मी त्याला आपल्यासमोर उपस्थित करितो आहे, यासाठी की चौकशी झाल्यानंतर
माझ्याजवळ लिहून पाठविण्याकरिता काहीतरी असावे. [27] कारण एखादा कैदीआरोपपत्र दाखल केल्याविनाच, मी तो
आपल्याकडे पाठवावा यात मला कसलेच शहाणपण दिसत नाही.”

## 26

[1] मग अग्रिप्पाने पौलाला म्हटले, “तुला परवानगी आहे की आपल्या बचावादाखल तू काही बोलावेस”. तेव्हा पौलाने
आपले हात पसरून म्हटले : [2] “यहूदी लोकांतर्फे जे काही आरोप माझ्यावर ठेवले गेलेले आहेत त्यांच्याविषयी आज
मला जी संधी दिली गेली आहे, त्याविषयी राजा अग्रिप्पा मी आनंदित आहे. [3] विशेष करून यासाठी की मला ठाऊक
आहे की आपण यहूदी लोकांच्या चालीरिती आणि प्रश्नांविषयी विपुल जाणते आहात. म्हणून माझी विनंती आहे की
आपण धीराने व शांतपणे माझे ऐकून घ्यावे.
[4] माझ्या तरूणपणापासून सर्व यहूदी माझ्या जीवनाविषयी जाणतात, हे देखील की माझी सुरवातीची वर्षें यरूशलेमेत
राहण्यातच गेली होती. [5] सुरवातीपासूनच लोक अशी साक्ष देत होते की आमच्या धर्माच्या सर्वाधिक कट्टर पंथाचा
अर्थात “परूश्यांचा” मी एक हिस्सा होतो. [6] आज मी येथे उभा आहे आणि त्या प्रतिज्ञेसाठी माझा न्याय होतो आहे, जी
परमेश्वराने आमच्या पूर्वजांशी केली होती; [7] आणि हा करार पूर्ण होण्यासाठी आमचे बारा वंश दिवसरात्र आराधना
करीत असत. राजे अग्रिप्पा, याच आशेकरिता मला आज दोषी म्हटले जात आहे, माझ्यावर आरोप ठेवले जात आहेत.
[8] आपल्याला या गोष्टीचे आश्चर्य का वाटते की परमेश्वर मेलेल्यांना जिवंत करितो?
[9] खरोखरच, माझा असा विचार होता की मला नासोरी येशूंच्या नांवाविरूद्ध खूप काही करावयाचे आहे. [10] मी
यरूशलेमेत असे केलेच ;पुरोहितांची अनुमति (परवानगी) प्राप्त करून मी येशूंच्या पुष्कळ लोकांना तुरूंगात टाकले
देखील. जेव्हा त्यांचा घात होत असे ,तेव्हा त्यांच्याविरूद्ध मी सुद्धा सामिल होत असे. [11] खूपदा मी आराधनालयातच
त्यांना पीडा देत असे, त्यांनी येशूंची निंदा करावी यासाठी प्रचंड दबाव आणीत असे व तशी जबरदस्ती करीत असे;
क्रोधाने संतापून मी मोठ-मोठ्या शहरांत त्यांचा छळ करीत असे. [12] एकदा जेव्हा मी महायाजकांकडून परवानगी
मिळवून अधिकारांसह दिमिष्कास जात होतो, [13] दुपारी, हे राजे, रस्त्यावर आकाशांतून एक प्रकाशझोत आला, हा
प्रकाश सूर्याच्या प्रकाशापेक्षाही प्रखर होता तो माझ्या व माझ्याबरोबर असलेल्या लोकांभोवती होता. [14] जेव्हा आम्ही
सर्व जण जमिनीवर खाली पडलो, मी इब्री भाषेत कोणाला तरी असे बोलतांना ऐकले, “शौला, शौला, तू मला पीडा का
देत आहेस? तुला एखाद्याला चिथावणी (राग) देऊन अंकुश लावणे (पराणीवर) फार जड व कठीण जाईल.”
[15] मी उत्तर दिले, “आपण कोण आहात प्रभू? ते म्हणाले,”मी येशू आहे ज्याला तू दुःख (यातना) देत आहेस. [16] ऊठ,
आपल्या पायांच्या बळावर उभा हो. काही गोष्टी तू पाहिल्या आहेत, आणि आणखी पुष्कळ काही मी तुला दाखवीन;
[17] हे सर्व यासाठी की तू या सर्व गोष्टींचे साक्षी आणि माझा सेवक व्हावे. [18] यासाठी की तू लोकांचे डोळे उघडावे; तू
त्यांनाअंधारातून प्रकाशाकडे आणि सैतानाच्या सामर्थ्यातून परमेश्वराकडे वळवावे. हे सर्व यासाठी की अपराधांची क्षमा
आणि माझ्यावर विश्वास केल्यामुळे शुद्ध झालेल्या लोकांबरोबर त्यांनी वतन मिळवून घ्यावे.
[19] म्हणून हे राजे अग्रिप्पा मला स्वर्गातून जे दर्शन (दृष्टांत) प्राप्त झाले त्याच्याविषयी मी आज्ञा (उल्लंघन)भंग केला नाही.
[20] परंतु मी दिमिष्क, यरूशलेम, यहूदीयाच्या सर्व प्रदेशात राहणारे आणि मग गैरयहूदी लोकांना सांगितले की त्यांनी
आपल्या मनाचा पालट (पश्चात्ताप) करावा, आणि त्यानंतर त्यांना ज्या प्रकारे योग्य जगायचे आहे तसेच त्यांनी जगावे
देखील. [21] याच कारणांमुळे यहूद्यांनी मला प्रार्थना भवनात धरले आणि माझा घात करण्याचा प्रयत्नही केला. [22] म्हणून
परमेश्वराचे साहाय्य प्राप्त करून मी आजपर्यंत लहानथोरांना साक्ष देतो आहे. ज्या गोष्टींची भविष्यवाणी संदेष्टयांनी
आणि मोशेने केली होती, त्याशिवाय मी काहीच म्हटलेले नाहीये; [23] हेच की येशू ख्रिस्त दुःख सहन करतील आणि ते
पहिले (प्रथम) मनुष्य असतील जे मेलेल्यांतून जिवंत होतील. तेच आमच्या लोकांना व गैरयहूदीयांना प्रकाश देतील.”

[24] अशा प्रकारे जेव्हा पौलाने आपली बाजू मांडली तेव्हा उंच आवाजात फेस्त म्हणाला, “पौला तू वेडा झाला आहेस,
असीमित ज्ञानाने तुझे डोके ठिकाणावर ठेवलेले नाही, तुझे डोके फिरले आहे”
[25] पण पौल म्हणाला, “महाराजाधिराज महोदय, मी वेडा नाहीये ना मी डोक्यावर पडलो आहे, परंतु सत्य आणि
समंजसपणाच्या गोष्टी बोलतो. [26] राजे, ज्यांच्यासमोर मी मोठ्या स्वतंत्रपणे बोलतो आहे, या सर्व गोष्टी त्यांना नीट-नीट
ठाऊक आहेत. मला पूर्ण प्रकारे ठाऊक आहे की या गोष्टी त्यांच्यापासून लपलेल्या नाहीत कारण हे सर्व गुप्तपणे
कानाकोपऱ्यांत झालेले नाहीये. [27] हे राजे अग्रिप्पा, आपण संदेष्टयांवर विश्वास ठेवता काय? होय, मला ठाऊक आहे
की आपण त्यांच्यावर विश्वास ठेवता.”
[28] तेव्हा अग्रिप्पा पौलाला म्हणाला, “तू मला आपल्या मतांत आणू (मिळवू) इच्छितोस काय ?”
[29] पौल म्हणाला, “आपण आणि माझे ऐकणारे सगळे, आज या मतांत खरोखर सहभागी होवोत,परमेश्वर असेच
करोत”.
[30] त्याच्या या गोष्टी ऐकून राजा, गव्हर्नर, बर्णीका आणि जे सर्व बसलेले होते, उठून उभे राहिले. [31] तेथून बाजूला
जाऊन ते एकमेकाला म्हणाले, “तुरूंगात ठेवण्याजोगा आणि मृत्युदंडाची शिक्षा देण्याजोगा असा कोणताच अपराध
याने केलेला नाहीये” [32] तेव्हा अग्रिप्पा फेस्ताला म्हणाला, “जर या मनुष्याने कैसराजवळ अपील (न्याय मागितला
नसता) केली नसती तर हा सुटला असता.”

# 27

[1] ज्या वेळी असे ठरविले गेले की आम्ही इटाली देशास जावे, त्या वेळी त्यांनी पौलास आणि दुसऱ्या कैद्यांना
राजाच्या सैन्यांचा सुभेदार, यूल्य याच्या स्वाधीन केले. [2] अद्रमुत्तियाचे एक जहाज आशिया प्रांताच्या किनाऱ्यावरील
ठिकाणांहून जाण्याच्या तयारीत होते. आम्ही त्यावर बसलो आणि समुद्री यात्रेकरिता निघालो. त्यासमयी अरिस्तार्ख
नांवाचा थेस्सलनीकाचा एक मासेदोनियातील व्यक्ती आमच्याबरोबर होता.
[3] पुढच्या दिवशी आम्ही सीदोनास पोचलो. यूल्य, पौलाबरोबर नरमाईने वागला, त्याच्याशी सलोख्याने वागून, त्याच्या
मित्रांनी त्याचा पाहुणचार करावा म्हणून त्यांच्याकडे जाण्याची त्याला परवानगी दिली. [4] तेथून जलयात्रेसाठी जेव्हा
आम्ही समुद्रात शिरलो, तेव्हा कुप्राच्या जवळून गेलो कारण वारा विरूद्ध दिशेचा होता. [5] आम्ही किलिकिया आणि
पंफुल्याच्या समुद्रांतून चालून, लुक्याच्या मुर्यात उतरलो. [6] तेथे सुभेदाराला आलेक्सांद्रियाचे इटालीला जाणारे एक
जहाज मिळाले आणि त्याने आम्हांला त्यावर चढविले. [7] आम्ही लोक पुष्कळ दिवसांपर्यंत हळूहळू कनिदासमोर
पोचलो, परंतु वारा आम्हांला पुढे जाऊ देत नव्हता म्हणून आम्ही सलमोनासमोरून क्रेताकडे जाऊ लागलो. [8] त्याच्या
काठाकाठाने मोठ्या कठीण परिस्थितीत, खूप प्रयत्न करून आम्ही एका ठिकाणी पोचलो ज्याला सुंदर बंदर असे
म्हणतात, तेथून लसया नगर जवळ होते.
[9] पुष्कळ दिवस गेल्यावर जलयात्रा आणखीच जास्त जोखमेची, कठीण व संकटमय झाली; इतकेच केवळ नव्हे तर
उपासाचे दिवस देखील बितले होतेच. म्हणून पौलाने त्यांना ताकीद देऊन म्हटले, [10] “हे माझ्या भावांनो, मला असे
वाटते की या समुद्र यात्रेत केवळ माल किंवा जहाजाचीच नव्हे तर आपल्या प्राणांची देखील हानि होऊ शकते” [11] तरी
प्रमुख जहाज चालक आणि जहाजाचा मालक यांच्याकडेच सुभेदाराचे अधिक लक्ष (प्रभाव पडला)होते, त्याने पौलाच्या
बोलण्याकडे दुर्लक्ष केले होते. [12] आणि याच कारणास्तव की हिवाळयात बंदरावर थांबणे सोयीस्कर व शहाणपणाचे
नव्हते, पुष्कळ लोकांनी तेथून पुढे जाण्याचा सल्ला दिला, याकरिता की फैनिके बंदरात पोचून तेथेच हिवाळा घालवावा.
हा क्रेताचा टापू आहे आणि दक्षिणपश्चिम व उत्तरपश्चिमेकडे आहे.
[13] जेव्हा दक्षिणेचा वारा मंद वाहू लागला तेव्हा असे समजून की त्यांचे लक्ष्य पूर्ण झाले आहे, नांगर उचलून ते
क्रेताच्या जवळ-जवळ जाऊ लागले. [14] पण काही वेळानंतरच, युरकुलोन नांवाचा वारा, जहाजाच्या विरूद्ध दिशेने वाहू
लागला. [15] मग जहाज तूफानी वाऱ्यात फसले आणि वाऱ्याचा सामना करू शकले नाही, तेव्हा आम्ही जहाज वाऱ्याच्या

स्वाधीन करून पुढे जाऊ लागलो. [16] कौदा नांवाच्या टापूच्या जवळून जाता-जाता, जीवननौका वाचविण्याकरिता
आम्हांला खूप परिश्रम करावे लागलेत. [17] जेव्हा त्यांनी ते वर घेतले तेव्हा पुष्कळ युक्त्या करून खालून बांधले. पण
बाजूच्या वाळूच्या किनाऱ्यावर आम्ही आदळू अशी भीति वाटल्यामुळे त्यांनी शीड उतरून घेतले आणि ते तसेच
वाहवीत पुढे गेलो. [18] आणि जेव्हा आम्ही तुफानी वाऱ्याने धक्के लागून हेलकाव्यांनी बेजार झालो, तेव्हा जहाजाचे
सामान फेकावयास सुरवात केली. [19] तिसऱ्या दिवशी आपल्या हातांनी आम्ही जहाजाचे सामान फेकले. [20] पुष्कळ
दिवस जेव्हा सूर्य व तारे दिसले नाहीत आणि प्रचंड तूफान आले असताना,आम्ही आपल्या वाचण्याची आशा सोडून
दिली.

[21] पुष्कळ दिवस उपाशी राहिल्यानंतर, पौल त्यांचामध्ये उभा राहून म्हणू लागला, “हे भावांनो, तुम्ही माझे ऐकून
घ्यावयाचे होते आणि या हानिपासून वाचून राहण्यासाठी क्रेताहून निघावयाचेच नव्हते. [22] परंतु आता धीर धरा, आणि
हिंमत असू द्या, कारण केवळ जहाजाचा नाश होईल, पण कोणाच्याही जिवाचे नुकसान होणार नाही; [23] कारण मागील
(गेल्या) रात्री ज्या परमेश्वराचा मी आहे आणि ज्याची सेवा मी करितो, त्याचा एक देवदूत माझ्याजवळ येऊन उभा
राहिला. [24] त्याने म्हटले, पौला भिऊ नको, तुला कैसरापुढे उभे रहावे लागणार आहे. होय, जे लोक तुझ्याबरोबर प्रवास
करीत आहेत ते परमेश्वराने तुला दिले आहेत; [25] म्हणून भावांनो, धीर धरा; [26] कारण मी विश्वास करितो, की ज्याप्रमाणे
मला सांगितले गेले आहे अगदी तसेच होईल.

[27] तरीपण हे आवश्यक आहे की आपण एखाद्या बेटाला जहाज लावावे.” [28] चौदाव्या रात्री जेव्हा आम्ही अद्रिया
समुद्रात हेलकावे खात होतो, तेव्हा आम्हांला मध्यरात्री असा आभास झाला की आम्ही जमिनीजवळ पोचत आहोत.
[29] जहाज खडकावर आपटू नये या भीतिने, त्यांनी जहाजाच्या मागच्या भागापासून चार नांगर सोडले आणि दिवसाच्या
प्रकाशाची वाट पाहत राहिले. [30] ज्या क्षणी खलाशी जहाजांतून पळ काढण्याच्या बेतात होते, [31] पौल सुभेदाराला आणि
सैनिकांना म्हणाला, “जर ते जहाजात थांबणार नाहीत तर आपण वाचू शकणार नाही.” [32] म्हणून सैनिकांनी होडीचे दोर
कापले आणि ती पडू दिली.

[33] जेव्हा दिवस उगवणार होता, तेव्हा पौलाने या गोष्टीवर भर दिला की सर्वांनी भोजन खावे, आणि म्हणाला, “आज
वाट पाहून पाहून चौदावा दिवस झाला आहे, तुम्ही काही खाल्लेही नाही, [34] म्हणून मी तुम्हांला विनंती करितो की आपले
स्वास्थ्य नीट रहावे म्हणून तरी खा. तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही”. [35] त्याचे बोलणे झाल्यावर त्याने हातात
भाकर घेतली, सर्वांच्या उपस्थितीतच ‘परमेश्वराचे’ आभार मानले आणि ती मोडून तो खाऊ लागला. [36] मग सर्वांनी धीर
बाळगून भोजन केले. [37] जहाजात आम्ही सर्व सुमारे दोनशे शाहत्तर जण होतो. [38] त्यांनी पुष्कळ भोजन खाल्ल्यानंतर,
धान्य समुद्रात टाकले आणि जहाज हलकें करू लागले.

[39] जेव्हा सकाळचा प्रकाश चमकला तेव्हा त्यांना कोरडी जमीन दिसली नाही, पण त्यांनी एक खाडी पाहिली जी
चौरस आकाराची होती. त्यांनी विचार केला की शक्य असेल तर जहाज त्याच काठावर लावून घ्यावे. [40] त्यांनी नांगर
कापले व समुद्रांत सोडले आणि त्याच समयी दिशा नियंत्रणाची धातुपट्टी ढिली केली, पुढचे मुख्य शीड वाऱ्यावर
सोडले आणि तटाच्या सपाटीकडे निघाले; [41] परंतु दोन समुद्र एका ठिकाणी मिळण्याच्या जागी त्यांनी जहाज लावले
आणि त्याचा पुढचा भाग असा रूतून बसला की हालू शकलाच नाही आणि मागचा भाग लाटांच्या माऱ्याने फुटू लागला.

[42] सैनिक असा विचार करीत होते की, कैद्यांना जिवे मारावे म्हणजे कैदी पोहून फरार होऊ नयेत. [43] परंतु पौलाचा
जीव वाचविण्याकरिता सुभेदाराने त्यांना तसे करण्यापासून रोखले आणि असा हुकूम दिला की ज्यांना पोहता येते त्यांनी
आधी उडी टाकून किनाऱ्यावर पोचावे. [44] बाकी लोकांनी त्यांच्यानंतर, कोणी लाकडी फळयांवर आणि जहाजाच्या
दुसऱ्या तुकडयांच्या आधारे निघून जावे. अशा प्रकारे ते सर्वचे सर्व कोरडया जमिनीवर सुरक्षित पोचले.

## 28

[1] जेव्हा ते तेथून निभावले (वाचले) तेव्हा त्यांना कळले की त्या बेटाचे नांव मिलिता आहे. [2] तेथील आदिवासी लोक

आमच्याबरोबर नम्रतेने वागले, त्यांनी आमचे स्वागत केले तसेच पाऊस व थंडीपासून आम्हांला ऊब देण्यासाठी
लाकडांचा जाळ केला. 3 जेव्हा पौलाने लाकडी मोळी ठेवली, तेव्हा एक विषारी साप त्याच्या हाताला घट्ट चिकटला.
4 त्या लोकांनी जेव्हा तो साप त्याच्या हाताला चिकटलेला पाहिला तेव्हा म्हणाले, “हा मनुष्य नक्कीच हत्यारा आहे; तो
समुद्राच्या संकटातून वाचला असला तरी न्याय त्याला जिवंत सोडणार (राहू देणार )नाही.”
5 पौलाने साप झटकला आणि तो विस्तवांत पडला. 6 लोकांना वाटले की त्याचे शरीर सुजेल किंवा तो खाली पडेल
आणि मरेल पण त्यांनी पाहिले की पुष्कळ वेळ झाल्यानंतरही त्याचे काही नुकसान झाले नाही; हे पाहून त्यांना वाटले
की पौल कोणी तर ईश्वर आहे.
7 त्या प्रदेशांत, बेटाच्या एका प्रसिद्ध माणसाची शेत-जमीन होती, त्या माणसाचे नांव होते पुब्ल्य. त्याने आमचे स्वागत
केले आणि तीन दिवस आमचा पाहुणचार केला. 8 पुब्ल्यचे वडील ताप व आवरक्ताने आजारी पडले होते. पौलाने
त्यांच्या घरी जाऊन त्याच्यावर हात ठेवले आणि त्याला बरें केले. 9 या घटनेनंतर टापूचे (बेट) इतर रोगी देखील आले
आणि त्यांना बरें केले गेले. 10 त्यांनी आमचा खूप आदर केला. जेव्हा आम्ही तेथून निघालो तेव्हा आमच्या गरजेनुसार,
आवश्यक वस्तु त्यांनी जहाजावर लादल्या.
11 तीन महिन्यांनंतर आम्ही आलेक्सांद्रियाच्या जहाजाने निघालो जे हिवाळयात तेथेच राहिले होते, त्याचे चिन्ह
कास्टर व पोलक्स असे होते. 12 सुराकूस पोचल्यानंतर आम्ही सतत तीन दिवस तेथेच घालविले. 13 तेथून वळसा घेऊन
आम्ही रेगियोनास पोचलो. एका दिवसानंतर दक्षिणेचा वारा सुटला आणि पुढच्या दिवशी आम्ही पुत्युला येथे पोचलो.
14 तेथे आम्हांला काही भाऊ भेटले, ते आम्हांला म्हणाले की सात दिवस आमच्याबरोबर रहा. मग आम्ही रोम
शहराकरिता निघालो. 15 भावांनी आमच्याविषयी ऐकले तेव्हा ते अप्पिया व तीन धर्मशाळेपर्यंत आम्हांला भेटावयास
आले. पौलाने त्यांना पाहिले आणि परमेश्वराचे आभार मानले आणि धीर बाळगला. 16 जेव्हा आम्ही रोम शहरात पोचलो
तेव्हा सुभेदाराने कैदी, सुरक्षा दलाच्या स्वाधीन केले. परंतु पौलाला एका शिपायाच्या पहाऱ्यात एकटे ठेवण्यात आले.
17 तीन दिवसांनंतर पौलाने यहूदीयाच्या पुढाऱ्यांना बोलावून घेतले. जेव्हा ते एकत्र जमले, तो त्यांना म्हणाला, “हे
भावांनो, ना मी लोकांविरूद्ध ना आपल्या पूर्वजांच्या रीति विधींविरूद्ध काही केले आहे,तरी यरूशलेमेतच मला एका
गुन्हेंगारासारखे रोमन लोकांच्या स्वाधीन केले गेले. 18 मला पारखल्यानंतर त्यांनी मला सोडून द्यावयाचे होते, कारण
मरणदंडाचे कोणतेच कारण (माझ्या नांवी )नव्हते. 19 पण जेव्हा यहूदी लोकांनी मरणदंडावर भर दिला, तेव्हा
कैसरापुढेअपील करुन न्याय मागणे मला भाग पडले; हे यासाठी नव्हते की मला माझ्या राष्ट्राविषयी एखादी तक्रार
होती. 20 म्हणून याच कारणाने मी तुम्हांला बोलावून घेतले आहे की मिळून तुमच्याशी विचार विमर्श करावा, कारण
इस्त्राएलाच्या आशेसाठी मी या साखळदंडाने बांधलेला आहे.”
21 ते त्याला म्हणाले, तुझ्याविषयी आम्हांला यहूदीयातून कोणतेही पत्र मिळालेले नाही. जे लोक येथे आले त्यांनी
तुझ्याविषयी काही वाईट खबर देखील सांगितली नाही. 22 पण तुझा विचार काय आहे, हे आम्हां सर्वांना ऐकावयाचे
आहे; या मताविषयी म्हटल्यास आम्हांला माहीत आहे, की प्रत्येक ठिकाणी त्याच्याविरूद्ध म्हटले जाते.
23 जेव्हा त्यांनी त्याच्यासाठी एक दिवस नेमला तेव्हा पुष्कळ लोक त्याला भेटावयास आले. त्याने परमेश्वर
राज्याविषयी स्पष्ट-स्पष्ट सांगितले; सकाळपासून संध्याकाळपर्यंत मोशेच्या नियमशास्त्रातून आणि संदेष्टयांच्या
पुस्तकातून, तो मोठ्या प्रभावी पद्धतीने येशूंविषयी शिकवीत राहिला. 24 काही लोक हे ऐकून चिडले पण काहींनी
विश्वास ठेवला. 25 जेव्हा आपसांत त्यांचे विचार एक नव्हते व पौलाने काही म्हटले, तेव्हा ते त्याला सोडून निघून
गेलेत. पौल म्हणाला होता, “आपल्या पूर्वजांशी पवित्रात्म्याने यशया संदेष्टयाद्वारे असे म्हटले होते, की 26 तुम्ही ऐकीत
रहाल, पण समजणार नाही, पाहात रहाल पण तुमच्या लक्षात येणार नाही आणि तुम्हांला समजणार नाही; 27 कारण तुमचे
अंतःकरण लठ्ठ आहे, कान बहिरे झाले आहेत, त्यांनी आपले डोळे बंद केले आहेत. त्यांनी कधी पाहू नये आणि कानांनी
ऐकू नये; अंतःकरणात समजू नये, त्यांच्या अंतःकरणाचा पालट होऊ नये आणि मी त्यांना बरे करू नये.
28 तुम्ही ही गोष्ट नीट समजून आणि जाणून घ्यावी की ही मुक्ति, गैरयहूदी लोकांकडे पाठविली गेली आहे आणि ते ती
ऐकतील.”

29 जेव्हा त्याने असे म्हटले तेव्हा यहूदी आपसांत वादविवाद करू लागले आणि मग तेथून निघून गेलेत.
30 पौल भाडयाच्या घरात पूर्ण दोन वर्षें◌ं राहिला. 31 जे लोक त्याच्याकडे येत असत, त्या सर्वांची भेट तो घेत असे
आणि कोणत्याही अडथळयाशिवाय आणि निर्भय राहून तो परमेश्वर राज्याची येशू-वार्ता गाजवीत राहिला आणि येशू
ख्रिस्तांविषयी (वचनें) शिकवीत राहिला.